(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**-प्रकाशन योग्य**

## भारताचे सर्वोच्च न्यायालय

## मूळ दिवाणी अधिकारीता

**रिट याचिका (दि) क्रमांक ४९३/२०२२**

सुभाष देसाई ......... याचिकाकर्ता

विरुद्ध

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे प्रधान सचिव

आणि इतर. ......... उत्तरवादी

**सह रिट याचिका (दि) क्रमांक ४६९/२०२२**

**सह**

**रिट याचिका (दि) क्रमांक ४६८/२०२२**

**सह**

**रिट याचिका (दि) क्रमांक ४७०/२०२२**

**सह**

**रिट याचिका (दि) क्रमांक ४७९/२०२२**

**आणि सह**

**रिट याचिका (दि) क्रमांक ५३८/२०२२**

**न्यायनिर्णय**

**भारताचे सरन्यायाधीश, डॉक्टर धनंजय य. चंद्रचूड**

मजकुराचा तक्ता


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ए | | खरी पार्श्वभूमी. | ...... | ४ |
| | i. | महाराष्ट्र राज्याच्या सरकार मध्ये बदल | ...... | ४ |
| | ii. | अध्यक्षपदासाठी निवडणूक | ...... | १२ |
| | iii. | भारताच्या निवडणूक आयोगासमोरील कामकाज | ...... | १५ |
| बी. | | प्रस्तुत प्रकरणात विनंती केलेल्या दिलाशांचा आढावा | ...... | १६ |
| सी. | | संदर्भ | ...... | २० |
| डी | | सादर केलेली निवेदने | ...... | २२ |
| | i. | नबाम अरेबिया यांचे प्रकरण मोठ्या खंडपीठांसमोर संदर्भित करायला हवे होते का यासंबंधी निवेदन | ...... | २२ |
| | ii. | त्यातील गुणवत्तेसंबंधी निवेदन | ...... | २८ |
| इ. | | विश्लेषण | ...... | ४८ |
| | i. | नबाब रेबिया यांच्या प्रकरणाचा मोठ्या खंडपीठांसमोर संदर्भ | ...... | ४८ |
| | ii. | प्रस्तुत न्यायालयाचे सुरुवातीलाच अपात्रतेच्या | ...... | ६२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | याचिकांवर निर्णय घेण्यासंबंधी अधिकार | | |
| | **iii.** | प्रतिबंधात्मक वर्तणूक आणि अपात्रतेच्या याचीकांवरील निर्णय यामध्ये सभागृहाच्या कामकाजाची वैधता | …… | ६९ |
| | **iv.** | प्रतोद आणि विधिमंडळ पक्ष नेत्याच्या नियुक्तीचे अधिकार | …… | ७५ |
| _ए | | अनुच्छेद २१२ अंतर्गत प्रतिबंध - विधान मंडळातील कामकाजाची विधीग्राह्यता | …… | ७६ |
| बी | | प्रतोद आणि विधिमंडळ पक्षाच्या नेत्याच्या नियुक्तीचे अधिकार | …… | ८० |
| | **i.** | राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष या फरक दर्शविता येणाऱ्या संकल्पना आहेत | …… | ८० |
| | **ii.** | दहावी अनुसूची नियम १९८६ आणि अधिनियम १९५६ यांची शब्दशः आणि सप्रयोजन अर्थ उकल | …… | ८५ |
| **V.** | | ‘खरी’ शिवसेना कोणती याचा निर्णय घेणे | …… | ९८ |
| | ए. | दहाव्या अनुसूचीचा हेतू आणि अपात्रतेचा परिणाम | …… | ९८ |
| | बी. | चिन्ह आदेशाचा हेतू आणि परिच्छेद १५ अंतर्गत निर्णय याचा परिणाम | …… | १०० |
| | सी. | चिन्ह आदेशाच्या परीक्षेत १५ अंतर्गत वादास लागू असलेल्या चाचण्या | …… | १०४ |
| | डी. | प्रस्तुत प्रकरणातील गुंतागुंतीस कारणीभूत अप्रकट | …… | १०७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | बाबी | | |
| | ई. | दहाव्या अनुसूचीचा निवडणूक चिन्ह आदेशातील परिच्छेद १५ बरोबर मेळ घालणे | …… | १०९ |
| vi | | दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद तीन वगळण्याचा परिणाम | …… | ११४ |
| | ए. | जे सदस्य अपात्रतेच्या कारवाईस सामोरे जात आहेत त्यांच्यासाठी फूट पडण्याचा बचाव उपलब्ध नाही | …… | ११८ |
| | बी. | दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद दोन अंतर्गत सभापतींचा निर्णय | …… | ११९ |
| vii. | | राज्यपालांनी श्री ठाकरे यांना बहुमत चाचणी सामोरे जाण्याचे निर्देश देण्याच्या स्वेच्छाधिकाराचा वापर | …… | १२१ |
| | ए . | बहुमत चाचणी घेण्यास निर्देश देण्याचा राज्यपाल यांचा अधिकार | …… | १२३ |
| | बी. | बहुमत चाचणी घेण्याचे निर्देश देण्याच्या अधिकारांचा राज्यपाल यांनी केलेला वापर | …… | १२७ |
| viii. | | राज्यपाल यांनी श्री शिंदे यांना मुख्यमंत्री होण्यासाठी आमंत्रित करण्याच्या स्वेच्छाधिकाराचा वापर | …… | १३३ |
| | ए. | श्री शिंदे यांची नियुक्ती राज्यघटनेच्या अनुच्छेद 164 (1 ब ) अंतर्गत प्रतिबंधित नाही | …… | १३४ |
| | बी. | राज्यपाल यांनी त्यांच्या अधिकार कक्षेची मर्यादा ओलांडली नव्हती | …… | १३७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एफ | | निष्कर्ष | …… | १३९ |

१. राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये या न्यायालयासमोर दाखल करण्यात आलेल्या रीट याचिका महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाच्या राजकीय गोंधळातून निर्माण झाल्या आहेत. शिवसेनेचे श्री उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदी घेऊन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष[1], भारतीय काँग्रेस पक्ष[2] आणि विधानसभेचे काही अपक्ष सदस्यांची[3] आघाडी यांनी महाराष्ट्र राज्यात सत्ता स्थापन केली. २०२२ या वर्षाच्या मध्यात अशा काही घटना घडल्या ज्यामुळे (शिवसेनेचा एक गट ज्यांनी त्यांची शिवसेना 'खरी' असल्याचा दावा केला होता) भारतीय जनता पक्ष[4] आणि काही अपक्ष आमदार यांच्या आघाडीने नवीन सरकार स्थापन केले. शिवसेनेचे श्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून दुसऱ्या सरकारची धुरा सांभाळली. शिवसेनेत दोन गट उदयाला आल्याने महाराष्ट्र राज्यातील सत्तारचनेत बदल झाला. या घटनांमुळे निर्माण होणारे विविध मुद्दे प्रस्तुत न्यायालयाद्वारे या कार्यवाहींमध्ये निश्चित केले जातील. वस्तुनिष्ठ पार्श्वभूमीचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे आहे.

**<u>ए. तथ्यात्मक पार्श्वभूमी</u>**

**i.** <u>महाराष्ट्र राज्याच्या सरकारमध्ये बदल.</u>

1 एनसीपी

2 आयएनसी

3 आमदार

4 भाजप

२. महाराष्ट्रात १९६६ साली शिवसेनेची स्थापना झाली. भारताच्या निवडणूक आयोगाने[5] शिवसेनेला राज्याचा राजकीय पक्ष म्हणून मान्यता दिली आहे. जानेवारी २०१८ ते २०२३ या कालावधीसाठी पक्षाची संघटनात्मक निवडणूक २३ जानेवारी २०१८ रोजी झाली आणि या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची पक्षाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

३. महाराष्ट्राच्या चौदाव्या विधानसभेची निवडणूक ऑक्टोबर २०१९ मध्ये झाली. एकूण २५८ जागांपैकी भाजपने एकशे सहा जागांवर शिवसेनेने ५६ जागांवर, राष्ट्रवादीने ५३ जागांवर आणि काँग्रेसने ४४ जागांवर विजय मिळविला. तेरा मतदारसंघात अपक्ष उमेदवार निवडून आले असून उर्वरित मतदारसंघांमध्ये अन्य पक्षांचे उमेदवार निवडून आले आहेत. नोव्हेंबर २०१९ मध्ये शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांनी निवडणूकोत्तर युती केली जी महाविकास आघाडी[6] म्हणून ओळखली जाऊ लागली. महाविकास आघाडीने महाराष्ट्रात सरकार स्थापनेचा यशस्वी दावा केला आणि श्री उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. २५ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शिवसेनेच्या सर्व ५६ आमदारांनी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांना पत्र पाठवून एकनाथ शिंदे यांची शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या गटनेतेपदी आणि श्री सुनील प्रभू यांची शिवसेना विधिमंडळ पक्ष[7] (शिवीप) यांच्या मुख्य प्रतोद पदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती दिली.

5 इसीआय

6 मविआ

7 शिविप

४. शिवसेनेचे काही आमदार भाजपच्या नेत्यांना भेटत असल्याचे वृत्त जीवन २०२२ मध्ये प्रसिद्ध होईपर्यंत महाविकास आघाडीने महाराष्ट्र राज्यावर सत्ता गाजवली. यावेळी सभापती पद रिक्त होते आणि सभापतींची कामे उपसभापती श्री नरहरी झिरवळ यांच्या हस्ते पार पाडली जात होती.

५. त्यानंतर घडलेल्या घटनांवरून असे दिसून येते की शिवीप चे दोन गट झाले : एका गटाचे नेतृत्व तत्कालीन मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे यांच्याकडे आणि दुसऱ्या गटाचे नेतृत्व शिवीप चे गटनेते श्री एकनाथ शिंदे यांच्याकडे होते. प्रत्येक गटाने खऱ्या राजकीय पक्षाचे प्रतिनिध्व प्रतिनिधित्व केल्याचा दावा केला आणि शिवीप च्या  कामकाजाशी संबंधित विविध ठराव मंजूर केले. संदर्भाच्या सुलभतेसाठी आम्ही श्री ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटाचा याचिकाकर्ते म्हणून आणि श्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाचा उत्तरवादी म्हणून उल्लेख करतो.

६. २१ जून २०२२ रोजी शिवसेनेचे मुख्य प्रतोद श्री सुनील प्रभू यांनी पक्षादेश जारी करून शिवसेनेच्या सर्व आमदारांना त्याच दिवशी उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. या बैठकीला गटनेते एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक आमदार उपस्थित नव्हते. उपस्थित आमदारांनी एकनाथ शिंदे यांना शिवीप च्या गटनेते पदावरून हटवून त्यांच्या जागी श्री अजय चौधरी यांची नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर केला. या ठरावाद्वारे घेण्यात आलेले निर्णय त्याच दिवशी म्हणजे २१ जून २०२२ रोजी उपसभापतींना कळविण्यात आले. त्याच दिवशी उपसभापतींनी शिविप  च्या गटनेत्याच्या बदलाला स्वीकृती दिल्याचा निर्णय कळवला.

७. त्याचवेळी शिवसेनेच्या ३४ आमदारांनी म्हणजेच सामनेवाले यांनी स्वतंत्र बैठक घेऊन श्री एकनाथ शिंदे हेच शिबी मचे गटनेते आहेत यास दुजोरा देणारा ठराव संमत केला. सुनील प्रभू

यांची मुख्य प्रतोद पदी झालेली नियुक्ती रद्द करून त्यांच्या जागी श्री भरत गोगावले यांची नियुक्ती करण्यात आली. हा ठराव २१ जून २०२२ चा असून आसाम मधील गुवाहाटी येथे मंजूर करण्यात आला आहे. तो २२ जून २०२२ रोजीच उपसभापतींना प्राप्त झाल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे तर उत्तरवादींचा दावा आहे की तो २१ जून २०२२ रोजी पाठविण्यात आला होता.

८. श्री एकनाथ शिंदे यांनी उपसभापतींना पत्र लिहून शिवसेनेच्या ३४ आमदारांनी मंजूर केलेल्या ठरावाची माहिती दिली त्याद्वारे त्यांच्या शिवीम च्या गटनेतेपदी नियुक्ती वर शिक्कामोर्तब झाले. त्यांच्या नियुक्तीला दुजोरा देणारा ठराव लक्षात घेता श्री अजय चौधरी यांना गटनेते म्हणून मान्यता देऊ नये अशी विनंती त्यांनी उपसभापतींना केली पुन्हा एकदा याचिकाकर्त्यांचा दावा आहे की उपसभापतींना हे पत्र २२ जून २०२२ रोजी मिळाले आणि उत्तरवादींनी ते २१ जून २०२२ रोजी पाठवले होते असे दृढकथन केले.

९. याच आमदारांनी उपसभापती नरहरी झिरवळ यांना नोटीस बजावून यापुढे त्यांना त्यांचा पाठिंबा नसल्याचे सांगत त्यांना पदावरून हटविण्याचा प्रस्ताव मांडण्याची मागणी केली. सदर नोटीस राज्यघटनेच्या अनुच्छेद १७९ (सी ) सह महाराष्ट्र विधानसभा नियम, २०१९ च्या नियम ११ अंतर्गत जारी करण्यात आली होती. ही नोटीसही २२ जून २०२२ रोजी उपसभापतींना प्राप्त झाल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे तर ती आदल्याच दिवशी म्हणजेच २१ जून २०२२ रोजी पाठविण्यात आली होती असे उत्तरवादींचे म्हणणे आहे.

१०. २२ जून २०२२ रोजी श्री सुनील प्रभू यांनी शिवसेनेच्या सर्व आमदारांना वैयक्तिक पत्र पाठवून त्या दिवशी संध्याकाळी श्री उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी होणाऱ्या शिवीम च्या

बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन केले होते. या पत्रात खालील मजकूर नमूद करण्यात आला आहे.

> .... खाली सही करणार यांना लेखी आणि पुरेशी कारणे न देता आणि आगाऊ कळविल्याशिवाय बैठकीत सहभागी न झाल्यास भारतीय राज्यघटनेच्या संबंधित तरतुदीनुसार तुमच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल".

२२ जून, २०२२ च्या बैठकीलाही श्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेचे अनेक आमदार उपस्थित नव्हते.

११. श्री एकनाथ शिंदे यांनी २२ जून २०२२ रोजी श्री सुनील प्रभू यांना पत्र लिहून त्यांच्यावर शिवी मोर्चा लेटरहेडचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. या पत्रात म्हटले आहे की.....

ए. श्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसेनेच्या 45 आमदारांची बैठक झाली;

बी. श्री सुनील प्रभू यांची शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदावरून हकालपट्टी झाली;

सी. श्री सुनील प्रभू यांच्या जागी श्री भरत गोगावले यांची शिवसेनेच्या मुख्य प्रस्तुत पदी नियुक्ती करण्यात आली आहे आणि

डी. श्री सुनील प्रभू यांना 22 जून 2022 चा पत्रावर (त्यांनी शिवसेनेच्या सर्व आमदारांना जारी केलेल्या पत्रावर) स्वाक्षरी करण्याचा अधिकार नव्हता आणि त्यामुळे श्री ठाकरे

यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीला उपस्थित राहणे श्री एकनाथ शिंदे यांच्यावर बंधनकारक नव्हते.

१२. २३ जून २०२२ रोजी श्री सुनील प्रभू यांनी शिवसेनेच्या श्री एकनाथ शिंदे आणि इतर १५ आमदारांना अपात्र ठरविण्यासाठी राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील परिच्छेद दोन एक अन्वये याचिका दाखल केली. उपसभापतींनी २५ जून २०२२ रोजी या अपात्रता याचिकांमध्ये नोटिसा बजावल्या. नोटीस बजावण्याच्या आदेशाचा संबंधित भाग खाली दिलेला आहे.

> “महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या आधारावर अपात्रता) नियम १९८६ मधील नमूद प्रक्रियेनुसार, सोमवार, दिनांक २७ जून २०२२ रोजी, सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत, उपसभापती यांना आपले लेखी म्हणणे सादर करण्याचे आपणास निर्देश देण्यात आले आहेत”.

१३. २७ जून २०२२ रोजी अपात्रता याचिकांमध्ये जारी केलेल्या नोटीसला आव्हान देताना उत्तरवादींनी या न्यायालयाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर केला. या न्यायालयाने त्याच दिवशी खालील अटींमध्ये अंतरिम आदेश दिला ज्याद्वारे अपात्रता याचिकांवर उत्तर देण्यासाठी २७ जून २०२२ पासून दिनांक १२ जुलै, २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली.

. "दरम्यान अंतरीम उपाय म्हणून विधानसभा उपाध्यक्षांनी याचिकाकर्ते किंवा तत्सम स्थितीतील इतर विधानसभा सदस्यांना त्यांचे लेखी म्हणणे संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करण्यासाठी दिलेली मुदत १२ जुलै २०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे."

१४. श्री सुनील प्रभू यांनी २५ जून, २०२२ रोजी दोन अपक्ष आमदार तसेच प्रहार जनशक्ती पक्षाच्या एका आमदाराला अपात्र ठरविण्याची आणि २७ जून २०२२ रोजी शिवसेनेच्या २२ आमदारांच्या विरोधात याचिका दाखल केली होती.

१५. २८ जून २०२२ रोजी तत्कालीन विरोधी पक्ष नेते श्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांना पत्र लिहून तत्कालीन मुख्यमंत्री श्री ठाकरे यांना सभागृहात बहुमत नसल्याचे सांगितले होते. राज्यपालांनी श्री उद्धव ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी त्यांनी केली. अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आलेल्या सात आमदारांनी त्याच दिवशी राज्यपालांना तसे पत्र लिहिले. त्यांनीही राज्यपालांना विनंती केली की उद्धव ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश द्यावेत.

१६. राज्यपालांनी २८ जून, २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठवून ३० जून २०२२ रोजी बहुमत चाचणीला सामोरे जाण्याचे आवाहन केले होते. विश्वास दर्शक ठराव कशा पद्धतीने घ्यायचा हे या पत्रात खालील अटींमध्ये नमूद करण्यात आले आहे.

i. महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन ३०.०६२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता बोलावले जावे ज्यात सरकार विरोधात विश्वासदर्शक ठराव हा एकमेव अजेंडा असेल.

ii. सभागृहाचे कामकाज अशा प्रकारे चालविले जाईल की जर भाषणे करावयाची असल्यास ती कमी कालावधीत पूर्ण होतील आणि दिनांक ३० जून २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विश्वासदर्शक ठरावाचे कामकाज संपेल.

iii. महाराष्ट्र विधानसभा नियमावली मध्ये नमूद केल्यानुसार मतमोजणीच्या उद्देशाने सदस्यांना त्यांच्या जागेवर उभे राहण्यास सांगून मतदान घेण्यात येणार आहे.

iv. विधानसभा कामकाजाचे थेट प्रक्षेपण करावे लागेल आणि त्यासाठी, ते तसे करण्याची योग्य ती व्यवस्था करावी लागेल.

v. विश्वासदर्शक ठरावाच्या संपूर्ण कामकाजाचे ध्वनिमुद्रित चलत चित्रीकरण सचिवालयातर्फे स्वतंत्र एजन्सी मार्फत केले जाईल आणि ते मला सादर केले जाईल.

vi. वरील कार्यवाही ३०.०६.२०२२ रोजी सकाळी ११ वाजता सुरू केली जाईल आणि कोणत्याही परिस्थितीत तहकूब विलंबित किंवा स्थगित केली जाणार नाही.

vii. बहुमत चाचणी सुरळीत पार पडावी यासाठी विधान भवनाच्या बाहेर आणि आत सदस्यांच्या सुरक्षेसाठी पुरेशी व्यवस्था करण्यात येईल.

राज्यपालांनी २८.०६.२०२२ रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या सचिवांना पत्र पाठवून महाराष्ट्र विधानसभेच्या ज्या अधिवेशनात बहुमत चाचणी होणार होती त्या अधिवेशनासाठी आवश्यक व्यवस्था करण्यास फर्माविले होते.

१७. दुसऱ्याच दिवशी (२९ जून, २०२२) रोजी, श्री सुनील प्रभू यांनी शिवसेनेच्या ४२ आमदारांविरोधातील अपात्रता याचिका उपसभापतींसमोर विचाराधीन असल्याचे कारण देत राज्यपालांनी २८ जून, २०२२ रोजी मुख्यमंत्र्यांना तसेच महाराष्ट्र विधानसभा सचिवांना दिलेले पत्र

रद्द करण्यासाठी या न्यायालयात रिट याचिका दाखल केली. या न्यायालयाने विश्वास दर्शक ठरावाला स्थगिती देण्यास नकार दिला या न्यायालयाने २९.०६.२०२२ रोजी दिलेल्या आदेशाचा संबंधित भाग खालील प्रमाणे आहे.

८....

i . विश्वासदर्शक ठरावाचा एकमेव अजेंडा घेऊन महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन ३०.०६.२०२२ रोजी म्हणजे उद्या सकाळी ११ वाजता बोलावण्याच्या आदेशास स्थगिती देण्याचे कोणतेही कारण आम्हास दिसून येत नाही.

ii. ३०.०६.२०२२ रोजी बोलावलेल्या विश्वास दर्शक ठरावाची कार्यवाही त्वरित रीट याचिकेच्या तसेच वर नमूद केलेल्या रेट याचिकांच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल.

iii. महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या दिनांक २८.०६.२०२२ च्या पत्रातील निर्देशांनुसार आयोजित केले जाईल.

त्याच दिवशी ठाकरे यांनी राजीनामा दिला.

१८. ३० जून २०२२ रोजी श्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांना पत्र लिहून भाजपचे १०६ आमदार आणि आठ अपक्ष व इतर आमदार श्री एकनाथ शिंदे यांना सत्ता स्थापनेसाठी पाठिंबा देत असल्याचे सांगितले होते. त्याच दिवशी श्री शिंदे यांनी शिविप च्या ३९ आमदारांनी राज्यात सत्ता स्थापनेची कार्यवाही सुरू करण्यासाठी शिंदे यांना अधिकार देण्याचा एकमताने पारित

केलेल्या ठरावासह राज्यपालांना पत्र सादर केले. या पत्रात श्री शिंदे यांनी भाजपच्या एकशे सहा आमदारांसह सतरा अपक्ष व इतर आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा केला आहे. आपल्याला बहुमताचा पाठिंबा असल्याचा दावा करत श्री शिंदे यांनी राज्यपालांनी त्यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी आमंत्रित करण्याची विनंती केली. ३० जून २०२२ रोजी शिवसेना, भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी वगळता इतर पक्षांचे अपक्ष उमेदवार असलेल्या सोळा आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहून श्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दर्शवला होता. त्याच दिवशी राज्यपालांनी शिंदे यांना पत्र पाठवून मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचे आमंत्रण दिले आणि मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर सात दिवसांच्या कालावधीत आपल्याला विधानसभेचा विश्वास आहे हे सिद्ध करण्याची विनंती केली.

१९. ३० जून २०२२ रोजी राज्यपालांनी श्री.शिंदे यांना पदाची शपथ दिली आणि त्यांनी व श्री फडणवीस यांनी अनुक्रमे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे स्वीकारली. त्याच दिवशी श्री उद्धव ठाकरे यांनी श्री शिंदे यांना पत्र पाठवून पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील 'शिवसेना नेते' पदावरून हटविण्यात आल्याचे म्हटले होते. त्याचप्रमाणे श्री ठाकरे यांनी शिवसेनेच्या इतर आमदारांना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या पदावरून काढून टाकले.

## i. <u>सभापतींची निवड</u>

२०. त्याच आठवड्यात त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेच्या प्रधान सचिवांनी ३ जुलै २०२२ रोजी होणाऱ्या अधिवेशनाचा कार्यादेश जारी केला. विषयसूचीवरील वरील पाचव्या विषयामध्ये सभापती पदाची निवडणूक होणार असल्याचे प्रतिबिंबित झाले होते.

भाजपच्या एका आमदाराने या पदासाठी भाजपचे श्री राहुल नार्वेकर यांना उमेदवारी दिली, तर शिवसेनेच्या एका आमदाराने (भासमान ठाकरे गटाच्या) शिवसेनेच्या श्री राजन साळवी यांना उमेदवारी दिली. मुख्यमंत्री श्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाचा विश्वासदर्शक ठराव ४ जुलै २०२२ रोजी विधानसभेच्या अधिवेशनात मांडला जाणार होता.

२१. विधानसभेच्या अधिवेशनाचा अजेंडा लक्षात घेऊन श्री सुनील प्रभू यांनी २ जुलै २०२२ रोजी दोन पक्षादेश जारी केले. पहिल्या पक्षादेशामध्ये शिवसेनेच्या सर्व आमदारांना ४ जुलै २०२२ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाला उपस्थित राहून मुख्यमंत्री श्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाच्या विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात मतदान करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुसऱ्या पक्षादेशामध्ये शिवसेनेच्या सर्व आमदारांना ३ जुलै २०२२ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाला उपस्थित राहून सभापतीपदाच्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार राजन साळवी यांना मतदान करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

२२. सभापतीपदाची निवडणूक ठरल्याप्रमाणे पार पडली आणि भाजपचे श्री राहुल नार्वेकर यांच्या बाजूने एकूण एकशे चौसष्ट मते पडली. शिवसेनेचे ३९ आमदार (नेतृत्व श्री शिंदे) यांनी राहुल नार्वेकर यांच्या उमेदवारीच्या बाजूने मतदान केले. परिणामी श्री सुनील प्रभू यांनी या आमदारांविरुद्ध त्यांनी जारी केलेल्या पक्षादेशाचे उल्लंघन केल्याबद्दल, राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टातील परिच्छेद २ (१) (ब) अन्वये अपात्रतेची कारवाई सुरू केली.

२३. सभापतीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर श्री राहुल नार्वेकर यांनी श्री अजय चौधरी यांना शिविपच्या नेतेपदी दिलेली मान्यता रद्द करून त्यांच्या जागी श्री एकनाथ शिंदे यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली. श्री सुनील प्रभू यांच्याऐवजी श्री भरत गोगावले यांना शिवसेनेचे मुख्य प्रतोद म्हणून मान्यता दिली. विधानसभा अध्यक्षांच्या या निर्णयांची नोंद महाराष्ट्र विधानसभेच्या उपसचिवांनी ३ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या पत्रात करण्यात आली होती, ज्याचा संबंधित भाग खाली दिलेला आहे:

> "... विचारविनिमयानंतर... महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी श्री.अजय चौधरी यांना शिवसेना विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून दिलेली मान्यता रद्द केली असून दिनांक ३१ ऑक्टोबर २०१९ च्या पत्रानुसार श्री.एकनाथ शिंदे यांची शिवसेना विधिमंडळ पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे श्री सुनील प्रभू यांची शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या मुख्य प्रतोद पदी नियुक्ती करण्याचा प्रस्ताव रद्द करून शिवसेनेच्या विधिमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून श्री भरत गोगावले यांच्या नावाला मान्यता देऊन त्यांच्या नावाची नोंद घेण्यात आली आहे.

श्री भरत गोगावले यांनी ३ जुलै २०२२ रोजी पक्षादेश जारी करून शिवसेनेच्या सर्व आमदारांना ४ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनाला उपस्थित राहून मुख्यमंत्री श्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाच्या विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने मतदान करण्याचे निर्देश दिले.

२४. थोडक्यात - जून २०२२ मध्ये श्री ठाकरे मुख्यमंत्री होते, श्री शिंदे शिविप चे नेते होते आणि श्री सुनील प्रभू शिवसेनेचे मुख्य प्रतोद होते. मात्र, ३ जुलै २०२२ पर्यंत श्री ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि श्री शिंदे मुख्यमंत्री झाले, श्री अजय चौधरी यांना शिविप चे नेते म्हणून मान्यता देण्यात आली आणि नंतर त्यांच्या जागी श्री शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आणि सुनील प्रभू यांच्या जागी भरत गोगावले यांना मुख्य प्रतोद म्हणून मान्यता देण्यात आली. त्यांनी केलेल्या आणि सभापती किंवा उपसभापतींना यथास्थिती कळवलेल्या नियुक्त्या कायदेशीर आणि वैध होत्या आणि प्रत्येक गट विरोधी गटाने केलेल्या नियुक्त्या बेकायदेशीर आणि अवैध असल्याचा दावा करत राहिला. 'खरी' शिवसेना कोण, असा प्रश्न वेळोवेळी उपस्थित झाला.

२५. विधानसभा अध्यक्षनिवडीनंतर लगेचच श्री ठाकरे यांच्या गटातील शिवसेनेच्या काही आमदारांनी (दोन वेगवेगळ्या प्रसंगी) राज्यघटनेच्या कलम १७९ (क) सह महाराष्ट्र विधानसभा नियम २०१९ च्या नियम ११ अन्वये राहुल नार्वेकर यांना सभापतीपदावरून हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस बजावली.

२६. ४ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या पटलावर विश्वासदर्शक ठराव मांडण्यात आला. श्री शिंदे यांच्यावर सभागृहाने विश्वास व्यक्त केला. परिणामी श्री सुनील प्रभू यांनी २ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या पक्षादेशाचे उल्लंघन केल्याबद्दल दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (ब) अन्वये ३९ आमदारांना (श्री. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील) अपात्र ठरविण्यासाठी नव्याने याचिका दाखल केल्या. त्याचप्रमाणे भरत गोगावले यांनी शिवसेनेच्या (श्री. ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली) चौदा आमदारांना अपात्र ठरविण्यासाठी याचिका दाखल केली. ३ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या

पक्षादेशाचे उल्लंघन केल्याबद्दल दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) आणि २ (१) (ब) अन्वये ८ जुलै २०२२ रोजी राहुल नार्वेकर यांनी नंतरच्या संचातील अपात्रता याचिकांमध्ये नोटीसा जरी केल्या.

iii . भारताच्या निवडणूक आयोगासमोरील कार्यवाही

२७. १९ जुलै २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांनी निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश १९६८[8] च्या परिच्छेद १५ अन्वये आपल्या नेतृत्वाखालील गटाला शिवसेनेचे चिन्ह म्हणजेच 'धनुष्यबाण' वाटप करण्यासाठी भारताच्या निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल केली आणि निवडणूक आयोगाने शिंदे आणि ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गटांना त्यांच्या दाव्याच्या बाजूने लेखी म्हणणे आणि इतर कोणतीही कागदपत्रे, असतील तर, सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

२८. त्यानंतर, याचिकाकर्त्यांनी २०२२ च्या रिट याचिका (सी) ४९३ मध्ये निवडणूक आयोगास सामील करून घेण्यासाठी आणि निवडणूक आयोगासमोरील कार्यवाहीला स्थगिती देण्यासाठी दोन वादकालीन अर्ज दाखल केले. या न्यायालयाने २७ सप्टेंबर २०२२ च्या आदेशाद्वारे यापैकी पहिला अर्ज (निवडणूक आयोगास रिट याचिकेमध्ये सामील करून घेण्यासाठी) मंजूर केला होता आणि याच आदेशांतर्गत, स्थगिती मागणारा मध्यस्थी अर्ज फेटाळण्यात आला.

२९. १७ ऑक्टोबर २०२२ रोजी निवडणूक आयोगाने श्री शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला धनुष्यबाण चिन्ह देण्याचा आदेश दिला.

8 चिन्ह आदेश

## बी. सध्याच्या कार्यवाहीत प्रार्थना केलेल्या दिलाशांचा सर्वसामान्य आढावा

३०. श्री ठाकरे आणि श्री शिंदे या दोघांच्या नेतृत्वाखालील गटाच्या सदस्यांनी दाखल केलेल्या सहा रिट याचिकांमधून ही कार्यवाही निर्माण होते. या प्रत्येक याचिकेत मागितलेले दिलासे संदर्भसुलभतेसाठी खालील तक्त्यात नमूद केले आहेत:

| प्रकरणाचा तपशील | मागितलेले दिलासे |
|---|---|
| रिट याचिका (दि ) क्र. ४९३/२०२२ | ए. ३० जून २०२२ रोजी चा राज्यपाल यांचा श्री एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यासाठी व सरकार स्थापनेसाठी आमंत्रण देण्याचा निर्णय रद्दबातल करण्यात यावा आणि किंवा |
| | बी. दिनांक ३ जुलै २०२२ रोजी झालेले महाराष्ट्र विधानसभेचे कामकाज रद्दबातल करण्यात यावे आणि परिणाम स्वरूप अध्यक्षांची निवड रद्दबातल करण्यात यावी आणि किंवा |
| | सी. दिनांक ४ जुलै २०२२ रोजी झालेले महाराष्ट्र विधानसभेचे कामकाज रद्दबातल करण्यात यावे आणि परिणाम स्वरूप श्री एकनाथ शिंदे यांच्या वरील विश्वास दर्शक ठराव रद्दबातल करण्यात यावा आणि किंवा |
| | डी. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद दोन (एक) (अ )आणि परिच्छेद दोन |

| | |
|---|---|
| | (एक) (ब ) अंतर्गत सभापती आणि उपसभापती यांच्यासमोर श्री एकनाथ शिंदे व त्यांच्या नेतृत्वाखालील इतर आमदार यांच्या विरुद्ध दाखल झालेल्या व प्रलंबित असलेल्या सर्व अपात्रता याचिकांमधील अभिलेख मागवण्यात यावेत आणि सदर याचिका अनुच्छेद १४२ अन्वये प्रस्तुत न्यायालयाकडे वर्ग करण्यात याव्या व त्यावर निर्णय घेण्यात यावा. |
| रिट याचिका (दि ) क्र. ४६९/२०२२ | ए. उपसभापती यांना असे निर्देश देण्यात यावेत की जोपर्यंत उपसभापती यांच्या हकालपट्टीबाबतच्या ठरावावर निर्णय होत नाही तोपर्यंत त्यांनी दहाव्या अनुसूची च्या परीक्षेत दोन एक अ अन्वये श्री एकनाथ शिंदे यांच्या अपात्रतेसाठीच्या याचिकेवर कोणतीही कारवाई करू नये. |
| | बी. मध्यंतरीच्या कालावधीत उपसभापती यांनी श्री एकनाथ शिंदे यांना जारी केलेली दिनांक २५ जून २०२२ रोजीच्या नोटीस ची अंमलबजावणी स्थगित करण्यात यावी. |
| | सी. उपसभापती यांनी दिनांक २१ जून २०२२ रोजी जारी केलेले पत्र / पारित केलेला आदेश ज्याद्वारे शिवसेना विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून श्री अजय चौधरी यांची नियुक्ती रद्दबातल करण्यात यावी |
| | डी. उपसभापती यांनी दिनांक २१ जून २०२२ रोजी जारी केलेले पत्र पारित केलेला आदेश ज्याद्वारे श्री अजय चौधरी यांची शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या नेते पदी झालेल्या नियुक्तीस मान्यता देणारी देण्यात आली होती तिला |

| | |
|---|---|
| | अंतरिम स्थगिती देण्यात यावी. |
| | ई. भारतीय संघराज्य आणि पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांना श्री एकनाथ शिंदे यांचे कुटुंब आणि त्यांचे शिवसेना विधिमंडळ पक्षातील सर्व समर्थक यांना सुरक्षा पुरविण्याचे निर्देश देण्यात यावे. |
| रिट याचिका (दि ) क्र. ४६८/२०२२ | ए. उपसभापती यांना असे निर्देश देण्यात यावेत की जोपर्यंत उपसभापती यांच्या हकालपट्टीबाबतच्या ठरावावर निर्णय होत नाही तोपर्यंत त्यांनी दहाव्या अनुसूची च्या परीक्षेत दोन एक अ अन्वये श्री एकनाथ शिंदे यांच्या अपात्रतेसाठीच्या याचिकेवर कोणतीही कारवाई करू नये. |
| | बी. मध्यंतरीच्या कालावधीत उपसभापती यांनी श्री एकनाथ शिंदे यांना जारी केलेली दिनांक २५ जून २०२२ रोजीच्या नोटीस ची अंमलबजावणी स्थगित करण्यात यावी. |
| | सी. महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक यांना निर्देश देण्यात यावेत की त्यांनी नागरिक म्हणून उपभोगावयाचे अधिकार, आमदारांचे अधिकार आणि स्वातंत्र्य यात कोणताही अडथळा होणार नाही याची सुनिश्चिती करावी आणि सर्व आमदार व त्यांची कुटुंबे यांना संरक्षण पुरविण्याची व्यवस्था करावी. |
| रिट याचिका (दि ) क्र. ४७९/२०२२ | ए. महाराष्ट्र विधानसभेच्या सभापतींनी जारी केलेले दिनांक ३ जुलै २०२२ रोजी चे पत्र रद्दबातल करण्यात यावे |
| रिट याचिका | बी. राज्यपाल यांनी श्री उद्धव ठाकरे आणि विधानसभा सचिव यांना |

| | |
|---|---|
| (दि ) क्र. ४७०/२०२२ | पाठविलेले दिनांक २८ जून २०२२ रोजी चे पत्र रद्द करण्यात यावे. |
| रिट याचिका (दि ) क्र. ५३८/२०२२ | ए. दहाव्या अनुसूची अंतर्गत सभापती यांनी दिनांक ८ जुलै २०२२ रोजी प्रस्तुत याचिकेमधील याचिकाकर्ते यांना जारी केलेले समन्स रद्दबातल करण्यात यावे. |
| | बी. श्री भरत गोगावले यांनी प्रस्तुत याचिकेमधील याचिका करते यांच्याविरुद्ध सुरू केलेली अपात्रतेची कार्यवाही रद्दबातल करण्यात यावी. |

सी) संदर्भ :-

३१. या निकालाच्या मागील भागात वर्णन केलेल्या रिट याचिका ४ ऑगस्ट २०२२ रोजी या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सूचीबद्ध केल्या गेल्या, जेव्हा याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील श्री कपिल सिब्बल आणि डॉ. अभिषेक मनु सिंघवी आणि उत्तरवादींच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील श्री हरीश साळवे यांनी या याचिकांमध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्यांना या न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे संदर्भित करण्याची आवश्यकता आहे की नाही यावर युक्तिवाद केला.

३२. २३ ऑगस्ट २०२२ च्या आपल्या आदेशाद्वारे, या न्यायालयाने हा युक्तिवाद स्वीकारला की रिट याचिकांचा हा संच राज्यघटनेच्या अनुच्छेद १४५(३) प्रमाणे पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे संदर्भित केला जावा कारण त्यामधील कायद्याच्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय होणे

बाकी आहे. त्यानुसार हे प्रकरण संदर्भित करण्यात आले. खालील मुद्दे विचारार्थ तयार करण्यात आले होते:

ए. प्रस्तुत न्यायालयाने **नबाम रेबिया** आणि **बामांग फेलिक्स वि. अरुणाचल प्रदेश**[9] **विधानसभेचे उपाध्यक्ष** या प्रकरणात निर्णय दिल्यानुसार सभापतींना हटविण्याची नोटीस त्यांना दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेची कार्यवाही सुरू ठेवण्यास प्रतिबंधित करते की नाही,

बी. उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालय यांच्या द्वारे यथास्थिती, अपात्रता याचिकेवर निर्णय घेण्यासाठी अनुच्छेद २२६ किंवा अनुच्छेद ३२ अन्वये केलेली याचिका दाखल करणे शक्य आहे का ?

सी. सभापतींच्या निर्णयाअभावी एखाद्या सदस्याला त्याच्या कृतीमुळे अपात्र ठरविले जाते, या मुद्द्यावर न्यायालय निर्णय देवू शकते का;

डी. सदस्यांविरोधातील अपात्रता याचिका प्रलंबित असताना सभागृहातील कामकाजाची स्थिती काय आहे;

इ. एखाद्या सदस्याला दहाव्या अनुसूचीनुसार अपात्र ठरविण्यात आल्याचा सभापतींचा निर्णय तक्रार केलेल्या कारवाईच्या तारखेशी संबंधित असेल, तर अपात्रता याचिका प्रलंबित असताना झालेल्या कार्यवाहीची स्थिती काय आहे;

9 (२०१६) ८ एससीसी १

एफ. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ३ काढून टाकण्याचा काय परिणाम होतो;

जी. प्रतोद आणि सभागृह विधिमंडळ पक्षनेता ठरविण्याच्या सभापतींच्या अधिकाराची व्याप्ती काय आहे? दहाव्या अनुसूचीतील तरतुदींच्या संदर्भात त्याचा परस्परसंबंध काय आहे;

एच. पक्षांतर्गत निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनास पात्र आहेत का? त्याची व्याप्ती काय आहे;

आय. एखाद्या व्यक्तीला सरकार स्थापनेसाठी निमंत्रित करण्याचा राज्यपालांचा स्वेच्छाधिकार आणि अधिकार यांची व्याप्ती किती आहे आणि तो न्यायालयीन पुनरावलोकनास योग्य आहे का; आणि

जे. पक्षांतर्गत फूट पाडण्याच्या निर्णयासंदर्भात भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिकारांची व्याप्ती काय आहे?

डी. सादर केलेले निवेदन :-

i. **नबाम रेबिया** यांचे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे सोपवावे की नाही, यावर युक्तिवाद

३३. पक्षकारांच्या वतीने बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ वकिलांनी मागील परिच्छेदात नमूद केलेल्या मुद्द्यांपैकी पहिल्या मुद्द्यावर या न्यायालयाला संबोधित केले, म्हणजे या

न्यायालयाने **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणात निर्णय दिल्यानुसार, सभापतींना हटविण्यासाठी ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस त्यांना घटनेच्या दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेची कार्यवाही सुरू ठेवण्यास प्रतिबंधित करते की नाही.

३४. याचिकाकर्त्यांच्या वतीने कपिल सिब्बल, डॉ. अभिषेक मनु सिंघवी आणि श्री देवदत्त कामत यांनी बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादाला उत्तरवादींची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील हरीश साळवे, नीरज किशन कौल, महेश जेठमलानी, मनिंदर सिंग आणि सिद्धार्थ भटनागर यांनी विरोध केला. महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने विद्वान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडली.

३५. नबाम रेबिया (उपरोल्लेखित) या प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने इतर गोष्टींसह असा निर्णय दिला की, सभापतींनी त्यांना सभापती पदावरून काढून टाकण्याच्या ठरावाच्या इराद्याची नोटीस जारी झाल्यानंतर दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रता याचिकांवर निर्णय देणे अनुज्ञेय नाही. याचिकाकर्त्यांनी विनंती केली आहे की नबाम रेबिया (उपरोल्लेखित) मधील निर्णयाचा हा पैलू या न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे पाठविण्यात यावा कारण:

> **ए. किहोतो होलोहान विरुद्ध झाचिल्हू**[10] या खटल्यात या न्यायालयाच्या घटनापीठाने असा निर्णय दिला कि, अपवादात्मक परिस्थिती वगळता वादकालीन कालावधीत दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद ६ अन्वये अपात्रतेच्या कार्यवाहीत न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. **नबाम रेबिया**

10 (१९९२) एसयूपिपी (२) एससीसी ६५१

(उपरोल्लेखित) मधील निर्णयानुसार, सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस जारी केल्यावर दहाव्या अनुसूचीनुसार कार्यवाहीस मनाई  असेल. हे वादकालीन कालावधीत मध्यस्थीच्या टप्प्यावर अपात्रतेच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यासारखे आहे. **किहोटो होलोहान** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील मधील  निर्णय आणि **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील मधील  निर्णय हे परस्परविरोधी आहेत. ;

बी. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयाचा पक्षांतर करणाऱ्या आमदारांकडून गैरवापर होण्याची शक्यता आहे, ज्यांचा परिणाम स्वरूप घटनेच्या कलम १७९ अन्वये सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस बजावून सभापतींना अपात्रतेची कार्यवाही करण्यास अक्षम करून दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रता टाळता येऊ शकते. अयोग्यरित्या काढून टाकल्यास सभापतींना कोणताही उपाय उरत नाही, तर अपात्र ठरलेला सदस्य बेकायदेशीररित्या अपात्र ठरल्यास न्यायालयीन पुनरावलोकनाचा उपाय वापरू शकतो;

सी. त्यांना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस जारी केल्यावर दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेची कार्यवाही करण्यास सभापती अक्षम आहेत, असे मानून, **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयाचा प्रभाव खालीलप्रमाणे आहे:

i. दहाव्या अनुसूचीनुसार न्यायाधिकरण म्हणून सभापतींची भूमिका आणि राज्याच्या विधानमंडळाचा अधिकारी म्हणून सभापतींची भूमिका यातील फरक पुसून टाकणे.

ii. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ६ नुसार न्यायाधिकरणाच्या कामकाजातील सातत्याचा भंग करणे, आणि

iii. दहाव्या अनुसूचीच्या अंमलबजावणीत घटनात्मक अडथळा निर्माण करणे.

डी. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील मधील निर्णय राज्यघटनेच्या कलम १७९ (सी) मधील "विधानसभेचे सर्व तत्कालीन सदस्य" या वाक्याच्या अर्थावर आधारित आहे ज्याचा अर्थ असा आहे की सभापतींना हटविण्याचा प्रस्ताव आणण्याच्या इराद्याची नोटीस जारी झाल्यानंतर सभागृहाची रचना आणि संख्याबळ बदलता येणार नाही. हे विवेचन खालील मुद्द्यांच्या विरुद्ध आहे:

i. कलम १७९ ची साधी भाषा;

ii. कलम १८१ चे तात्पर्य; आणि

iii. संविधान सभेच्या वादविवादातील चर्चेचा निष्कर्ष.

ई. **राजेंद्रसिंह राणा विरुद्ध स्वामी प्रसाद मौर्य**[11] या खटल्यातील न्यायालयाच्या निर्णयानुसार, एखाद्या आमदाराला अपात्र ठरविणे हे दहाव्या अनुसूचीनुसार प्रतिबंधित वर्तनाच्या तारखेशी संबंधित आहे. अपात्र ठरलेल्या आमदारांनी त्यांच्यावर ज्या तारखेला बंदी घातली त्या तारखेनंतर सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या हेतूने नोटीस बजावण्याची शक्यता राज्यघटनेच्या आराखड्यात दृष्टीसमोर ठेवलेली नाही.

३६. याचिकाकर्त्यांच्या वतीने मांडण्यात आलेल्या युक्तिवादाला उत्तरवादींनी विरोध केला. त्यांनी सादर केले की **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निर्णय खालील कारणांसाठी या न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही:

ए. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निर्णय नैतिकतेवर आणि घटनात्मक विचारविनिमयावर आधारित आहे. एखाद्या आमदाराला सभापतींनी अन्यायकारकरीत्या अपात्र ठरविले आणि त्यांची अपात्रता न्यायालयाने रद्द केली, तर सभापतींना हटविण्याच्या ठरावावर मतदान करण्याची संधी तसेच सभागृहाच्या इतर कामकाजात सहभागी होण्याची संधी त्यांना गमवावी लागली असती. दुसरीकडे, सभापतींना अन्यायकारकरित्या पदावरून हटवल्यास ते सभागृहाचे सदस्यत्व गमावत नाहीत आणि परिणामी सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेण्याचा

11 (२००७) ४ एससीसी २७०

अधिकार राखून ठेवतात  तसेच त्यांची सभापतीपदी पुन्हा निवड होऊ शकते;

बी. सभागृहाचा विश्वास असेल तरच सभापती दहाव्या परिशिष्टानुसार न्यायाधिकरण म्हणून काम करू शकतात;

सी. अनुच्छेद १८१ (१) नुसार सभापती, त्यांच्या हकालपट्टीचा प्रस्ताव प्रलंबित असताना विधानसभेत अध्यक्षपद भूषवू शकत नाहीत. ;

डी. **किहोटो होलोहान** (उपरोल्लेखित) मधील निर्णय याला अपवाद आहे आणि तो  सामान्य नियम नाही. अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यापासून सभापतींना अक्षम करणे, त्यांना हटविण्यासाठी ठराव मांडण्याच्या हेतूने नोटीस जारी करणे हे **किहोतो होलोहान** (उपरोल्लेखित) मधील निर्णयाशी विसंगत नाही कारण सभापतींना अक्षम करणे मध्यस्थीच्या टप्प्यावर हस्तक्षेप करणे नाही; आणि

ई. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) येथे घटनापीठाने आमदारांविरोधात अपात्रतेची कारवाई सुरू असताना सभापतींच्या भूमिकेशी संबंधित मुद्दा उपस्थित केला. हा मुद्दा 'कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न' राहिला नसून  घटनेच्या कलम १४५ (३) अन्वये तो मोठ्या खंडपीठाकडे पाठवता येणार नाही.

३७. महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांची बाजू मांडणारे विद्वान सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी उपस्थित राहून खालील कारणांमुळे **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) प्रकरण

मोठ्या खंडपीठाकडे संदर्भित करण्याचे समर्थन करत नाही असे कळकळीने म्हणणे मांडले.

ए. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) प्रकरणातील न्यायनिर्णय कायद्यांच्या खऱ्या वस्तुस्थितीवर आधारित नाही असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे नाही. यात सर्व संबंधित पैलू, उदाहरण आणि घटनात्मक तरतुदींचा विचार केला आहे ;

बी. सभापतींच्या तात्पुरत्या अक्षमतेचा गैरवापर होण्याची शक्यतेचा **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणात विचार केला आहे. ;

सी. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) प्रकरणातील न्यायनिर्णय सभागृहाच्या सदस्याला अपात्रतेपासून वाचवते हा दावा चुकीचा आहे कारण सभागृहातील बहुमत संशयाच्या भोवऱ्यात नसलेल्या सभापतींकडून सदस्यांवर नेहमीच अपात्रतेची कारवाई केली जाऊ शकते;

डी. सभापती दहाव्या अनुसूचीनुसार "न्यायाधिकरण" म्हणून आणि सभागृहाच्या नियमांनुसार "राज्य विधिमंडळाचा अधिकारी" म्हणून वेगवेगळी कामे करत असले तरी दोन्ही कामे करण्याचा त्यांचा अधिकार एकाच स्त्रोतातून मिळतो, तो म्हणजे सभागृहातील बहुमताचा विश्वास; आणि

इ . **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) मधील न्यायनिर्णय व **किहोटो होलोहान** (उपरोल्लिखित) च्या न्यायनिर्णयांशी परस्परविरोधी नाही कारण नंतरचे प्रकरण, जिथे गंभीर, सुस्पष्ट आणि कधीही भरून न निघणारे परिणाम" आहेत अशा चुकीच्या कृतींना परवानगी देते.

३८. १७ फेब्रुवारी २०२३ च्या आपल्या आदेशाद्वारे, या न्यायालयाने निर्देश दिले की नबाम रेबिया (उपरोल्लिखित) मधील निर्णयानुसार प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठविणे आवश्यक आहे की नाही, हा मुद्दा खटल्याच्या गुणवत्तेसह निश्चित केला जाईल. आदेशात असे म्हटले आहे:

> ८. सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाकडे प्रकरण संदर्भित करावे कि नाही या मुद्द्याचा सारांशात विचार करता येणार नाही; खटल्यातील वस्तुस्थितीपासून अलिप्त किंवा त्यापासून फारकत घेऊन करता येणार नाही. **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) मध्ये व्यक्त करण्यात आलेल्या वरील तत्त्वाचा सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीवर परिणाम होतो का, यावर विचार करण्याची गरज आहे.
>
> ९. वरील पार्श्वभूमीवर **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) मधील निर्णय संदर्भ मोठ्या खंडपीठाकडे संदर्भित करणे आवश्यक आहे का, हा मुद्दा खटल्याच्या गुणवत्तेसह निश्चित केला जाईल.

३९. त्यानंतर पक्षकारांच्या वकिलांची बाजू या खटल्याच्या गुणवत्तेवर ऐकून घेण्यात आली.

ii. खटल्याच्या गुणवत्तेवर सादरीकरण

४०. याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री कपिल सिब्बल यांनी खालील युक्तिवाद केला:

ए. घटनात्मक न्यायालय राज्यघटनेच्या कलम ३२ आणि २२६ अन्वये आपल्या अधिकाराच्या आधारे दहाव्या अनुसूचीतील तरतुदींनुसार एखाद्या आमदाराला अपात्र ठरविले जाते की नाही याचा निर्णय घेऊ शकते. **राजेंद्रसिंह राणा** (उपरोल्लिखित) या प्रकरणात या न्यायालयाने या अपवादात्मक शक्तीला मान्यता दिली आहे. खालील अपवादात्मक परिस्थिती दर्शविते की या न्यायालयाने या कार्यवाहीत अपात्रता याचिकांवर निर्णय घ्यावा:

i. अपात्रता याचिका दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटनांची घटनात्मकता, म्हणजे राज्यपालांनी २८ जून २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना बहुमत चाचणीला सामोरे जाण्याचे निर्देश देणे, ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणे, ३ जुलै २०२२ रोजी सभापतींची नियुक्ती, ४ जुलै २०२२ रोजी झालेली बहुमत चाचणी आणि श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाने चिन्हआदेशाच्या परिच्छेद

१५ अन्वये दाखल केलेल्या याचिकेस या न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे;

ii. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या आमदारांच्या गटाच्या पाठिंब्याने सभापतींची नियुक्ती करण्यात आली. सभापती स्वत: पक्षपाती आणि दुर्भावनापूर्ण पद्धतीने वागले आहेत. ३ जुलै २०२२ रोजीच्या पत्रात सभापतींनी श्री अजय चौधरी आणि श्री सुनील प्रभू यांना अनुक्रमे शि वि प चे नेते आणि शिवसेनेचे मुख्य प्रतोद म्हणून मान्यता रद्द केली आणि त्याऐवजी अनुक्रमे श्री एकनाथ शिंदे आणि श्री भारत गोगावले यांना मान्यता दिली. अपात्रतेच्या कार्यवाहीत अध्यक्षांचा निर्णय मुख्य प्रतोद म्हणून कोणाला मान्यता देण्यात आली यावर अवलंबून असेल, ज्यास देखील आताच्या कार्यवाहीच्या संचात आव्हान दिले आहे.

iii. घटनात्मक न्यायालयाने अपात्रता याचिकांवर निर्णय देताना, आमदारांविरुद्ध, अपात्रता आपोआपच सिद्ध होते का याबाबत निर्णय घेतला पाहिजे.

iv. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीत श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाविरुद्ध दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) अन्वये अपात्रता आपोआपच सिद्ध झाली आहे कारण :

i. २१ जून २०२२ आणि २२ जून २०२२ रोजी झालेल्या शि वि पच्या बैठकांना ते मुद्दाम उपस्थित राहिले नाहीत;

ii. २२ जून २०२२ रोजी त्यांनी श्री शिंदे यांची शि वि पच्या नेतेपदी आणि श्री गोगावले यांची मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्याचा बेकायदा ठराव संमत केला; आणि

iii. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाने तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यपालांची भेट घेतली. शिंदे गटाच्या आमदारांची भाजपशी युती शिवसेनेच्या राजकीय पक्षाच्या इच्छेविरुद्ध होती.

iv. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीनुसार श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाविरुद्ध दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (ब) अन्वये अपात्रता आपोआपच सिद्ध झाली आहे. २ जुलै २०२२ रोजी, सुनील प्रभू यांनी सभापती निवडीसाठी पक्षादेश जारी केला. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाने पक्षादेशाचे उल्लंघन करून भाजपने उमेदवारी दिलेले उमेदवार राहुल नार्वेकर यांच्या बाजूने मतदान केले.

vi. दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रता ही त्या तारखेशी संबंधित आहे ज्या तारखेला आमदार अपात्र ठरण्याच्या कृत्यात गुंतला होता. त्यामुळे अपात्रतेची प्रक्रिया प्रलंबित असताना सभागृहात झालेल्या कामकाजाचा निकाल अपात्रता याचिकांवर सभापतींच्या निर्णयावर अवलंबून असेल. त्याच धर्तीवर विश्वासदर्शक ठरावाचा

निकाल अपात्रतेच्या प्रक्रियेतील निर्णयावर अवलंबून असेल. याव्यतिरिक्त, या न्यायालयाने २९ जून २०२२ च्या आपल्या आदेशाद्वारे राज्यपालांच्या विश्वासदर्शक ठराव घेण्याच्या निर्देशाला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिकाकर्त्यांची रिट याचिका फेटाळून लावत म्हटले की, विश्वासदर्शक ठरावाची कार्यवाही रिट याचिकेच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल;

vii. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाने आपणच "खरी" शिवसेना असल्याचा दावा केला आहे. तसेच त्यांनी चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये कार्यवाही सुरू केली आहे. प्रत्यक्षात उत्तरवादींचा बचाव हा विभाजनाचा आहे. राज्यघटना (नव्वदावी सुधारणा) कायदा २००३ द्वारे दहाव्या अनुसूचीतून वगळण्यात आलेला विभाजनाचा बचाव उत्तरवादींना, अपात्र ठरणाऱ्या कृतींसाठी बचाव म्हणून वापरता येणार नाही;

बी. श्री गोगावले यांची मुख्य प्रतोदपदी नियुक्ती करण्याचा प्रतिवादींनी २१ जून २०२२ रोजी केलेला कथित ठराव आणि ३ जुलै २०२२ रोजी सभापतींनी श्री गोगावले यांना मुख्य प्रतोद म्हणून मान्यता देण्याचा केलेला पत्रव्यवहार बेकायदेशीर असून तो रद्द करण्यात यावा. मुख्य प्रतोद आणि विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची नेमणूक विधीमंडळ पक्षाने नव्हे तर राजकीय पक्षाने केली पाहिजे कारण:

i. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २(१)(ब) नुसार पक्षादेश राजकीय पक्षाने (विधिमंडळ पक्षाने नव्हे) किंवा राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने जारी केला पाहिजे. त्यामुळे विधिमंडळ पक्षाच्या बहुमताने पक्षादेश जारी करता येत नाही किंवा त्यात बदल करता येत नाही. परिच्छेद १ (ब) आणि १ (क) मधील मजकूर दहाव्या अनुसूचीच्या उद्देशाने विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष यांच्यात फरक दर्शवतो. दहाव्या अनुसूचीच्या या नमूद केलेल्या मजकुराला श्रीनिवासन, जे. यांनी **मायावती विरुद्ध मार्कंडेय चंद**[12] या खटल्यात आपल्या वेगळ्या मताने दुजोरा दिला आहे.

ii. विधिमंडळ पक्षातील बहुसंख्य गट हा दहाव्या अनुसूचीच्या उद्देशांसाठी राजकीय पक्ष मानला जाऊ शकत नाही;

iii. महाराष्ट्र विधिमंडळ सदस्य (अपात्रता निर्मूलन) अधिनियम १९५६ च्या कलम २३ च्या स्पष्टीकरणात[13] अशी तरतूद आहे की, महाराष्ट्र विधानसभेच्या संदर्भात मुख्य प्रतोद म्हणजे सभागृहाचा असा सदस्य ज्यास सरकार स्थापन करणाऱ्या पक्षाने प्रतोद म्हणून घोषित केले;

iv. घटना (५२ वी दुरुस्ती) कायदा १९८५ मध्ये पक्षांतराच्या कारणास्तव आमदारांना अपात्र ठरवून संसदीय लोकशाहीतील

12 (१९९८) ७ एससीसी ५१७
13 "१९५६ चा अधिनियम"

राजकीय पक्षांची भूमिका मान्य करण्यात आली;

v. सभापतींचा निर्णय प्रक्रियात्मक अनियमिततेच्या आधारे रद्द आला पाहिजे. अध्यक्षांनी ३ जुलै २०२२ रोजी श्री. गोगावले यांना मुख्य प्रतोद म्हणून मान्यता देणारे पत्र जारी करण्यापूर्वी राजकीय पक्षाला सुनावणीची संधी दिली नाही ;

vi. प्रतोद यांना मान्यता देण्याचा सभापतींचा निर्णय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१२ मधील तरतुदींद्वारे न्यायालयीन पुनरावलोकनातून वगळला जात नाही. घटनेच्या अनुच्छेद २१२ मध्ये केवळ प्रक्रियात्मक अनियमिततेच्या आधारावर 'राज्याच्या विधिमंडळातील कामकाजा'चा न्यायालयीन आढावा घेण्यास मनाई करण्यात आली आहे. **राजा राम पाल विरुद्ध माननीय लोकसभा अध्यक्ष**[14] या प्रकरणात या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की अनुच्छेद २१२ मध्ये मूलभूत किंवा गंभीर बेकायदेशीरतेच्या आधारावर न्यायालयीन पुनरावलोकन वगळलेले नाही; आणि

vii. विधिमंडळ पक्षनेत्याची नेमणूक राजकीय पक्षानेच केली पाहिजे. विधिमंडळ पक्षाला राजकीय पक्षाने निवडलेल्या उमेदवारापेक्षा वेगळा नेता नेमण्याची मुभा दिल्यास राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील दुवा तुटणार आहे.

14 (२००७) ३ एससीसी १८४

सी. दहाव्या अनुसूचीच्या उद्देशाने ज्या आमदाराने स्वेच्छेने सदस्यत्व सोडले आहे असे सभापतींनी मान्य केले आहे, तो आमदार चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये कार्यवाही सुरू करू शकत नाही कारण ते यापुढे सदर राजकीय पक्षाचा भाग राहणार नाहीत. त्यामुळे अपात्र ठरविण्यात आलेल्या फुटलेल्या गटाच्या सदस्यांना सदर चिन्ह आदेश कायद्यांतर्गत राजकीय पक्ष असल्याचा दावा करण्याची परवानगी देता येणार नाही.

डी. निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा दहाव्या अनुसूचीतील तरतुदींनुसारच्या कार्यवाहीवर कोणताही परिणाम होत नाही कारण: (१) अपात्रता, अपात्र ठरण्याच्या कृतींच्या तारखेशी संबंधित आहे; आणि (ii) निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा ज्या तारखेला चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये कार्यवाही सुरू करण्यात आली किंवा त्या कार्यवाहीत निवडणूक आयोगाचा निर्णय जाहीर झाला त्या तारखेपासून केवळ संभाव्य परिणाम होईल. ;

ई. राज्यपालांनी २८ जून २०२२ रोजी विश्वासदर्शक ठराव मांडण्याची मागणी केल्याचे पत्र बेकायदेशीर आहे. विश्वासदर्शक ठराव मागविण्याचा राज्यपालांचा अधिकार अनिर्बंध नाही. बहुमत चाचणी घेण्याचे निर्देश देण्याचा राज्यपालांचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन आहे आणि तो बाह्य विचारांवर आधारित असेल तर तो रद्द केला जाऊ शकतो.

राज्यपालांनी २८ जून २०२२ रोजी बहुमत चाचणी घेण्याचा घेतलेला निर्णय बेकायदेशीर होता कारण:

i. राज्यपालांनी ज्या शि वि प च्या ३४ सदस्यांच्या ठरावावर विश्वास ठेवला आहे, त्यात महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा इरादा असल्याचे नमूद केलेले नाही; आणि

ii. आपल्याच राजकीय पक्षाने स्थापन केलेल्या सरकारविरोधात शि वि प च्या बहुमताच्या दाव्यावर राज्यपाल समाधान मानू शकत नाहीत;

एफ. राज्यपालांनी ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचे आवाहन केलेले पत्र घटनाबाह्य असून ते खालील कारणांसाठी रद्द करण्यात यावे.

i. राज्यपालांनी श्री शिंदे यांना शपथविधीसाठी बोलावणे म्हणजे शिवसेनेत फूट पडल्याची कबुली आहे ; श्री शिंदे यांच्याविरोधात अपात्रतेची याचिका प्रलंबित असताना, राज्यपाल श्री शिंदे यांना सरकार स्थापनेसाठी बोलावू शकले नसते; या न्यायालयाने **रामेश्वर प्रसाद वि. भारत संघराज्य**[15] या प्रकरणात, राज्यपालांनी ज्या प्राधान्यक्रमाने सरकार स्थापनेचे आवाहन करावे, त्यासंदर्भातील

15 (२००६) २ एससीसी १

सरकारिया आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या आहेत. राज्यपालांनी प्राधान्यक्रमाच्या या आदेशाचे पालन केले नाही;

iv. एखाद्या सदस्याला अपात्र ठरविण्याचा सभापतींचा निर्णय कार्योत्तर असतो. अपात्रतेची कथित कारवाई ज्या तारखेस झाली त्या तारखेच्या परीस्थितीनुसार सभापतींनी निर्णय घ्यावा. घटनेच्या अनुच्छेद १६४ (१-ब) मधील मर्यादा लक्षात घेता विधानसभेच्या अपात्र सदस्याची मंत्री म्हणून नियुक्ती करता येत नाही.

ग. या न्यायालयाच्या २७ जून २०२२ च्या आदेशामुळे दहाव्या अनुसूचीच्या अंमलबजावणीत खंड पडला.

४१. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील डॉ. अभिषेक मनु सिंघवी यांनी पुढील युक्तिवाद केला.

अ. खालील कारणांमुळे २७ जून २०२२ पूर्वीची स्थिती पूर्ववत करणे आवश्यक आहे:

i. या न्यायालयाने २७ जून २०२२ रोजी उत्तरवादींना अपात्रता याचिकांना उत्तर देण्यासाठी दिलेली मुदत वाढविण्याच्या आदेशामुळे सभापतींच्या कार्यपद्धतीवर नकारात्मक परिणाम झाला. या न्यायालयाने २९ जून २०२२ रोजी दिलेल्या विश्वासदर्शक ठरावास स्थगिती देण्यास नकार देण्याचा आदेश हा सकारात्मक आदेश

होता. या न्यायालयाच्या वरील आदेशांमुळे महाराष्ट्र राज्यातील सरकार बदलले नसते.

(इंदूर विकास प्राधिकरण वि.मनोहर लाल[16] यावर भर दिला.)

ii. या न्यायालयाने २७ जून २०२२ रोजी दिलेला आदेश किहोतो होलोहान (उपरोल्लिखित) येथील घटनापीठाच्या निर्णयाच्या विरुद्ध आहे, ज्यामध्ये दहाव्या अनुसूचीअंतर्गत सभापतींच्या निर्णयापूर्वीच्या टप्प्यावर न्यायालयीन पुनरावलोकन उपलब्ध करून देता येणार नाही, असे म्हटले होते. या आदेशाद्वारे न्यायालयाने आपापल्या क्षेत्रातील विविध घटनात्मक पदाधिकाऱ्यांच्या अनिर्बंध कारभाराचा नाजूक समतोल साधला;

iii. २९ जून २०२२ रोजी या न्यायालयाच्या आदेशानुसार विश्वासदर्शक ठराव "त्वरित रिट याचिकेच्या तसेच वर नमूद केलेल्या रिट याचिकांच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल." अशा प्रकारे, परिणाम आणि निर्माण झालेली नवीन स्थिती त्वरित कार्यवाहीच्या अंतिम निकालाच्या अधीन असणे आवश्यक आहे. 27 जून 2022 पर्यंत ची स्थिती पूर्ववत करणे आवश्यक आहे. पूर्वीची स्थिती पूर्ववत करण्याचे न्यायालयाचे अधिकार अनाठायी नाहीत. या न्यायालयाने नबाम रेबिया (उपरोल्लिखित) मध्ये यथास्थिती ठेवण्याचे निर्देश दिले; आणि

16 (२०२०) ८ एससीसी १२९

iv. या न्यायालयाने दहाव्या अनुसूचीच्या अंमलबजावणीमागील हेतू अंमलात आणण्यासाठी यथास्थितीचे निर्देश दिले पाहिजेत, जे राजकीय पक्षांतराच्या अनिष्टतेला आळा घालण्यासाठी आहेत.

बी. ३ जुलै २०२२ रोजी सायंकाळी सभापतीपदी नियुक्ती झाल्यानंतर लगेचच राहुल नार्वेकर यांनी उपसभापतींच्या २१ जून २०२२ च्या आदेशाची आठवण करून दिली ज्यात श्री अजय चौधरी यांना शि वि प चे नेते आणि श्री भरत गोगावले यांना

शिविपचे मुख्य प्रतोद म्हणून मान्यता देण्यात आली. उपसभापतींच्या २१ जून २०२२ च्या आदेशाची वैधता या न्यायालयासमोर न्यायप्रविष्ट होती. शिवाय, त्यांच्या नियुक्तीनंतर सभापतींनी उत्तरवादींनी दाखल केलेल्या अपात्रता याचिकेवरच नोटीस बजावली. सभापतींनी तटस्थता आणि स्वातंत्र्याच्या भावनेच्या विरुद्ध वर्तन केले आहे. अपात्रतेच्या याचिकेवर सभापतींना निर्णय घेण्याची परवानगी देणे म्हणजे पक्षांतराला प्रोत्साहन देण्यासारखे ठरेल. त्यामुळे अपात्रतेच्या याचिकांवर सभापतींनी नव्हे, तर या न्यायालयाने निर्णय घ्यावा;

सी. अपात्रता याचिकांची वैधता विचाराधीन असताना राज्यपाल विश्वासदर्शक ठरावाचे निर्देश देऊ शकले नसते;

डी. राज्यपालांनी २८ जून २०२२ रोजी लिहिलेल्या पत्रात शिवसेना पक्षातील फुटीला मान्यता देण्यात आली आहे. परंतू फुटीला मान्यता देण्याचा अधिकार त्यांना नाही;

**ई. एस. आर. बोम्मई वि. भारतीय संघराज्य**[17] या प्रकरणात निर्णय दिला कि जर राष्ट्रपतींची घोषणा अवैध ठरल्यास, जाहीरनामा जारी करण्यापूर्वीची स्थिती पूर्ववत करणे न्यायालयासाठी खुले असेल. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी या घोषणेला मंजुरी दिली तरी पूर्वीची स्थिती पूर्ववत होऊ शकते, असे मत व्यक्त करण्यात आले. पूर्वीची स्थिती पूर्ववत करताना दिलासा नव्याने देणे न्यायालयासाठी खुले असेल, असेही मत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे वादकालीन कालावधीत मंजूर झालेले कायदे अवैध ठरणार नाहीत, असे ठरवून नव्याने दिलासा देण्याचा अधिकार या न्यायालयाला आहे, परंतु सभापतींच्या निवडीसारख्या अपात्रतेच्या कार्यवाहीतील इतर कृती, सभापतींना मतदान करणाऱ्यांना अपात्र ठरविण्यात आल्यास अवैध ठरतील;

एफ. अनुच्छेद १८९ (२) केवळ सदस्यांच्या पात्रतेमुळे कार्यवाहीला आव्हान आहे आणि कामकाजाच्या वैधतेला कोणतेही आव्हान नाही अशा परिस्थितीतच लागू होते . मात्र, या प्रकरणात राज्यपालांनी विश्वासदर्शक ठरावाचे निर्देश देण्याच्या निर्णयाला आधीच आव्हान देण्यात आले आहे.

17 (१९९४) ३ एससीसी १

राज्यपालांच्या या कृतीला कलम १८९ (२) नुसार न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त केले जाऊ शकत नाही;

जी. २९ जून २०२२ रोजी उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्याने राज्यपालांनी विश्वासदर्शक ठराचे निर्देश देताना केलेल्या कारवाईतील बेकायदेशीरपणा कमी होऊ शकत नाही;

एच. चिन्हआदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये निवडणूक आयोगाच्या निर्णयाचा संभाव्य परिणाम होईल. चिन्हआदेशाच्या उद्देशाने निवडणूक आयोगाने एका गटाला शिवसेना म्हणून मान्यता देण्याचा निर्णय प्रलंबित अपात्रता याचिकांवर पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही. अशा प्रकारचा अर्थ लावणे हे पक्षांतर घडवून आणणारी कृत्ये केल्याच्या तारखेशी संबंधित आहे, हे प्रस्थापित कायद्याच्याही विरुद्ध असेल; आणि

आय. राजकीय पक्षाच्या स्थितीवर असमाधानी असलेल्या आमदारांना परिच्छेद ४ अंतर्गत विलीनीकरणाचा आधार घेण्याचा किंवा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढविण्याचा किंवा चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अंतर्गत निवडणूक आयोगाकडे त्यांच्या गटाला राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यासाठी आणि निवडणूक आयोगाच्या निर्णयाची वाट पाहण्यासाठी अर्ज करण्याचा अधिकार आहे. सभासदांनी दहाव्या अनुसूचीनुसार निषिद्ध पद्धतीने काम करण्याचा निर्णय घेतल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात यावे.

४२. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी पुढील युक्तिवाद केला.

ए. 'राजकीय पक्ष' हा शब्द दहाव्या अनुसूचीत असल्याने तो लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम २९ अ अन्वये व्यक्तींच्या नोंदणीकृत संघटनेशी संबंधित आहे. 'राजकीय पक्ष' म्हणजे राजकीय पक्षाची मान्यता आणि त्याच्या नेतृत्वरचनेत कायद्यानुसार बदल होईपर्यंत कथित निषिद्ध वर्तनाच्या तारखेस टिकणारी नेतृत्व रचना;

बी. विधिमंडळ पक्षाचे सदस्य त्यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या अपात्रता याचिकेमध्ये बचाव म्हणून राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतात असा दावा करू शकत नाहीत. अशा कोणत्याही गटाला केवळ चिन्हआदेशांतर्गत कार्यवाहीत निवडणूक आयोगासमोर असा दावा सादर करण्याचा अधिकार आहे. चिन्हआदेशानुसार आपला दावा निकाली निघेपर्यंत सदस्यांना दहाव्या अनुसूचीनुसार निषिद्ध वर्तन करता येणार नाही;

सी. अपात्रता याचिका चिन्हआदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये त्यांच्या दाव्याच्या निर्णयावर अवलंबून असल्याचा उत्तरवादींचा युक्तिवाद मान्य झाल्यास दहाव्या अनुसूचीला स्थगिती मिळेल; आणि

डी. उत्तरवादींच्या विरोधात अपात्रता याचिका प्रलंबित असताना त्यांना चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये कार्यवाही सुरू करता आली नसती. कारण **सादिक अली विरुद्ध भारत निवडणूक आयोग**[18] या प्रकरणात मान्य

18(१९७२) ४ एससीसी ६६४

केल्यानुसार विधिमंडळातील बहुमताच्या मुद्द्यांमध्ये अपात्रता कार्यवाहीच्या निर्णयानुसार बदल केला जाऊ शकतो .

४३. प्रतिवादींच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी पुढील युक्तिवाद केला.

ए. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद ६ नुसार विधानसभा अध्यक्ष हे अपात्रतेच्या मुद्द्यावर निर्णय देणारे घटनात्मक प्राधिकारी आहेत. राज्यघटनेच्या अनुच्छेद २१२ (१) नुसार राज्य विधिमंडळाच्या कामकाजाच्या वैधतेवर न्यायालयासमोर प्रश्नचिन्ह उपस्थित करता येणार नाही. याचिकाकर्ते अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्याच्या सभापतींच्या घटनात्मक अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत;

बी. निव्वळ अपात्रतेची संकल्पना राज्यघटनेला माहित नाही. दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेच्या कार्यवाहीबाबत कोणताही निर्णय, कायद्याची योग्य प्रक्रिया अवलंबून आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करूनच घेतला पाहिजे. सभापतींच्या निर्णयानंतरच सदस्याला अपात्र ठरवले जाते. महाराष्ट्र विधानसभा (पक्षांतराच्या आधारे अपात्रता) नियम १९८६[19] अन्वये अपात्रता याचिकांच्या निकालाची प्रक्रिया विहित करण्यात आली आहे;

सी. अपात्रतेचा सामना करणाऱ्या आमदारांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा आणि ठरावांवर मतदान करण्याचा अधिकार आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद १८९ (२) नुसार, जरी असे नंतर लक्षात आले कि

19 १९८६ चे नियम

ज्या व्यक्तींना कामकाजात भाग घेण्याचा किंवा मतदान करण्याचा किंवा अन्यथा भाग घेण्याचा अधिकार नव्हता, त्यांनी तसे कृत्य केले तरीही सभागृहाचे कोणतेही कामकाज अवैध ठरत नाही. **प्रताप गौडा पाटील वि. कर्नाटक राज्य**[20] आणि **हरियाणा विधानसभेचे अध्यक्ष वि. कुलदीप बिश्नोई**[21] या प्रकरणात या न्यायालयाने म्हटले आहे की, केवळ अपात्रतेची कार्यवाही प्रलंबित आहे म्हणून सदस्यांना सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यापासून रोखता कामा नये;

डी. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ३ वगळण्यापूर्वी एखाद्या राजकीय पक्षात फूट पडल्याची सभापतींनी केलेली चौकशी अपात्रतेच्या कार्यवाहीवर निर्णय घेण्याच्या प्रथमदर्शनी निर्णयापुरतीच मर्यादित होती . परिच्छेद ३ वगळल्याच्या परिणामी राजकीय पक्षांतर्गत फूट पडण्याबाबत प्रथमदर्शनी मत तयार करण्याचा सभापतींचा अधिकार काढून घेण्यात आला आहे. परिच्छेद ३ वगळल्यानंतर दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेच्या कारवाईचा एकमेव बचाव म्हणजे परिच्छेद ४ अन्वये विलीनीकरण. चिन्ह आदेशाच्या तरतुदींनुसार राजकीय पक्षाच्या प्रतिस्पर्धी गटांमधील वादांवर निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे

ई. विधिमंडळ पक्षाचे बहुमत विधिमंडळ पक्षाचे नेते आणि मुख्य प्रतोद यांची नियुक्ती करू शकते. १९८६ च्या नियमावलीतील तरतुदीनुसार फक्त

20 (२०१९) ७ एससीसी ४६३
21 (२०१५) १२ एससीसी ३८१

विधिमंडळ पक्षाचे सदस्य आपला नेता निवडतील. विधिमंडळ पक्षाच्या बहुमताने नेता व मुख्य प्रतोद यांची निवड केली जाते, तेव्हा सभापतींनी प्रथमदर्शनी विचार करून दहाव्या अनुसूचीच्या उद्देशाने अशा नेत्याला व मुख्य प्रतोद यांना मान्यता द्यावी. विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांच्या बहुमताने निवडून आलेला नेता आणि मुख्य प्रतोद नेमण्याशिवाय सभापतींना अन्य पर्याय नसतो; आणि

एफ. राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सत्तास्थापनेसाठी बोलावण्याचा घेतलेला निर्णय वैध आहे आणि त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही कारण:

१. २९ जून २०२२ रोजी उद्धव ठाकरे यांनी बहुमत चाचणीला सामोरे न जाता राजीनामा दिला.

२. ठाकरे यांच्या राजीनाम्यानंतर विधानसभेत बहुमत असलेल्या दुसऱ्या व्यक्तीला सत्तास्थापनेसाठी बोलावणे हे राज्यपालांचे घटनात्मक कर्तव्य होते; आणि

३. शिंदे यांनी सरकार स्थापनेचा दावा केला आणि त्यानंतर विधानसभेत बहुमत सिद्ध केले.

४४. राज्यपालांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पुढील युक्तिवाद केला.

ए. राज्यपालांनी ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश देण्याचा घेतलेला निर्णय समर्थनीय होता कारण:

i. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाला सभागृहातील बहुमताचा पाठिंबा मिळावा, हे सुनिश्चित करणे हे राज्यपालांचे घटनात्मक कर्तव्य आहे. राज्यपालांनी श्री ठाकरे यांना सध्याची परिस्थिती आणि त्यांच्यासमोरील संख्याबळाच्या आधारे बहुमत चाचणीला सामोरे जाण्याचे निर्देश दिले;

ii. बहुमत चाचणीचे निर्देश देताना राज्यपालांनी विधानसभेत कोणाकडे बहुमत आहे, याचा निर्णय घेतला नाही. शिवाय अपात्रता याचिका किंवा शिवसेनेतील फूट या संदर्भात त्यांनी कोणताही निर्णय घेतला नाही;

iii. राज्यपालांना बहुमत चाचणी घेण्याच्या त्यांच्या स्वेच्छाधिकाराचा वापर करण्यापासून रोखले जात नाही. विधानसभेत विद्यमान सरकारला मिळालेल्या बहुमताबाबत गंभीर शंका उपस्थित होत असताना राज्यपालांनी संविधानिक औचित्यानुसार स्वतंत्रपणे काम करून तातडीने बहुमत चाचणी घेण्याची गरज आहे. सद्य:स्थितीत राज्यपालांनी खालील वस्तुनिष्ठ तथ्यांच्या आधारे बहुमत चाचणी घेण्याचे आवाहन केले.

१. २१ जून, २०२२ रोजीचे पत्र आणि शि वि प च्या ३४ आमदारांच्या स्वाक्षरीने शिंदे यांना शि वि पचे नेते म्हणून पाठिंबा दर्शविणारा ठराव;

२. शि वि पच्या ३८ आमदारांनी २५ जून २०२२ रोजी लिहिलेल्या पत्रात आमदारांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या जीवाला धोका होता, तसेच त्यांच्या मालमत्तेलाही धोका होता; आणि

३. विरोधी पक्षनेत्याने २८ जून २०२२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करण्याकरीता आवाहन करण्यासाठी विनंती करणारे पत्र

बी. **एस. आर. बोम्मई** (उपरोल्लिखित) आणि **शिवराजसिंह चौहान विरुद्ध भारतीय संघराज्य**[22] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की  मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ यांना सभागृहाचा विश्वास आहे की नाही, याबाबत शंका निर्माण झाल्यास तातडीने बहुमत चाचणी घेणे हा सर्वात योग्य उपाय आहे.

सी. उद्धव ठाकरे यांनी बहुमत चाचणीला सामोरे न जाता मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्याने राज्यपालांनी उद्धव ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्यासाठी बोलावले होते, या कृतीच्या औचित्याचा मुद्दा निरर्थक ठरला आहे; आणि

डी. शिंदे यांना पदाची शपथ देण्याचा राज्यपालांचा निर्णय खालील वस्तुनिष्ठ तथ्यांवर आधारित असल्याने त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करता येणार नाही.

22 (२०२०) १७ एससीसी १

i. देवेंद्र फडणवीस यांनी ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांना सरकार स्थापनेसाठी पाठिंबा दर्शविणारे पत्र;

ii. एकनाथ शिंदे यांनी ३० जून २०२२ रोजी राज्यपालांना पत्र लिहून आपल्याला बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा असल्याचे कळवले आणि त्यांनी राज्यपालांना त्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचे आमंत्रण देण्याची विनंती केली; आणि

iii. एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देणारे सतरा अपक्ष आमदार व इतर पक्षांच्या आमदारांनी ३० जून २०२२ रोजी लिहिलेले पत्र.

४५. उत्तरवादींचे ज्येष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी खालील युक्तिवाद केला.

ए. दहाव्या परिशिष्टातील अपात्रता याचिकांवर सभापतींनी निर्णय घेणे आवश्यक आहे. राजेंद्रसिंह राणा (उपरोल्लिखित) या प्रकरणावर याचिकाकर्त्यांचे विसंबून राहणे चुकीचे आहे, कारण त्या प्रकरणात अपात्रतेच्या याचिकांवर सभापतींनी आधीच निर्णय घेतला होता. अपीलातच या न्यायालयाने हे प्रकरण पुन्हा सभापतींकडे सोपवण्याऐवजी अपात्रतेचा मुद्दा निकाली काढला.

बी. दहाव्या परिशिष्टानुसार सभापतींनी एखाद्या सदस्याला अपात्र ठरविल्यास त्याचे गंभीर परिणाम होतात. सुनावणीची कोणतीही संधी न देता निवडून आलेल्या प्रतिनिधीला मानीवपणे अपात्र ठरवता येत नाही ( **क्षेत्रमयुम बिरेन सिंग विरुद्ध विरुद्ध माननीय अध्यक्ष, मणिपुर विधानसभा**[23];).

23 (२०२२) २ एससीसी ७५९

सी. दहाव्या अनुसूचीचा उपयोग एकाच राजकीय पक्षाच्या सदस्यांमधील पक्षांतर्गत तीव्र मतभेदांना असंतोष दडपण्यासाठी केला जाऊ शकत नाही. पक्षांतर्गत असंतोषाला पक्षांतर म्हणता येणार नाही. त्यामुळे उत्तरवादींनी दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) अन्वये प्रतिबंधात्मक वर्तन केलेले नाही. पक्षाच्या नेतृत्वाविरुद्ध तीव्र असंतोष व्यक्त करण्याचे कोणतेही कृत्य परिच्छेद २ (१) (अ) अन्वये 'स्वेच्छेने पक्षाचे सदस्यत्व सोडणे' ठरत नाही. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीत परिच्छेद २(१)(ब) लागू होत नाही.

डी. दहाव्या अनुसूचीतून परिच्छेद ३ वगळल्यानंतर राजकीय पक्षातील विभाजनाची दखल घेण्याचा अधिकार सभापतींना नाही. चिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ नुसार राजकीय पक्षात फूट पडण्याच्या बाबत निर्णया घेण्याचा अनन्य अधिकार भारताच्या निवडणूक आयोगाला आहे. ; आणि

ई. अपात्रता याचिकांवर प्रतिवादींना उत्तर देण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याचा या न्यायालयाचा २७ जून २०२२ रोजीचा आदेश नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार होता.

४६. प्रतिवादींची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील महेश जेठमलानी यांनी पुढील प्रमाणे बाजू मांडली.

ए. 'मानीव अपात्रता' ही संकल्पना राज्यघटनेत अस्तित्वात नाही. अपात्रता प्रत्यक्ष असणे आवश्यक आहे आणि नियम १९८६ च्या नियम ७ (७) अन्वये अपात्रतेच्या कारवाईची प्रक्रिया अनिवार्य आहे.

बी. ज्या तारखेमुळे आमदाराला अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोप आहे, त्या तारखेच्या अनुषंगाने सभापती अपात्रतेची कार्यवाही ठरवतात. मात्र, राज्यघटनेतील कलम १८९ (२) आणि १९१ (२) लक्षात घेता अपात्रतेच्या आदेशाचा केवळ संभाव्य परिणाम होतो; आणि

सी. श्री शिंदे यांच्या गटात असलेल्या ३९ पैकी सोळा आमदारांविरोधात याचिकाकर्त्यांनी अपात्रता याचिका दाखल करून ज्यांच्याविरोधात याचिका दाखल केल्या नाहीत, त्यांना श्री ठाकरे यांच्या गटाकडे वळण्यासाठी प्रवृत्त केले. याचिकाकर्त्यांना माहित होते की जर सर्व ३९ आमदार अपात्र ठरले तर, महाविकास आघाडीचे सरकार कोसळेल. त्यानंतर २७ जून २०२२ रोजी उर्वरित तेवीस आमदारांविरोधात दुसरी अपात्रता याचिका दाखल करण्यात आली होती.

४७. उत्तरवादींचे ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी पुढील बाजू मांडली.

ए. अपात्रता याचिका प्रलंबित असताना आमदारांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा अधिकार असतो. घटनेच्या कलम १८९ (२) नुसार सदस्याला अपात्र ठरविल्याने सभागृहातील कोणत्याही कृतीत व्यत्यय येत नाही; आणि

बी. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशासाठी अपात्रतेचा पाठपुरावा करायला हवा होता आणि श्री ठाकरे यांनी राजीनामा द्यायला नको होता आणि विश्वासदर्शक ठरावाच्या मतांच्या आधारे ते तरुन गेले असते. न्यायालयाने घटनात्मक बाबींचा निर्णय घेताना तर्काच्या

कक्षेत प्रवेश करू नये. श्री ठाकरे यांना बहुमत चाचणीला सामोरे जावे लागले असते, तर त्यांना बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा मिळाला नसता. विश्वासदर्शक ठरावाच्या पूर्वसंध्येला उद्धव ठाकरे यांनी दिलेला राजीनामा हा सभागृहाचा विश्वास गमावल्याची साक्ष आहे.

**इ. विश्लेषण**

i. **नबाम रेबीया** यांचे प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे संदर्भित करणे.

४८. अनुच्छेद १७९ नुसार विधानसभा अध्यक्षांना (किंवा उपसभापतींना) "विधानसभेच्या सर्व तत्कालीन सदस्यांच्या" बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे त्यांच्या पदावरून हटवले जाऊ शकते. राज्यघटनेच्या अनुच्छेद १७९ मध्ये खालीलप्रमाणे आहे.

> १७९. विधानसभेचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पॅड धारण करणारा सदस्य -
>
> (क) विधानसभेच्या त्या वेळच्या सर्व सदस्यांच्या बहुमताने पारित झालेल्या विधानसभेच्या ठरावाद्वारे त्यांच्या पदावरून दूर केले जाऊ शकेल.
>
> असे कि, खंड (ग) च्या प्रयोजनार्थ असणारा कोणताही ठराव, तो मांडण्याचा उद्देश असल्याबद्दल निदान चौदा दिवसांची नोटीस देण्यात आल्या खेरीज मांडला जाणार नाही.

आणखी असे कि जेव्हा जेव्हा विधानसभा विसर्जित होईल तेव्हा तेव्हा विसर्जनानंतर होणाऱ्या विधानसभेच्या पहिल्या सभेच्या लगतपूर्वीपर्यंत अध्यक्ष आपले पद रिक्त करणार नाही.

४९. **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) या प्रकरणात येथे श्री. नबाम तुकी यांच्या नेतृत्वाखाली आयएनसीने अरुणाचल प्रदेशमध्ये सरकार स्थापन केले. श्री. नबाम रेबिया यांची अरुणाचल प्रदेश विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. ऑक्टोबर २०१५ मध्ये काँग्रेसच्या आमदारांच्या एका गटाने स्वतंत्र गट स्थापन करून मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाला विरोध केला होता. दोन अपक्ष आमदारांसह काँग्रेसच्या वीस आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहून मुख्यमंत्र्यांनी सभागृहाचा विश्वास गमावल्याचा दावा केला आहे. त्यानंतर विरोधी पक्षांच्या काही आमदारांनी घटनेच्या कलम १७९ (सी) अन्वये विधानसभा अध्यक्षांना हटविण्याचा ठराव मांडण्याची नोटीस बजावली. त्यानंतर, काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या मुख्य प्रतोद यांनी पक्षाच्या निर्देशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी काँग्रेसच्या चौदा आमदारांविरोधात दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) अन्वये अपात्रता याचिका दाखल केली. त्यानंतर सभापतींनी आमदारांना अपात्रता याचिकांमध्ये नोटिसा बजावल्या.

५०. ९ डिसेंबर २०१५ रोजी राज्यपालांनी १४ जानेवारी २०१६ रोजी होणारे विधानसभेचे अधिवेशन १६ डिसेंबर २०१५ पर्यंत पुढे ढकलण्याचा आदेश काढला. त्याच दिवशी राज्यपालांनी अनुच्छेद १७५ (२) अंतर्गत एक संदेशही जारी केला होता. या संदेशात त्यांनी सभागृहाच्या विषयसूचीवर पहिला विषय म्हणून सभापतींना हटविण्याचा ठराव निश्चित केला आणि सभागृहाचे कामकाज चालविण्याची जबाबदारी उपसभापतींवर सोपविली. राज्यपाल यांनी

अधिवेशन स्थगित होईपर्यंत पीठासीन अधिकाऱ्याने सभागृहातील पक्षरचनेत बदल करू नये, असे निर्देश दिले. १७ डिसेंबर २०१५ रोजी मुख्यमंत्री नबाम तुकी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सभागृहाचा विश्वास गमावल्याचे जाहीर करण्यात आले.

५१. या पार्श्वभूमीवर **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) या प्रकरणात हा निर्णय घेण्यात आला. त्या प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने (खेहर, जे. यांनी लिहिलेले बहुमताचे मत आणि त्यावेळी विद्वान सरन्यायाधीशांप्रमाणे मिश्रा, जे. यांचे एकमत मत) इतर गोष्टींबरोबरच त्यांना सभापतीपदावरून हटविण्याचा ठराव आणण्याच्या इराद्याची नोटीस जारी झाल्यानंतर दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देणे सभापतींसाठी अयोग्य आहे, असा निकाल दिला.

५२. खेहर, जे. यांनी घटनात्मक आणि नैतिक युक्तिवादावर आपले मत मांडले. सभापतींच्या पदाला आव्हान दिले जात असताना सभापतींनी त्यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या अपात्रता याचिकेवर निर्णय घेण्यापूर्वी अध्यक्षपदावर राहण्याचा आपला अधिकार प्रस्थापित करणे न्याय्य आणि योग्य वाटते, असे निरीक्षण अभ्यासू न्यायमूर्तींनी नोंदवले.

> "१८९. सभापतीपदाला आव्हान दिलेले असताना, त्याला हटविण्याच्या ठरावाच्या सूचनेद्वारे, विधानसभा अध्यक्ष प्रथम राज्य विधिमंडळातील बहुमताचा पाठिंबा मिळवून तसे राहण्याचा आपला अधिकार दर्शवितात, हे न्याय्य आणि योग्य वाटेल. सभापतीकार्यालयातून स्वत:च्या हकालपट्टीची ठरावाची नोटीस प्रलंबित असताना दहाव्या

अनुसूचीनुसार एक किंवा अधिक अपात्रता याचिका सुरू ठेवण्याची सभापतींची कृती अन्यायकारक ठरेल. बहुमताचा विश्वास असलेल्या सभापतींना बहुमत चाचणीची भीती का वाटते? सभापतीपदावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर ते दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेच्या याचिकांवर खात्रीशीरपणे आणि निश्चितपणे सुनावणी करतील. आणि ज्या सभापतींना आपल्या हकालपट्टीच्या प्रस्तावाला सामोरे जाण्याची खात्री नसते, त्यांना दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्याचा अधिकार का असावा? वर ज्या पद्धतीने या प्रकरणाची तपासणी करण्यात आली आहे, ती नैतिक विचारांवर आधारित आहे. मात्र, घटनात्मक प्रश्नाचे घटनात्मक उत्तर असणे आवश्यक आहे. तात्कालिक मुद्द्याचा घटनात्मक अर्थ पुढील परिच्छेदांमध्ये हाताळण्याचा आम्ही प्रयत्न करू.

५३. खेहर, जे. यांनी संविधान सभेच्या चर्चेचा संदर्भ देत "सभेचे सर्व तत्कालीन सदस्य" या वाक्याचा अनुच्छेद 179 (सी) (अनुच्छेद 158 चा मसुदा)मधील अर्थ स्पष्ट केला. संविधान सभेमधील चर्चेदरम्यान श्री. ताहीर यांनी "विधानसभेचे सर्व तत्कालीन सदस्य" या

वाक्यांशाऐवजी "विधानसभेचे सदस्य उपस्थित आणि मतदान करणारे" हे वाक्य वापरण्याचा प्रस्ताव ठेवला. मात्र, प्रस्तावित दुरुस्ती नकारात्मक होती. न्यायमूर्ती खेहर म्हणाले की, संविधान सभेच्या चर्चेत या प्रस्तावित दुरुस्तीवर कोणतीही चर्चा झालेली दिसत नाही. न्यायमूर्ती खेहर यांनी नमूद केले की याचा अर्थ असा आहे की संविधान सभेच्या सदस्यांनी निश्चितता दर्शविण्यासाठी हा शब्द वापरला आणि सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस प्रलंबित असताना विधानसभेच्या रचनेत कोणताही बदल कलम 179 (सी) च्या स्पष्ट जनादेशाशी विसंगत असेल:

> "१९१. [...] आम्हाला समाधान आहे की "विधानसभेच्या सर्व तत्कालीन सदस्यांच्या बहुमताने मंजूर केलेले" हे शब्द अध्यक्षांना दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेची कार्यवाही करण्यास प्रतिबंधित करतील, कारण यामुळे सभागृहातून एक किंवा अधिक आमदार अपात्र ठरल्यानंतर "तत्कालीन सर्व सदस्य" या शब्दांचा प्रभाव कमी होईल. "तत्कालीन सर्व सदस्य" हे शब्द निश्चिततेची अभिव्यक्ती दर्शवितात. विधानसभा अध्यक्ष (किंवा उपसभापती) यांना हटविण्याच्या ठरावाची नोटीस प्रलंबित असलेल्या कालावधीसाठी विद्यमान आमदारांना अपात्र ठरवून विधानसभेच्या संख्याबळात आणि रचनेत कोणताही

> बदल केल्यास कलम १७९ (सी) च्या स्पष्ट आदेशाचा भंग होईल, ज्यामुळे सर्व "तत्कालीन सदस्यांना" सभापतींचा पदावर राहण्याचा अधिकार निश्चित करणे आवश्यक आहे.

५४. दहाव्या परिशिष्टाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न केलेला हेतू स्पष्ट आणि निःसंदिग्ध आहे आणि कलम १७९ (सी) द्वारे साध्य करण्याचा प्रयत्न केलेल्या हेतूपेक्षा तो वेगळा आहे, असे बहुमताच्या मताने पुढे नमूद केले:

> १९२. दहाव्या अनुसूचीच्या माध्यमातून साध्य करण्याचा प्रयत्न केलेला हेतू स्पष्ट आणि निःसंदिग्ध आहे. कलम १७९ (सी) द्वारे साध्य करण्याचा प्रयत्न केला जाणारा हेतू याच्याशी त्याचा संबंध नाही आणि तो वेगळा आहे. वरील पैकी कोणतीही तरतूद एकमेकांशी परस्परविरोधी म्हणता येणार नाही. त्यामुळे दोघांनीही आपापल्या घटनात्मक अवकाशात मोकळेपणाने काम केले पाहिजे. त्या प्रत्येकाचा अर्थ दुसऱ्याच्या घटनात्मक विस्तारात न जाता साध्य करावयाच्या उद्दिष्टाची पूर्तता होईल अशा

पद्धतीने लावावा लागेल. व्याख्या अशी असावी लागेल, ज्यामुळे घटनात्मक हेतू आणि सलोखा टिकून राहील.

५५. खेहर, जे. म्हणाले की, जर सभापतींनी मतदानात टिकण्यापूर्वी अपात्रतेच्या याचिकेवर निर्णय दिला तर त्याचा फटका अपात्रतेचा सामना करणा-या आमदारांना होईल, परंतु सभापतींना नाही. अपात्रतेचा आदेश रद्द झाला तरी अपात्र ठरलेल्या आमदारांना सभापतींविरोधात आणलेल्या प्रस्तावात सहभागी होण्याचा अधिकार राहणार नाही. त्यांच्या मते सभापतींविरोधातील प्रस्तावात सहभागी होण्याच्या संधीपासून ते प्रभावीपणे वंचित राहिले असते. मात्र सभापतींविरोधातील प्रस्तावावर मतदान झाल्यानंतर अपात्रतेच्या याचिकेवर सुनावणी झाल्यास आमदारांचा सहभागी होण्याचा अधिकार गमावणार नाही.

५६. कलम १७९ च्या पहिल्या तरतुदीचा उल्लेख करताना न्यायमूर्ती मिश्रा म्हणाले की, नोटीस प्रलंबित असताना चौदा दिवसांत अपात्रता याचिकांवर निर्णय घेऊन विधानसभेची रचना बदलण्याची परवानगी दिल्यास अध्यक्षांना फायदा होईल. यामुळे विधानसभेचे पीठासीन सदस्य म्हणून सभापतींची भूमिका आणि दहाव्या अनुसूचीनुसार न्यायाधिकरण म्हणून सभापतींची भूमिका यांच्यात घटनात्मक संघर्ष निर्माण होईल, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. न्यायमूर्ती मिश्रा, जे. यांनी संविधान सभेने नकारात्मक ठरविलेल्या कलम १७९ (सी) (मसुदा कलम १५८) मधील दुरुस्तीचा ही उल्लेख केला, जो न्यायमूर्ती खेहर यांच्या निष्कर्षाप्रमाणेच होता. राज्यघटनेच्या कलम १८१ (२) मध्ये अशी तरतूद आहे की जेंव्हा अनुच्छेद १८९ सोबत त्यांच्या विरुद्ध गुणांवरून भेद दाखविला गेल्यास, त्यांना पदावरून हटविण्याचा ठराव विचाराधीन असेल तरी, अध्यक्षांना विधानसभेच्या कामकाजात बोलण्याचा आणि भाग घेण्याचा अधिकार असेल परंतु समसमान

मतांच्या प्रकरणात त्यांना मतदानाचा अधिकार नसेल. माननीय न्यायमूर्तीनी निर्णय दिला कि अनुच्छेद १८१ (२) अंतर्गत आवश्यकतेचा जेव्हा कलम १८९ सोबत त्यांच्या विरुद्ध गुणांवरून भेद दाखविला गेल्यास, अध्यक्षांना, त्यांना हटविण्याच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या अधिकारावर मर्यादा येतात कारण नंतरच्या तरतुदीनुसार मतांची समसमान मते असल्यास सभापतींना मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या घटनात्मक रचनेने न्यायाधीशांच्या दृष्टिकोनातून असे सूचित केले की, सभापतींना त्यांच्या हकालपट्टीच्या ठरावात हस्तक्षेप करण्याचा अधिकार दिला जाऊ शकत नाही.

५७. न्यायमूर्ती मदन लोकुर, जे. यांनी असे म्हटले की, या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी न्यायालयात प्रकरण दाखल केले गेले नाही.

> ४०१. माझ्या मते विधानसभेच्या चौदा सदस्यांबाबत राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टानुसार निर्णय घेणाऱ्या सभापतींच्या अधिकाराविषयी किंवा औचित्याविषयी माझ्या विद्वान सहयोगी बंधूंनी व्यक्त केलेले मत या अपीलांमध्ये अजिबात उद्भवत नाही.

५८. या निकालाच्या अगोदरच्या भागात लक्षात आल्याप्रमाणे, या खटल्याच्या गुणवत्तेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत नबाम रेबिया मधील निर्णय उपरोल्लेखित मोठ्या खंडपीठाकडे पाठवावे की नाही या प्रश्नावर विचार करणे, या न्यायालयाने पुढे ढकलले.

५९. सर्व पक्षकारांच्या वकिलांनी मांडलेल्या युक्तिवादांचा विचार केल्यावर आमचे असे मत आहे की, **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निकाल सध्याच्या प्रकरणाच्या वस्तुस्थितीला लागू होत नाही.

६०. राज्यघटनेच्या अनुच्छेद  कलम १८० नुसार सभापतीपद रिक्त असताना उपसभापती सभापतींची कर्तव्ये पार पाडतात. सभापतींच्या कामांमध्ये अपात्रता याचिकांचा निकाल देणे समाविष्ट आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्षपद रिक्त असून उपसभापती श्री नरहरी झिरवळ हे सभापतीपदाची जबाबदारी पार पाडत होते. २२ जून २०२२ रोजी कलम १७९ अन्वये त्यांना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस बजावण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. श्री सुनील प्रभू यांनी २३ जून २०२२ रोजी शिंदे यांच्या नेतृत्वाखालीकाही आमदारांविरोधात अपात्रता याचिका दाखल केली होती.

६१. पहिली परिस्थिती २१  जून २०२२  रोजी कलम १७९  (सी) अन्वये उपसभापतींना त्यांचे कामकाज पार पाडण्यापासून परावृत्त करण्याच्या नोटीसपासून सुरू होते. उपसभापतींचे उत्तर महत्त्वाचे आहे. संबंधित भाग खालीलप्रमाणे आहे:

> या पत्रव्यवहाराच्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता तो रेकॉर्डवर घेण्यापूर्वी पत्रव्यवहाराची  सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे जोपर्यंत वरील पत्रावर स्वाक्षरी केलेल्या व्यक्ती अशा कोणत्याही नोटीसच्या सत्यतेबद्दल अधोहस्ताक्षरित व्यक्तीचे समाधान करत

नाहीत, तोपर्यंत अशा प्रकारचे पत्र रेकॉर्डवर घेतले जाणार नाही किंवा त्यावर कारवाई केली जाणार नाही.

हे लक्षात घेऊन आणि सभागृहाचे प्रमुख या नात्याने जोपर्यंत अशा कोणत्याही पत्राची सत्यता आणि त्यावर स्वाक्षरी करणाऱ्यांची सत्यता पडताळून पाहिली जात नाही, तोपर्यंत पुढील कारवाई करता येणार नाही आणि त्यामुळे २२.०६.२०२२ रोजीच्या पत्राची नोंद घेतली जात नाही. अशा प्रकारची कोणतीही नोटीस मी त्याच्या सत्यतेवर आण खरेपणावर समाधानी झाल्यानंतरच रेकॉर्डवर घेतली जाईल.

६२. उपसभापतींनी कलम १७९ (क) अन्वये नोटीसची दखल न घेण्याचा निर्णय घेतल्याचे वरील विवेचना वरून स्पष्ट होते. आमचा असा विश्वास आहे की सभापती हा निर्णयकर्ता असल्याने ते कोणत्या अधिकारक्षेत्राचा वापर करू शकतात किंवा करू शकत नाहीत याची त्यांची समज अत्यंत महत्वाची आहे. उपसभापतींनी २५ जून २०२२ रोजी उत्तरवादीना नोटिसा बजावल्या आणि त्यांना २७ जून २०२२ पर्यंत लेखी म्हणणे सादर करणे आवश्यक होते. ही नोटीस खालीलप्रमाणे होती.

अर्जदाराने महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षांकडे तुम्ही -गैर -अर्जदार याना अपात्र ठरविण्यासाठी 2022 चा

अर्ज क्रमांक 1 दाखल केला आहे, आम्ही सर्व संलग्न कागदपत्रांसह खालीलप्रमाणे समन्स बजावतो. तुम्हाला महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या आधारे अपात्रता) नियम १९८६) मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार लेखी म्हणणे सोमवार, २७ जून २०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत उपसभापतींकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आपण हे उत्तर सादर करण्यासाठी, अवलंबून असलेली सर्व संबंधित कागदपत्रे या उत्तरासह सादर करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. आपण हे देखील लक्षात घ्या की, जर हे लेखी म्हणणे निर्धारित मुदतीत दिले गेले नाही, तर यावर आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीतधरून त्यानुसार निर्णय घेतला जाईल.

६३. वरील विवेचनावरून स्पष्ट होते की, उपसभापतींनी **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निर्णयाला, दहाव्या अनुसूचीअंतर्गत केलेल्या तक्रारीवर निर्णय घेण्यास अडथळा मानला नाही.

६४. सोळा आमदारांनी या न्यायालयात अनुच्छेद ३२ अन्वये २०२२ च्या रिट याचिका (सी) क्रमांक ४६८-४६९ अन्वये रिट याचिका दाखल करून दोन मुद्दे उपस्तित केले. पहिला मुद्दा **नबाम रेबिया** (सुप्रा) मधील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सुनावणी सुरू असताना सभापतींच्या अक्षमतेशी संबंधित आहे. दुसरा मुद्दा उपसभापतींनी लेखी निवेदन दाखल करण्यासाठी केवळ अठ्ठेचाळीस

तासांचा अवधी देत बजावलेल्या समन्सच्या वैधतेशी संबंधित आहे. महत्त्वाचे म्हणजे या न्यायालयाने २७ जून २०२२ रोजी दिलेला आदेश खालीलप्रमाणे आहे.

> दरम्यान, अंतरिम उपाय म्हणून विधानसभा उपाध्यक्षांनी याचिकाकर्ते किंवा तत्सम स्थितीतील इतर विधानसभा सदस्यांना आज सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत लेखी म्हणणे सादर करण्यासाठी दिलेली मुदत १२.०७.२०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

६५. या न्यायालयाने उपसभापतींना दहाव्या अनुसूचीअंतर्गत दाखल खटल्यांची सुनावणी पुढे नेण्यापासून रोखले नाही, हे स्पष्ट आहे. किंबहुना, या न्यायालयाने केवळ लेखी निवेदन दाखल करण्याची मुदत १२ जुलै २०२२ पर्यंत वाढविली, ज्यावरून हे दिसून येते की या न्यायालयाचा हेतू आहे की कार्यवाही चालूच राहिली पाहिजे.

याचिकाकर्त्यांनी विनंती केली आहे की या न्यायालयाचा २७ जून २०२२ चा आदेश नबाम रेबिया (उपरल्लेखित) मधील निर्णयावर अवलंबून आहे जेणेकरून उपसभापतींना अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यापासून रोखले जाईल. हे निवेदन स्वीकारता येणार नाही. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणाच्या प्रयोज्यतेबाबत पक्षकारांनी या न्यायालयाला संबोधित केले असले, तरी २७ जून २०२२ चा आदेश **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणावर अवलंबून नव्हते ज्यात उपसभापतींना अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यापासून रोखले गेले आहे कारण

त्यांना हटविण्यासाठी ठराव आणण्याच्या इराद्याची नोटीस जारी करण्यात आली आहे. त्याऐवजी या न्यायालयाने ज्या व्यक्तींविरुद्ध अपात्रता याचिका दाखल केल्या होत्या, त्यांना त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे लक्षात घेऊन मुदतवाढ दिली.

६७. त्यानंतर लगेचच सभापतींची निवड झाली आणि राहुल नार्वेकर यांची सभापतीपदी नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे उपसभापतींना आता सभापतींची कामे पार पाडण्याची गरज उरली नाही. प्रलंबित असलेल्या अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देण्याची जबाबदारी सभापतींवर आली. असे असले तरी **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) आपल्यासमोरील प्रकरणास जसे च्या तसे लागू होत नाही. त्यामुळे आम्ही या प्रकरणाच्या गुणवत्तेवर निर्णय देऊ.

६८. उपसभापतींनी सुनावणी पुढे न चालविण्याचे कारण पूर्णपणे त्यानंतर घडलेल्या घटनांना कारणीभूत आहे. उपसभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस जारी झाल्यानंतर त्यानंतर राज्यपालांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे आवाहन केले, त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांचा राजीनामा, नवे सरकार स्थापन करणे, नवीन अध्यक्षांची निवड आणि विश्वासदर्शक ठराव संमत करणे, पंधरवड्यात चव्हाट्यावर आलेल्या या सर्व प्रकरणामुळे आता सात न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर हा वाद नेण्याचा विषय मागे पडला आहे. या घटनांमुळे सत्तारचनेत आमूलाग्र बदल घडून आले आणि अशा बदलाची कारणे हे सध्याच्या कामकाजाचे मुख्य आव्हान आणि अधिक मूलभूत बनले. याचिकाकर्त्यांचे प्रकरण आता त्यांनी खालील निर्णयांना आव्हान देण्यावर अवलंबून आहे, (१) राज्यपालांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करण्याचे आवाहन केले; (२) श्री एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ देणे; (iii) अपात्रतेच्या नोटिसांना सामोरे जात असलेल्या ३४ आमदारांचा समावेश

असलेल्या सभागृहाद्वारे अध्यक्षांची निवड; आणि (४) ४ जुलै २०२२ रोजीच्या विश्वासदर्शक ठरावाची वैधता.

६९. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निर्णय आपल्यासमोरील वस्तुस्थितीला लागू होत नसला, तरी २३ ऑगस्ट २०२२ रोजीच्या आपल्या आदेशात या न्यायालयाला ज्या स्पर्धात्मक बाबींनी प्रेरणा दिली, त्याबद्दल आम्ही सजग आहोत.

**नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) प्रकरण घटनापीठाकडे पाठविण्यात येण्याची त्या आदेशात, या न्यायालयाने प्रथमदर्शनी असे मत तयार केले की **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मध्ये मांडलेला कायद्याचा प्रस्ताव "परस्परविरोधी युक्तिवादावर" आधारित होता. संदर्भ नोंदीचा क्रम:

> ४. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) येथील घटनापीठाने मांडलेला कायद्याचा प्रस्ताव विरोधाभासी युक्तिवादावर आधारलेला आहे, ज्याला घटनात्मक नैतिकता टिकवून ठेवण्यासाठी पोकळी भरून काढणे आवश्यक आहे, असे आपण प्रथमदर्शनी निरीक्षण करू शकतो ? त्यामुळे या प्रश्नासाठी आवश्यक ती पोकळी भरून काढण्यासाठी प्रकरण घटनापीठाकडे संदर्भित करण्याची गरज आहे.

७०. आमच्यासमोर मांडण्यात आलेल्या युक्तिवादांच्या आधारे, आमचे असे मत आहे की **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मधील निर्णय मोठ्या खंडपीठाकडे पाठविण्यास योग्य आहे कारण

कायद्याचा एक महत्त्वपूर्ण प्रश्न सोडविणे बाकी आहे. या निष्कर्षापर्यंत पोहोचण्याची आमची प्रथमदर्शनी कारणे खालीलप्रमाणे आहेत:

ए. **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) प्रकरण **किहोटो होलोहान** (उपरोल्लिखित) मधील निकालाशी विसंगत आहे कारण **किहोटो होलोहान** (उपरोल्लिखित) मधील निर्णयानुसार दहाव्या अनुसूचीतील कार्यवाहीचा निर्णय घेताना सभापतींच्या स्वातंत्र्यावर आणि निःपक्षपातीपणावर शंका घेण्याचे कारण नाही. याउलट **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित) प्रकरणात या न्यायालयाने सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या हेतूची नोटीस बजावल्यानंतर अपात्रता याचिकांवर निर्णय घेताना तटस्थ राहण्याच्या सभापतींच्या क्षमतेवर शंका उपस्थित केली.

बी . **नबाम रेबिया** (उपरोल्लिखित ) मध्ये या न्यायालयाने अनुच्छेद १७९ (क) मधील "सर्व तत्कालीन सदस्य" या वाक्याचा अर्थ लावण्यासाठी संविधान सभेमधील वादविवादाचा संदर्भ दिला. अनुच्छेद १७९ (सी) (मसुदा अनुच्छेद १५८ (सी)) मधील "विधानसभेचे सर्व तत्कालीन सदस्य" या शब्दाऐवजी "विधानसभेचे सर्व सदस्य उपस्थित आणि मतदान करणारे" हा शब्द वापरावा, असा प्रस्ताव ठेवणारी श्री मोहम्मद ताहिर यांनी मांडलेली दुरुस्ती या न्यायालयाच्या लक्षात आली. **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) मध्ये, या न्यायालयाच्या लक्षात आले की हा प्रस्ताव फेटाळण्यात आला आणि असे निरीक्षण नोंदवले की "संविधान सभेच्या वादविवादात वरील दुरुस्तीवर कोणतीही चर्चा नोंदविली गेली नाही." याच आधारावर या न्यायालयाने असे म्हटले होते की, "विधानसभेचे सर्व तत्कालीन सदस्य" या वाक्याचा अर्थ असा आहे की सभापती (किंवा उपसभापती) यांना

हटविण्याचा ठराव मांडण्याच्या हेतूची नोटीस जारी झाल्यानंतर विधानसभेच्या रचनेत बदल करू नये. तथापि, संविधान सभेच्या सदस्यांनी राज्यघटनेतील इतर तरतुदींमध्ये "सर्व तत्कालीन सदस्य" या वाक्याच्या अर्थावर चर्चा केली. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते की, "सर्व तत्कालीन सदस्य" हा शब्द संसद सदस्य असलेल्या आणि ज्यांच्या जागा रिक्त नाहीत अशा सर्व सदस्यांना सूचित करण्यासाठी वापरला गेला आहे आणि याचा अर्थ विद्यमान सदस्य किंवा उपस्थित राहणे आणि मतदान करणे असा होत नाही. संविधान सभेच्या वादविवादाचा अर्थ लावण्याची अंतर्गत मदत म्हणून वापर करताना "तत्कालीन सर्व सदस्य" या वाक्याविषयी संविधान सभेमध्ये झालेल्या चर्चेची समग्रता या न्यायालयाने लक्षात घेतलेली दिसत नाही;

सी). राज्यघटनेच्या अनुच्छेद १८१ नुसार त्यांना हटविण्याचा ठराव विचाराधीन असताना सभापती विधानसभेच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवू शकणार नाहीत. असे दिसते की नबाम रेबिया (उपरोल्लिखित) प्रकरणमधील बहुमताने अनुच्छेद १८१ चा प्रभाव आणि अर्थ विचारात घेतली नाही आणि राज्यघटनेद्वारे, अनुच्छेद १८१ ने लादलेल्या मर्यादित निर्बंधापलीकडे अध्यक्षांच्या कार्यावर कोणतेही निर्बंध घालण्याचे दृष्टीक्षेपात आहे की नाही;

डी).अनुच्छेद १७९ मधील दुसऱ्या तरतुदीनुसार विधानसभा बरखास्त झाल्यानंतर विधानसभेच्या पहिल्या बैठकीच्या तत्काळ अगोदरपर्यंत सभापती आपले पद रिकामे करू शकणार नाहीत. या तरतुदीच्या अनुषंगाने दहाव्या परिशिष्टानुसार सभापतींच्या

कामकाजावर निर्बंध घालण्याचे राज्यघटनेच्या दृष्टीसमोर ठेवले आहे का, याचा विचार या न्यायालयाने केला नाही;

ई). महाराष्ट्र विधानसभा नियमावलीच्या नियम ११ नुसार अनुच्छेद १७८ मधील तरतुदीनुसार दिलेला चौदा दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यावर २९ सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले तरच प्रस्ताव मांडण्याची परवानगी दिली जाते. सभापतींना हटविण्याचा ठराव मांडण्याच्या इराद्याच्या नोटीसमुळे असा प्रस्ताव मांडला जाऊ शकत नाही, ही शक्यता या न्यायालयाने विचारात घेतली नाही. साधगृहाच्या केवळ एका सदस्याने ठराव मांडण्याच्या इराद्याची नोटीस जारी केल्याच्या आधारे सभापतींना अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यापासून प्रभावीपणे रोखले जाऊ शकते .

एफ). असे दिसते की नबाम रेबिया (उपरोल्लिखित)प्रकरणात खालील बाबींचा विचार केला गेला नाही . (उपरोल्लिखित):

1. दहाव्या परिशिष्टानुसार सभापतींच्या कर्तव्यामध्ये तात्पुरती अक्षमता या बाबीचा ज्या विरोधात आल्यास अपात्रता याचिका दाखल होतील, अशी अपेक्षा असलेल्या आमदारांकडून किंवा ज्या आमदारांविरोधात अपात्रता याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, अशा आमदारांकडून गैरवापर होण्याची शक्यता आहे का; आणि
2. सभापतींच्या तात्पुरत्या अक्षमतेमुळे दहाव्या अनुसूचीच्या अंमलबजावणीत 'घटनात्मक खंड' येतो का?

७१. या मुद्द्याला थोपवण्यासाठी, आम्ही खालील प्रश्न (आणि उद्भवू शकणारे कोणतेही संबंधित मुद्दे) मोठ्या खंडपीठाकडे संदर्भित करतो. सभापतींना हटविण्यासाठी ठराव आणण्याच्या हेतूने नोटीस जारी केल्याने त्यांना घटनेच्या दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यापासून रोखले जाते का? हे प्रकरण योग्य त्या आदेशासाठी सरन्यायाधीशांसमोर ठेवले जाऊ शकते. त्यानुसार आम्ही या निर्णयाच्या परिच्छेद ३२ (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे आम्हाला संदर्भित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो.

७२. मोठ्या खंडपीठाचा निर्णय येईपर्यंत अंतरिम उपाय म्हणून खालील कार्यपद्धतीचा अवलंब केल्यास दहाव्या अनुसूची, चिन्ह आदेश तसेच अनुच्छेद १७९ (सी) चे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. हे काही प्रमाणात स्पष्टता आणि निश्चितता देखील प्रदान करू शकते.

ए]. दहाव्या अनुसूचीअंतर्गत तक्रारी निश्चित करण्यासाठी सभापतींना विशेष न्यायाधिकाराचा अधिकार दिल्यास सभापतींना त्यांच्या अधिकारक्षेत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या अर्जांवर निर्णय घेण्याचा अधिकार मिळेल; आणि

बी] i. अनुच्छेद १७९ (क) अन्वये त्यांना हटविण्याचा प्रस्ताव सुरू करण्याच्या कारणास्तव दहाव्या अनुसूचीतील कार्यवाहीवर निर्णय घेण्यास रोखणाऱ्या या अर्जांवर निर्णय देण्याचा अधिकार सभापतींना आहे. हा अर्ज खरा आहे की केवळ निर्णय टाळण्यासाठी केलेला आहे, हे सभापती तपासू शकतात;

ii . जर सभापतींना असे वाटत असेल की प्रस्ताव व्यवस्थित आधारावर मांडलेला आहे, तर ते त्यांच्या हकालपट्टीचा निर्णय पूर्ण होईपर्यंत दहाव्या अनुसूचीअंतर्गत कामकाज तहकूब करू शकतात. दुसरीकडे, जर त्यांना असे वाटत असेल की हा

प्रस्ताव संविधानांतर्गत विचारकेलेल्या कार्यपद्धतीनुसार तसेच संबंधित नियमांसह नाही , तर त्यांना याचिका फेटाळण्याचा आणि न्याय चौकशीमध्ये सुनावणी घेण्याचा अधिकार आहे; आणि

iii]. अनुच्छेद १७९ (क )अन्वये प्रलंबित कार्यवाही लक्षात घेता दहाव्या अनुसूचीतील कामकाज तहकूब करण्याचा किंवा सुनावणी पुढे चालू ठेवण्याची सभापतींचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन असेल. सभापतींचा निर्णय त्यांच्या अधिकारक्षेत्राशी निगडित असल्याने किहोटो होलोहान (उपरोल्लेखित) मध्ये विचार केल्याप्रमाणे क्का टाइमेट कारवाईची मर्यादा लागू होणार नाही.

ii. <u>अपात्रता याचिकांवर कोणतीही इतर घटना घडण्याच्या आधी निर्णय घेण्याचा या न्यायालयाचा अधिकार</u>

७३]. ज्या आमदारांविरोधात अपात्रता याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, त्यांच्या पाठिंब्याने सभापतींची नियुक्ती करण्यात आली असल्याने आणि पक्षपाती आणि पूर्वग्रहदूषित असल्याने अपात्रता याचिकांच्या निकालाची जबाबदारी सभापतींवर सोपविता येणार नाही, अशी विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे. या न्यायालयाने उत्तरवादींविरोधातील अपात्रता याचिकांवर निर्णय घ्यावा, असा युक्तिवाद करण्यासाठी त्यांनी राजेंद्रसिंह राणा (उपरोल्लेखित) यां प्रकरणाचा आधार घेतला आहे.

७४]. राज्यघटनेच्या कलम १९१ (२) नुसार दहाव्या अनुसूचीनुसार अपात्र ठरलेल्या आमदाराला सभागृहाचे सदस्य म्हणून अपात्र ठरविले जाईल. दहाव्या अनुसूचितील परिच्छेद ६ अन्वये अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचा विशेष अधिकार सभापतींना आहे. परिच्छेद ८ मध्ये सभागृहाचे अध्यक्ष किंवा सभापती यांना परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेबद्दल नियम बनविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. परिच्छेद ८ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी १९८६ ची नियमावली अधिसूचित केली.

७५]. नियम १९८६ च्या नियम ६ मध्ये सभागृहातील एखाद्या सदस्याविरुद्ध सभापतींसमोर अपात्रता याचिका दाखल करण्याची प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. कायदा

नियम ६ अन्वये नमूद केलेल्या अटींचे पालन न केल्याबद्दल सभापती याचिका फेटाळून लावू शकतात किंवा सभागृहाच्या सदस्याविरुद्ध अपात्रतेचा प्रश्न निश्चित करण्यासाठी पुढे सुनावणी घेऊ  शकतात, अशी तरतूद नियम ७ मध्ये आहे. नियम ७(७) नुसार सभापतींनी अशा सदस्यांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देणे आवश्यक आहे. नियम ८ मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, सभापती या प्रकरणाच्या गुणवत्तेचा योग्य विचार करून एक तर अपात्रता याचिका फेटाळून लावतील किंवा लेखी आदेशाद्वारे सदस्य दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्र ठरल्याचे जाहीर करतील. अशा प्रकारे, दहाव्या अनुसूचीनुसार (१९८६ च्या महाराष्ट्रासाठीच्या नियमांसह वाचा)

सभापतींनी अधिकाराचा वापर करण्यासाठी मार्गदर्शक अशी  सविस्तर कार्यपद्धती उपलब्ध करून दिली आहे. सभापतींनी या प्रक्रियेचा अवलंब करून अपात्रता याचिकांवर निर्णय घ्यावा.

७६. **किहोतो होलोहान** (उपरोल्लेखित) मध्ये, या न्यायालयाने असा निर्णय दिला की दहाव्या अनुसूचीच्या उद्देशासाठी एक सभापती न्यायाधिकरण आहे. त्यामुळे दहाव्या अनुसूचीतील अधिकाराचा वापर राज्यघटनेच्या कलम १३६, २२६ आणि २२७ अन्वये न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन आहे. परिच्छेद ६(२) मधील अंतिम कलमात न्यायालयांचे अधिकारक्षेत्र पूर्णपणे वगळण्यात आलेले नाही, असे निरीक्षण या न्यायालयाने नोंदवले. तथापि, असे मत व्यक्त केले गेले की अशा कलमामुळे न्यायालयीन पुनरावलोकनाची व्याप्ती मर्यादित होते कारण घटनेने दहाव्या अनुसूचीनुसार अध्यक्ष किंवा सभापतींना "न्यायनिर्णय अधिकारांचे भांडार" म्हणून अभिप्रेत केले होते. या न्यायालयाने असे म्हटले आहे की जेथे अध्यक्ष किंवा सभापतींच्या निर्णयापूर्वीच्या टप्प्यावर न्यायालयीन पुनरावलोकन उपलब्ध नाही, त्या प्रकरणातील काही अपवादात्मक परिस्थिती वगळता. अशा प्रकारे **, किहोटो होलोहान** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णय हे स्पष्ट करते की दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे विशेष अधिकार सभागृहाचे अध्यक्ष किंवा सभापतींकडे आहेत.

७७. याचिकाकर्त्यांनी राजेंद्रसिंह राणा (उपरोल्लेखित) या प्रकरणाचा आधार घेत या न्यायालयाने आपल्या असाधारण अधिकारक्षेत्राचा वापर करावा आणि उत्तरवादी आमदारांविरुद्ध अपात्रतेच्या प्रश्नावर स्वत: निर्णय घ्यावा, अशी विनंती केली आहे. पर्यायाने या न्यायालयाने, ३ जुलै २०२२ पूर्वी सभापतीपदाची जबाबदारी पार पाडणाऱ्या उपसभापती श्री. झिरवळ यांना अपात्रता याचिकेवर निर्णय घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.

७८. **राजेंद्रसिंह राणा** (उपरोल्लेखित) प्रकरणात बहुजन समाज पक्षाच्या[24] तेरा आमदारांविरोधात ४ सप्टेंबर २००३ रोजी अपात्रता याचिका दाखल करण्यात आली होती. २६ ऑगस्ट २००३ रोजी सभापतींनी बसपमधील फूट मान्य केली आणि लोकतांत्रिक बहुजन दल या नावाने स्वतंत्र गटाला मान्यता दिली. ज्या तेरा आमदारांविरोधात अपात्रतेची याचिका दाखल करण्यात आली होती, ते ही लोकतांत्रिक बहुजन दलाचे सदस्य होते. ६ सप्टेंबर २००३ रोजी सभापतींनी तेरा आमदारांविरोधातील अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय न घेता लोकतांत्रिक बहुजन दलाचे समाजवादी पक्षात विलीनीकरण स्वीकारले. ७ सप्टेंबर २००५ रोजी सभापतींनी आमदारांविरोधातील अपात्रता याचिका फेटाळून लावल्या. उच्च न्यायालयाने २८ फेब्रुवारी २००६ च्या निकालाद्वारे आमदारांविरोधातील अपात्रता याचिका फेटाळण्याचा सभापतींचा आदेश रद्द बातल ठरवला आणि याचिकांमध्ये पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले.

७९. अपिलावर या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की , संबंधित प्राधिकरणाने निर्णय घेतला नसताना प्रथमत: अपात्रता याचिकांवर निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. कायद्यानुसार योग्य निर्णय घेण्यासाठी हे न्यायालय सामान्यत: हे प्रकरण सभापती किंवा सभापतींकडे पाठवेल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

तथापि, खालील विशिष्ट तथ्ये व परिस्तिथी लक्षात घेता या न्यायालयाने अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्याचा निर्णय घेतला. (i ) त्या प्रकरणात विधानसभेचे अध्यक्ष अपात्रतेच्या प्रश्नावर कालबद्ध निर्णय घेण्यात अपयशी ठरले; (ii) संबंधित आमदारांना अपात्र ठरवण्यात आले की नाही, याचा निर्णय न घेता सभापतींनी पक्षात फूट पडली का, या मुद्द्यावर निर्णय घेतला; आणि

24 बसप

(iii) तीन वर्षांहून अधिक काळ अपात्रता याचिकांवर सभापतींनी निर्णय घेतला नाही आणि विधानसभेचा कार्यकाळ संपत आहे हे लक्षात घेऊन त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता. वरील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता अपात्रतेची कार्यवाही सभापतींकडे सोपविल्यास ते निष्फळ ठरतील, असे या न्यायालयाचे मत होते.

८०]. या न्यायालयाने सामान्यत: घटनात्मक हेतूचा विचार करून अपात्रता याचिकांवर निर्णय देणे टाळले पाहिजे. अपात्रतेच्या प्रश् नावर संबंधित घटनात्मक प्राधिकरणाने म्हणजेच विधानसभेच्या अध्यक्षांनी विहित प्रक्रियेचे पालन करून निर्णय घ्यावा. एखाद्या व्यक्तीला सभागृहाचे सदस्य म्हणून अपात्र ठरविल्यास संबंधित सदस्यावर आणि विस्ताराने त्या मतदारसंघातील नागरिकांसाठी गंभीर परिणाम होतात. त्यामुळे अपात्रतेचा कोणताही प्रश्न कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून त्यावर निर्णय घेतला पाहिजे. **क्षेत्रीमयुम बिरेन सिंह** (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने आमदारांना पुरावे सादर करण्याची आणि बाजू मांडण्याची संधी न दिल्याबद्दल परिच्छेद २ (१) (अ) अन्वये अपात्र ठरविण्याचा सभापतींचा आदेश रद्द बातल ठरवला. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करून अपात्रता याचिकांवर नव्याने निर्णय घेण्याचे निर्देश सभापतींना देण्यात आले. कायद्याने प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेचे पालन न करता अध्यक्ष अपात्रता याचिकांवर निर्णय देतात अशा प्रकरणांमध्येही हे न्यायालय सामान्यत: अपात्रता याचिका अध्यक्षांकडे निर्णयासाठी परत पाठवते. त्यामुळे अपवादात्मक परिस्थितीत, दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्याचे योग्य अधिकार सभापतींना आहेत.

८१. याचिकाकर्त्यांनी विनंती केली आहे की, वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता, या न्यायालयाने अपात्रतेची कार्यवाही महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांकडे सोपवू नये, कारण त्यांनी स्वत: ला प्रामाणिकपणाने आणि निःपक्षपातीपणे काम करण्यास अक्षम असल्याचे सिद्ध केले आहे. याचिकाकर्त्याचे म्हणणे मांडण्यापूर्वी राज्यघटनेनुसार सभापतींच्या दर्जाचा संदर्भ घेणे आवश्यक आहे. कलम १७८ मध्ये अशी तरतूद आहे की, विधानसभा शक्य तितक्या लवकर विधानसभेच्या दोन सदस्यांची सभापती आणि उपसभापती म्हणून निवड करेल. सभापती आणि उपसभापती निवडीच्या प्रक्रियेची तरतूद सर्वसाधारणपणे विधानसभेच्या संबंधित नियमांद्वारे केली जाते.

८२. संसदीय लोकशाहीत सभापती हा विधानसभेचा अधिकारी असतो. सभागृहाच्या कामकाजाचे अध्यक्षपद भूषविणे आणि सर्व उद्देश आणि प्रयोजनांसाठी सभागृहाचे प्रतिनिधित्व करण्याचे कार्य सभापती पार पाडतात. किहोटो होलोहान (उपरोल्लेखित) या प्रकरणात असा युक्तिवाद करण्यात आला होता की, सभापती विधानसभा सदस्यांच्या बहुमताने निवडून येत असल्याने ते स्वतंत्र न्याययंत्रणेचे प्रतिनिधित्व करत नाहीत. हा युक्तिवाद फेटाळून लावत या न्यायालयाने संसदीय परंपरेत सभापती पदाचा अत्यंत आदर केला जातो, यावर भर दिला. सभापती हे औचित्य आणि निःपक्षपातीपणाचे प्रतीक आहेत आणि म्हणूनच अध्यक्षांच्या पदावर अविश्वास व्यक्त करणे अयोग्य आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे:

> "११८. लोकशाहीच्या मूलभूत वैशिष्ट्याचे उल्लंघन केल्यामुळे या अधिकारक्षेत्राची शक्ती प्रदान करण्याला

बाधा येईल, असे म्हणणे खरोखरच त्या महान पदाच्या उच्च परंपरेवर अन्याय कारक ठरेल. अध्यक्षांच्या उच्च पदावर अविश्वास व्यक्त करणे अयोग्य आहे, कारण केवळ काही सभापतींनी त्या उच्च पदाच्या महान परंपरेला अनुसरून आपली कामे पार पाडल्याचा आरोप केला जातो किंवा तसे आढळून येते ? सभापतींची अधिकारपदाची वस्त्रं बदलतात आणि मानवी वृत्ती बळावते ."

(जोर दिला आहे)

८३. याचिकाकर्त्यांनी श्रीमंत बाळासाहेब पाटील विरुद्ध विधानसभा अध्यक्ष, कर्नाटक विधानसभा[25] या खटल्यातील निकालाचा आधार घेतला आहे, ज्यात असे म्हटले आहे की, जर सभापती त्यांच्या राजकीय पक्षापासून विभक्त होऊ शकत नसतील आणि तटस्थता आणि स्वातंत्र्याच्या भावनेच्या विरोधात काम करत असतील तर ते जनतेचा विश्वास आणि भरवसा व्यक्त करण्यास पात्र नाहीत. श्रीमंत बाळासाहेब पाटील (सुप्रा) प्रकरणात सभापतींनी काही आमदारांना अपात्र ठरविण्याचे आदेश काढून त्यांना विधानसभेच्या उर्वरित कार्यकाळासाठी निवडणूक लढविण्यास व सदस्य होण्यास मनाई केली. या न्यायालयाने अपात्रतेच्या प्रश्नावर सभापतींचा निर्णय कायम ठेवला. मात्र, दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेचा कालावधी निश्चित करण्याचा अधिकार सभापतींना नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सभापतींनी अधिकाराचा

25 (२०२०) २ एससीसी ५९५

केलेला घटनाबाह्य वापर लक्षात घेता या न्यायालयाने अपात्रतेच्या प्रश् नांवर निर्णय देताना सभापतींनी कोणत्या सामान्य तत्त्वांचे पालन करणे अपेक्षित आहे, हे स्पष्ट केले.

८४. **केशम मेघचंद्र सिंह विरुद्ध मणिपूर विधानसभेचे माननीय अध्यक्ष**[26] या खटल्यातही असेच म्हणणे या न्यायालयासमोर मांडण्यात आले होते. यामध्ये असे सांगण्यात आले होते की अपात्रतेच्या याचिका प्रलंबित असताना या न्यायालयाने एखाद्या आमदाराच्या मंत्री पदी नियुक्तीविरोधात को -वॉरंट रिट (कोणत्या अधिकाराखाली ते हे पद धारण करतात ) जारी करावे. हा युक्तिवाद फेटाळून लावत या न्यायालयाने खालीलप्रमाणे निकाल दिला.

> "८. दिवाणी अपिलात याचिकाकर्त्याच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी २०१७ च्या एसएलपी (सी) क्रमांक १८६५९ मधून उद्भवणाऱ्या दिवाणी अपिलामध्ये असा युक्तिवाद केला आहे की सध्याच्या प्रकरणात सभापतींनी त्यांच्यासमोरील अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्यास जाणीवपूर्वक नकार दिला आहे...... अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रमांक ३ ने घटनात्मक पद हडप केल्याचे सांगून त्यांच्याविरोधात रिट ऑफ को वॉरंट जारी करावे आणि ते तसे करू शकत नाही, असे जाहीर करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

26 (२०२०) एससीसी ऑनलाइन एससी ७५

३२. उत्तरवादी क्रमांक ३ ची भाजप सरकारच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळातील मंत्री पदी झालेली नियुक्ती रद्द करण्यासाठी या न्यायालयाने को वॉरंट रिट जारी करावे, हा सिब्बल यांचा युक्तिवाद मान्य करणे शक्य नाही. श्रीमती माधवी दीवान यांचे म्हणणे बरोबर आहे की, दहाव्या अनुसूचीनुसार आमदार आणि परिणामी मंत्री होण्यास अपात्र ठरविण्याचा निर्णय सर्वप्रथम या संदर्भातील विशेष प्राधिकरणाने म्हणजेच मणिपूर विधानसभेच्या अध्यक्षांनी घ्यावा. विधानसभा अध्यक्षांची निष्क्रियता पाहता या अपिलांमध्ये अपात्रता याचिकेवर या न्यायालयाने निर्णय घ्यावा, हा सिब्बल यांचा युक्तिवादही मान्य करणे शक्य नाही. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थिती **राजिंदर सिंग राणा** (उपरोल्लेखित) मधील वस्तुस्थितीशी मिळतीजुळती आहे, असे म्हणता येणार नाही. सध्याच्या प्रकरणात, **राजिंदर सिंग राणा** (उपरोल्लेखित) प्रमाणे विधानसभेचा कार्यकाल मार्च २०२२ मध्येच संपुष्टात येते, परंतु या न्यायालयाने अपात्रता याचिकेवर प्रभावी निर्णय दिल्यास, त्या प्रकरणात याचिकाकर्त्यास

कोणताही दिलासा देता आला नसता कारण विधानसभेचे आयुष्य संपुष्टात येणार होते. या अपिलांमध्ये एकच दिलासा दिला जाऊ शकतो तो म्हणजे मणिपूर विधानसभेच्या अध्यक्षांना हा निकाल कळविल्याच्या तारखेपासून चार आठवड्यांच्या कालावधीत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात यावेत. चार आठवड्यांच्या कालावधीनंतरही कोणताही निर्णय न आल्यास या प्रकरणातील पुढील निर्देशांसाठी/ सवलतींसाठी या न्यायालयाकडे अर्ज करण्याचा मार्ग कामकाजातील कोणत्याही पक्षकाराला खुला असेल.

८५. महाराष्ट्र विधानसभेच्या विद्यमान सभापतींची निवड आमदारांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १९६० अन्वये ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार केली आहे. श्री सुनील प्रभू यांची शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदी झालेली मान्यता रद्द करण्याच्या सभापतींच्या ३ जुलै २०२२ रोजीच्या निर्णयाचा संदर्भ देत याचिकाकर्त्यांनी सभापती पक्षपाती आणि निःपक्षपाती असल्याचा युक्तिवाद केला आहे.

८५ श्री प्रभू यांची मान्यता रद्द करण्याच्या सभापतींच्या निर्णयालाही तात्काळ कामकाजात आव्हान देण्यात आले आहे. श्री प्रभू यांची मान्यता गुणवत्तेच्या आधारे रद्द करण्याचा सभापतींचा निर्णय जरी या न्यायालयाने रद्द बातल ठरवला, तरी या न्यायालयाला अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्याचे पुरेसे कारण ठरणार नाही. महाराष्ट्र विधानसभेने विधानसभा अध्यक्षांची विधिवत निवड केली आहे आणि त्यांना राज्य याचिकांवर निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत, या साध्या कारणास्तव उपसभापतींना, अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे निर्देश देण्यासाठी याचिकाकर्त्यांचा पर्यायी युक्तिवादही आम्ही स्वीकारू शकत नाही. सभापतींचे पद रिक्त असेल तरच उपसभापती सभापतींची कर्तव्ये पार पाडू शकतात[27]. **किहोटो होलोहान** (उपरोल्लेखित) आणि **श्रीमंत बाळासाहेब पाटील** (उपरोल्लेखित) या प्रकरणात निरीक्षण नोंदविल्या सभापतींनी दहाव्या अनुसूचीतील अपात्रता याचिकांवर निर्णय देताना प्रामाणिकपणाने,स्वतंत्रपणे, आणि निःपक्षपातीपणे काम करणे अपेक्षित आहे. शेवटी अपात्रतेच्या प्रश्नावर सभापतींचा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन असतो. त्यामुळे दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष हे योग्य घटनात्मक अधिकारी आहेत, असे या न्यायालयाचे मत आहे.

27 राज्यघटनेचे अनुच्छेद १८०

## प्रतिबंधात्मक आचरण आणि अपात्रता याचिकेतील निर्णय यांच्यातील सभागृहाच्या कामकाजाची वैधता

८६. **राजेंद्रसिंह राणा** (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाच्या घटनापीठाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, जेव्हा आमदार दहाव्या अनुसूचीनुसार निषिद्ध वर्तन करतो तेव्हा ती अपात्रता होते. याचिकाकर्ते या निरीक्षणावर भिस्त ठेवत असा युक्तिवाद करतात की अपात्रता याचिका प्रलंबित असण्याच्या काळातील सभागृहातील कामकाजाची वैधता हे अपात्रता याचिकांच्या निकालावर अवलंबून असते. केवळ अपात्रता याचिका दाखल करून आमदारांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्यापासून रोखता येणार नसले, तरी प्रलंबित अपात्रता याचिकांमध्ये सभापतींच्या निर्णयावर अशा कारवाईचा निकाल अवलंबून असेल, असे याचिकाकर्त्यांचे कळकळीचे म्हणणे आहे. या न्यायालयाने, **राजेंद्रसिंह राणा** (उपरोल्लेखित) या प्रकरणात, त्यांच्या निरीक्षणांचा पल्ला समजून घेण्यासाठी ,कोणत्या संदर्भात निर्णय दिला हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

८७ उत्तर प्रदेशच्या चौदाव्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर मे २००२ मध्ये बसपाच्या नेत्या मायावती यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार स्थापन झाले. २७ ऑगस्ट २००३ रोजी बसपच्या तेरा आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहून समाजवादी पक्षाच्या नेत्याला सत्ता स्थापनेसाठी आमंत्रित करण्याची विनंती केली. ४ सप्टेंबर २००३ रोजी बसपच्या नेत्याने दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) मधील तरतुदींनुसार तेरा आमदारांविरुद्ध अपात्रता याचिका दाखल केली. ६ सप्टेंबर २००३ रोजी बसपच्या ३७ आमदारांनी पक्षात फूट पडल्याच्या मान्यतेसाठी विधानसभा

अध्यक्षांकडे दावा दाखल केला. 26 ऑगस्ट 2003 रोजी लखनौमध्ये झालेल्या बैठकीनंतर बसपामध्ये फूट पडली आणि त्यांनी या विभाजनामुळे निर्माण झालेल्या गटाचे प्रतिनिधित्व करणारा लोकतांत्रिक बहुजन दल या नावाचा गट स्थापन केला, असा दावा त्यांनी केला. त्याच दिवशी सभापतींनी विभाजनाचा दावा मान्य करत, अपात्रता याचिका प्रलंबित ठेवत, लोकतांत्रिक बहुजन दल या नावाने स्वतंत्र गटाला मान्यता दिली. राज्यघटनेच्या कलम २२६ अन्वये सभापतींनी विभाजनाला मान्यता देण्याच्या आदेशाला आव्हान देणारी कार्यवाही उच्च न्यायालयात सुरू करण्यात आली होती. उच्च न्यायालयाने सभापतींचा आदेश रद्द बातल ठरवत तेरा आमदारांविरोधात दाखल करण्यात आलेल्या अपात्रता याचिकांवर विचार करण्याचे निर्देश सभापतींना दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधातील अपील राजेंद्रसिंह राणा (उपरोल्लेखित) या प्रकरणात घटनापीठाने निकाली काढले.

८८. या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की,ज्यामुळे अपात्रता याचिका दाखल झाल्या अशी फूट पडली आहे की नाही याचा निर्णय सभापती घेऊ शकत नव्हते. फूट पडण्याचा बचाव कोणत्या वेळी अस्तित्वात असावा, या मुद्द्याचा न्यायालयाने विचार केला. त्या खटल्यातील प्रतिवादींनी असा युक्तिवाद केला की, ज्या दिवशी आमदार प्रतिबंधित कृत्यात सहभागी झाले त्या दिवशी परिच्छेद ३ नुसार फूट पडण्याचा बचाव अस्तित्वात असावा. त्याला उत्तर देताना याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की, ज्या दिवशी विधानसभा अध्यक्षांकडून अपात्रता याचिकांवर निर्णय होईल त्या दिवशी आमदारांनी परिच्छेद ३ नुसार फूट पडल्याचे सिद्ध करणे पुरेसे आहे. या संदर्भात या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, आमदारा प्रतिबंधित कृत्यात सहभागी झाले होते तेव्हा त्यांना अपात्र ठरविण्यात आले होते आणि म्हणूनच आमदारांनी जेंव्हा

प्रतिबंधित कृत्य केले तेव्हा अपात्रतेचा बचाव (या प्रकरणात,फूट ) देखील अस्तित्वात असावा. संबंधित निरीक्षणे खाली दिली आहेत:

"३४. आपण पाहतो की, एखाद्या सदस्याने स्वेच्छेने एखाद्या राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडल्यास किंवा त्याला जारी केलेल्या पक्षादेशाचा अवमान केल्याच्या वेळी अपात्रतेची कृती होते. त्यामुळे दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ नुसार अपात्र ठरणारा कायदा म्हणजे पक्षादेश नं मानण्याची किंवा त्याची अवहेलना करण्याची कृती होय. स्वेच्छेने पक्षादेश नं मानल्यास त्यासंदर्भातील निर्णय विधानसभा अध्यक्ष नंतरच्या वेळी घेऊ शकतात, ही वस्तुस्थिती आमदाराच्या कृतीने अपात्रतेची प्रक्रिया पुढे ढकलू शकत नाही आणि पुढे ढकलत नाही. त्याचप्रमाणे पक्षादेश नं मानण्याची कृती पक्षाला माफ करता येते किंवा त्या प्रकरणांमध्ये सभापती त्यानंतरच निर्णय घेतात, ही बाबही अपात्रतेची वेळ व्हिपचे उल्लंघन करण्याच्या बिंदूशिवाय इतर काही म्हणून मांडू शकत नाही.१५ दिवसाच्या आत त्यामुळे राज्यघटनेच्या बावन्नव्या दुरुस्तीने साध्य करू इच्छित असलेल्या उद्दिष्टाच्या पार्श् वभूमीवर आणि

दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद २ खऱ्या अर्थाने समजून घेऊन सदस्याने स्वेच्छेने सदस्यत्व सोडल्याच्या किंवा पक्षादेशाचे उल्लंघन केल्याच्या तारखेच्या संदर्भात सभापतींना अपात्रतेच्या प्रश्नावर निर्णय घ्यावा लागतो, अशी भूमिका पुढे येते. हा खरोखरच कार्योतर निर्णय आहे. परिच्छेद ६ नुसार या प्रश्नाचा निर्णय सभापती किंवा सभापतींनी घ्यायचा आहे, यावरून हा प्रश्न केवळ सभापतींच्या निर्णयाच्या तारखेच्या संदर्भानेच ठरवावा लागेल, असा निष्कर्ष काढता येणार नाही. त्या स्वरूपाचा अर्थ लावल्यास अपात्रता अनिश्चित काळासाठी आणि निर्णय घेणार् या अधिकार् यांच्या मर्जीवर अवलंबून राहील. यामुळे कायदा करण्याच्या सदरच्या उद्देशालाच धक्का बसेल. असा अर्थ शक्य तो टाळला पाहिजे. त्यामुळे केवळ सभापतींच्या निर्णयावर अपात्रतेची कृती घडली आहे अपात्रता आली आहे, हा युक्तिवाद मान्य करता येणार नाही, असे आमचे मत आहे. याचा अर्थ विद्वान सरन्यायाधीशांनी ज्याला स्नोबॉलिंग इफेक्ट म्हटले आहे, त्याकडेही दुर्लक्ष करावे लागेल आणि विधिमंडळ पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने

कोणत्या तारखेला सोडल्याचा आरोप केला जातो, या संदर्भात निर्णय घ्यावा लागेल.

(यावर भर दिला आहे)

८९. याचिकाकर्त्यांनी ज्या निरीक्षणांचा आधार घेण्याचा प्रयत्न केला आहे, ते अपात्रतेचा बचाव कोणत्या वेळी अस्तित्वात असावा हे ठरविण्याच्या संदर्भात करण्यात आले होते.

९०. **कुलदीप बिश्नोई** (उपरोल्लेखित) या प्रकरणात हरियाणा जनहित काँग्रेसच्या पाच आमदारांनी विधानसभा अध्यक्षांना पत्र लिहून हरयाणात सरकार स्थापन करणाऱ्या काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा इरादा व्यक्त केला. सभापतींनी विलीनीकरण स्वीकारले. त्यामुळे दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (अ) अन्वये अपात्रता याचिका दाखल करण्यात आल्या. सभापतींनी सलगपणे कामकाज तहकूब केले आणि सात महिन्यांहून अधिक काळ अपात्रता याचिकांवर निर्णय घेतला नाही. स्थगनाच्या एका आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने सभापतींना चार महिन्यांत याचिकांवर निर्णय घेण्याचे निर्देश दिले, विलीनीकरणाला मान्यता देण्याच्या आदेशाला स्थगिती दिली आणि पाच आमदारांना संलग्न सदस्य घोषित केले. या पाच आमदारांना काँग्रेस किंवा हरयाणा जनहित काँग्रेसचा भाग मानले जाणार नाही आणि त्यांना केवळ अधिवेशनात सहभागी होण्याचा अधिकार असेल, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. या याचिकेवर या न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पाच आमदारांना असंलग्न सदस्य घोषित करण्याचा आदेश रद्द बातल ठरवला. कुलदीप बिश्नोई (उपरोल्लेखित) प्रकरणात उच्च न्यायालय सभागृहातील सदस्यांना,त्यांच्याविरोधात अपात्रतेच्या

याचिका प्रलंबित असतांना असंलग्न सदस्य म्हणून घोषित करण्याचा अंतरिम आदेश देऊ शकले असते का, हा या न्यायालयासमोरील मुद्दा होता. त्यावर न्यायालयाने नकारार्थी उत्तर दिले. आमदारांना कोणत्याही निर्बंधाशिवाय काम करण्याचा अधिकार आहे, असे निरीक्षण नोंदवले. कुलदीप बिश्नोई (उपरोल्लेखित) येथील या न्यायालयाने जमावबंदी कायदा आणि अपात्रता याचिकेतील निर्णयाच्या दरम्यानच्या कालावधीत सभागृहाच्या कामकाजाचा निकाल निर्णयाच्या अधीन राहील की नाही या युक्तिवादाकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी मांडलेल्या युक्तिवादाचा या न्यायालयाने नव्याने विचार करण्याची गरज आहे.

९१. अनुच्छेद १९१ (२) नुसार एखाद्या व्यक्तीला दहाव्या अनुसूचीनुसार अपात्र ठरविल्यास ती विधानसभेचे सदस्य होण्यास अपात्र ठरेल. कलम १९० (३) नुसार दहाव्या अनुसूचीसह कलम १९१ (२) मधील तरतुदींनुसार एखाद्या आमदाराला अपात्र ठरल्यास त्याची जागा रिक्त होईल.

"१९०. [...]

(३) एखाद्या राज्याच्या विधिमंडळाच्या सभागृहाच्या सदस्य असल्यास –

(ए ) अनुच्छेद १९१ चा खंड (१) किंवा खंड (२)यामध्ये उपरोल्लेखित कोणत्याही कारणामुळे अपात्र होईल तर,; किंवा

(बी) अध्यक्षाला किंवा यथास्थिती, सभापतीला संबोधून आपल्या जागेचा स्वतःच्या सहीनिशी लेखी राजीनामा देईल आणि अध्यक्ष किंवा यथास्थिती, सभापती त्याचा राजीनामा स्वीकारला तर, तदनंतर त्याची जागा रिक्त

होईल. आपल्या जागेचा राजीनामा देतो आणि त्याचा राजीनामा सभापती किंवा सभापती स्वीकारतात, तसे झाल्यास त्याची जागा रिक्त होईल."

'त्यावर' या शब्दाचा अर्थ असा होतो की सभापती अपात्रता याचिकेवर निर्णय देतात त्या तारखेपासूनच जागा रिक्त होते. अपात्र ठरेपर्यंत आमदाराला सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा अधिकार आहे.[28]

९२. अनुच्छेद १८९ (२) आणि १०० (२) (संसदेसाठी संबंधित तरतुदी) नुसार नंतर असे आढळले की ज्या आमदाराला मतदान करण्याचा किंवा सभागृहात बसण्याचा अधिकार नाही त्याने कामकाजात भाग घेतला तरी विधिमंडळाच्या कोणत्याही कामकाजाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाणार नाही. अनुच्छेद १८९ (२) खाली नमूद केले आहे.

> (२) राज्य विधिमंडळाच्या सभागृहाच्या सदस्यत्वाची कोणतीही जागा रिक्त असली तरी, त्या सभागृहाला कार्य करण्याचा अधिकार असेल आणि राज्य विधानमंडळातील कोणतेही कामकाज त्या कामकाजाच्या वेळी तेथे स्थानापन्न होण्याचा किंवा अन्यथा भाग घेण्याचा जिला हक्क नव्हता अश्या एखाद्या

28 शिवराजसिंह चौहान (उपरोल्लेखित) आणि प्रताप गौडा पाटील (उपरोल्लेखित) पहा, जेथे या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की अपात्र होईपर्यंत आमदारांना सभागृहाच्या संख्याबळात गणले जातील आणि त्यांना कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असेल.

व्यक्तीने ते केले आहे असे मागाहून आढळून आले

तरीही विधिग्राह्य राहील.

अनुच्छेद १८९ (२) मधील तरतुदींचा या मुद्याच्या निश्चितीवर कोणताही परिणाम होणार नाही कारण सभागृहातील सदस्यांना अपात्र ठरल्यानंतरच सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार गमवावा लागतो. सभापतींचा हा निर्णय आमदाराने प्रतिबंधित वर्तन केल्याच्या तारखेशी संबंधित नाही. सभापतींचा निर्णय आणि अपात्रतेचे परिणाम संभाव्य आहेत.

९३. नंतर असे आढळले की आमदाराला मतदानाचा अधिकार नाही तेंव्हाच अनुच्छेद १८९(२) लागू होईल. तशी परिस्थिती येथे उद्भवत नाही. त्यामुळे उत्तरवादीनी कलम १८९ (२) चा आधार घेण्याची आवश्यकता नव्हती. निर्णय संभाव्य असताना अपात्रता याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहून सभागृहाचे कामकाज होऊ शकत नाही. शिवाय, याचिकाकर्त्यांनी मांडलेल्या विवेचनामुळे संसदीय शासनव्यवस्था अकार्यक्षम होईल. संसदेच्या पटलावर कायदे संमत करणे आणि वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे यासह असंख्य कामे केली जातात. कायद्यानुसार असलेल्या तरतुदीचा अपवाद वगळता आमदारांची ही कार्य रद्द न करता येण्याजोगी आहेत. संसदेतील किंवा राज्य विधिमंडळातील कामकाजाचे घटनात्मक पावित्र्य अनिश्चिततेच्या स्थितीत ठेवता येत नाही. अशा कार्यवाहीची वैधता भविष्यातील निर्णयाच्या अधीन राहू दिल्यास अराजकता निर्माण होईल. वरील कारणांमुळे ३ जुलै २०२२ रोजी सभापती श्री राहुल नार्वेकर यांची निवड करताना सभागृहाने केलेली कारवाई केवळ निवडणुकीत भाग घेतलेल्या काही आमदारांना अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जावे लागल्याने अवैध ठरत नाही. त्यानुसार आम्ही

या निर्णयाच्या परिच्छेद ३२ (ड) आणि ३२ (ई) मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे आमच्याकडे नमूद केलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो.

iv. प्रतोद आणि विधिमंडळ पक्षनेता नेमण्याचा अधिकार

९४. उत्तरवादींनी उपसभापतींच्या दि. २१ जून, २०२२ च्या पत्राला आव्हान दिले आहे ज्याद्वारे श्री अजय चौधरी यांची शि .वि.प च्या नेतेपदी नियुक्ती केली. याचिकाकर्त्यांनी सभापतींच्या ३ जुलै २०२२ च्या पत्राला आव्हान दिले आहे ज्याद्वारे (1) श्री अजय चौधरी यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आणि श्री शिंदे यांची शि.वि.प च्या नेतेपदी नियुक्ती करण्यात आली; आणि (२) श्री. सुनील प्रभू यांच्या जागी श्री गोगावले यांची मुख्य प्रतोद पदी नेमणूक करण्यात आली. संबंधित पत्रांच्या वैधतेवर निर्णय देण्यापूर्वी घटनेच्या अनुच्छेद २१२ अन्वये प्रतिरोध असल्याने प्रतोद आणि विधिमंडळ पक्षाच्या नेत्याला मान्यता देणाऱ्या पत्रव्यवहारांची न्यायालये चौकशी करू शकत नाहीत, या प्राथमिक आक्षेपाचे उत्तर देणे आवश्यक आहे.

ए. अनुच्छेद २१२ अन्वये प्रतिरोध : कायदेविषयक कामकाजाची विधिग्राह्यता

९५. अनुच्छेद २१२ (१) नुसार प्रक्रियेच्या कथित अनियमिततेच्या कारणास्तव न्यायालय एखाद्या राज्याच्या विधिमंडळाच्या कामकाजाच्या वैधतेची चौकशी करणार नाही:

> २१२. न्यायालयांनी विधिमंडळाच्या कामकाजा बाबत
>
> चौकशी न करणे

(१) कार्यपद्धतीत एखादी तथाकथित नियमबाह्य गोष्ट घडली आहे या कारणावरून राज्य विधानमंडळातील कोणत्याही कामकाजाची विधिग्राह्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करता येणार नाही.

९६. अनुच्छेद २१२ (आणि संसदेसाठी संबंधित तरतूद, अनुच्छेद १२२) अन्वये विधिमंडळाच्या कामकाजाच्या न्यायालयीन पुनरावलोकनावरील निर्बंधाची व्याप्ती या न्यायालयाने यापूर्वीही स्पष्ट केली आहे. १९६४ च्या विशेष संदर्भ क्रमांक १ मध्ये (राज्य विधिमंडळांचे अधिकार, विशेषाधिकार आणि संरक्षण)[29] सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की कलम २१२ केवळ 'प्रक्रियेच्या अनियमिततेच्या' कारणास्तव न्यायालयीन पुनरावलोकनावर निर्बंध घालते आणि 'प्रक्रिया बेकायदेशीर आणि घटनाबाह्य' असल्यास विधिमंडळाच्या कामकाजाला आव्हान दिले जाऊ शकते. राजा राम पाल (सुप्रा) प्रकरणात घटनापीठाने असे म्हटले आहे की, विधिमंडळाच्या कार्यवाहीला 'मूलभूत बेकायदेशीरता किंवा घटनाबाहयता' या कारणास्तव आव्हान दिले जाऊ शकते. न्यायमूर्ती के. एस. पुट्टास्वामी वि. केंद्र सरकार (आधार ५ जे),[30] या प्रकरणात न्यायालयासमोरील एक मुद्दा हा होता की कलम २१२ मुळे सभापतींच्या धनविधेयकाबाबतच्या अधिकाराचे न्यायालयीन पुनरावलोकन होऊ शकत नाही का? सिक्री, जे. यांनी बहुमतासाठी लिहिताना असे निरीक्षण नोंदवले की जर कलम २१२ मध्ये केवळ 'प्रक्रियेची अनियमितता' या कारणास्तव आव्हाने मर्यादित आहेत, 'मूलभूत बेकायदेशीरता' नाही. आमच्यापैकी एकाने (डी. वाय. चंद्रचूड, जे.) आपल्या असहमतीच्या मतात असे निरीक्षण

29 एआयआर १९६५ एससी ७४५
30 (२०१९) १ एससीसी १

नोंदवले की जर सभापतींचा निर्णय "बेकायदेशीरपणा किंवा घटनात्मक तरतुदींचे उल्लंघन" असेल तर, कलम २१२ विधिमंडळाच्या कामकाजाचा न्यायालयीन पुनरावलोकन करण्यास प्रतिबंधित करत नाही. **रोजर मॅथ्यू वि. साऊथ इंडियन बँक लि.**[31] घटनात्मक योजनेचे घोर उल्लंघन ही प्रक्रियात्मक अनियमितता मानली जाऊ शकत नाही, असे निरीक्षण या न्यायालयाने नोंदवले. या न्यायालयाने सातत्याने असे म्हटले आहे की घटनात्मक तरतुदीचे मूलभूत बेकायदेशीरपणा किंवा उल्लंघन हे केवळ प्रक्रियेच्या अनियमिततेपेक्षा वेगळे आहे आणि न्यायालयीन पुनरावलोकनास पात्र आहे.

९७. प्रक्रियेच्या अनियमिततेच्या कारणास्तव न्यायालयांना हस्तक्षेप करण्यापासून रोखणाऱ्या अशाच तरतुदी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३[32] मध्ये आहेत. फौ प्र. सं च्या कलम ४६५ मध्ये अशी तरतूद आहे की, जोपर्यंत न्यायालयाच्या मते न्याय देण्यात अपयश येत नाही, तोपर्यंत केवळ कामकाजातील अनियमिततेच्या कारणास्तव एखादा निकाल किंवा शिक्षा बदलता येत नाही.[33] प्रक्रियेच्या अनियमिततेची संकल्पना सेवा न्यायशास्त्रातही रूढ आहे. रोजगार नियमित करण्याच्या संदर्भात या न्यायालयाने असे म्हटले आहे की, ज्या कर्मचाऱ्यांची अनियमितपणे नियुक्ती करण्यात आली आहे त्यांना नियमित केले जाऊ शकते, परंतु बेकायदेशीरपणे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याना नियमित केले जाऊ शकत नाही. **यूपी राज्य वि. देश राज**[34] या प्रकरणात, या न्यायालयाने म्हटले आहे की, "सर्व घटनात्मक जबाबदाऱ्या आणि वैधानिक नियम वाऱ्यावर टाकून केलेली नियुक्ती बेकायदेशीर ठरेल, तर अनियमिततेमुळे नियमांचे पुरेसे पालन करणे

31 (२०२०) ६ एससीसी १
32 फौ. प्र. सं.
33 पहा प्रदीप एस वोडेयार विरुद्ध कर्नाटक राज्य, २०२१ एससीसी ऑनलाईन एससी ११४०
34 (२००७) १ एससीसी २५७

आवश्यक आहे." त्यामुळे प्रक्रियेचे उल्लंघन केल्याने कार्यवाही अनियमित होईल की बेकायदेशीर हा मुद्दा प्रत्येक प्रकरणाच्या संदर्भापुरता विशिष्ट असतो. हे विहित प्रक्रियेच्या हेतूवर आणि त्याचे पालन न करण्याच्या परिणामावर अवलंबून असते. हे प्रक्रिया कायद्याच्या विविध क्षेत्रांमध्ये खरे आहे.

९८. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा या मतदारांनी थेट निवडून दिलेल्या सदस्यांनी बनलेल्या असतात. ज्या उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतात तो उमेदवार विधानसभेत निवडून येतो. जो राजकीय पक्ष अर्धा टप्पा गाठतो, तोच सरकार स्थापन करतो. कोणत्याही एका राजकीय पक्षाने अर्धा आकडा गाठला नाही तर राजकीय पक्षांची आघाडी सरकार स्थापन करू शकते. कलम ७५ आणि १६४ मध्ये अशी तरतूद आहे की मंत्रिमंडळ अनुक्रमे राज्याच्या लोकसभा आणि विधानसभेला एकत्रितपणे जबाबदार आहे. जनतेने थेट निवडून दिलेल्या आमदारांचे कर्तव्य आहे की, सभागृहाच्या पटलावर कार्यकारिणीला जबाबदार धरण्यात यावे. कायदेविषयक कार्यपद्धती दोन उद्दिष्टे साध्य करतात - एक, ते कार्यकारणीला जबाबदार धरण्यासाठी सभागृहाच्या पटलावर विचारविनिमय आणि चर्चा करण्यास सक्षम करतात आणि अशा विचारविनिमयामुळे चांगले घटनात्मक परिणाम देखील मिळतात; आणि दुसरे, ते विद्यमान सरकारच्या सत्तेच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी एक प्रणाली तयार करतात. राज्यघटनेने ठरवून दिलेल्या काही प्रक्रियात्मक गरजा घटनात्मक मूल्यांचे रक्षण करतात. हे कलम ३६८ मध्ये प्रतिबिंबित होते ज्यात काही घटनात्मक तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष बहुमताची तरतूद आहे, जी घटनेच्या सदस्यांच्या मते विधानसभेला उच्च घटनात्मक (आणि लोकशाही) मूल्य आहे. इतर काही कायदेविषयक प्रक्रिया लोकशाही प्रक्रिया पुढे नेतात आणि उत्तरदायित्व वाढवतात आणि

विद्यमान सरकारच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण रोखतात. अनुच्छेद २१२ चा अर्थ सर्व प्रक्रियात्मक उल्लंघनांना न्यायालयीन पुनरावलोकनाच्या चौकटीच्या पलीकडे ठेवणे असा केला जाऊ शकत नाही. कारण अशा अर्थामुळे घटनात्मक लोकशाहीत कायदेविषयक प्रक्रियेचे महत्त्व पूर्णपणे दुर्लक्षित होईल.

९९. अनियमित प्रक्रिया आणि बेकायदेशीर प्रक्रिया यांच्यातील फरक ज्या प्रक्रियेचे उल्लंघन करण्यात आला त्या प्रक्रियेचे स्वरूप आणि अशा उल्लंघनाचा लोकशाही आदर्शांवर होणारा परिणाम यावर आधारित काढला गेला पाहिजे. जर अशा प्रक्रियेचा हेतू लोकशाही आदर्शांशी संबंधित नसेल आणि त्याचे उल्लंघन लोकशाही प्रक्रियेच्या मुळाशी जात नसेल तर प्रक्रियेचे उल्लंघन अनियमित ठरेल.

१००. वर नमूद केलेल्या अनुच्छेद २१२ च्या विवेचनावर या न्यायालयाची निरीक्षणे केवळ कायद्याच्या स्त्रोताच्या आधारे अनियमितता आणि बेकायदेशीरपणा यात फरक करीत नाहीत. ही प्रक्रिया राज्यघटनेत रुजलेली आहे की नाही, यावर हा फरक नाही, तर लोकशाहीच्या अस्तित्वासाठी ती महत्त्वाची आहे की नाही, यावर आधारित आहे. वर नमूद केलेल्या दुहेरी उद्दिष्टांची पूर्तता करणार् या आणि संसदीय लोकशाहीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धतीचे उल्लंघन केल्यास ही कारवाई बेकायदेशीर ठरेल. दुसरीकडे, सुव्यवस्था प्रस्थापित करणार्या प्रक्रियेचे उल्लंघन केवळ अनियमित असू शकते.

१०१. **रामदास आठवले वि. भारतीय संघराज्य**[35] या प्रकरणात लोकसभेचे एक सदस्य यांनी, जेव्हा संसदेचे अधिवेशन २९ जानेवारी २००४ रोजी सुरू झाले जे वर्षाचे पहिले अधिवेशन होते

35 (२०१०) ४ एससीसी १

त्यावेळी राष्ट्रपतींनी कलम ८७ अन्वये संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित केले नाही, या कारणास्तव लोकसभेतील कामकाजाच्या वैधतेला आव्हान दिले. २९ जानेवारी, २००४ रोजीचे अधिवेशन हे केवळ कॅलेंडर वर्षाचे पहिले अधिवेशन आहे म्हणून वर्षाचे पहिले अधिवेशन मानता येणार नाही आणि जास्तीत जास्त तेराव्या लोकसभेच्या चौदाव्या अधिवेशनाचा दुसरा भाग मानता येईल, असा निकाल सभापतींनी दिला. अनुच्छेद १२२ अन्वये असलेली बंदी लक्षात घेता २९ जानेवारी, २००४ रोजीचे अधिवेशन हे नवे अधिवेशन होते की त्याच अधिवेशनाचा दुसरा भाग हा निव्वळ संसदेच्या कार्यपद्धतीशी निगडित विषय होता, असा निर्वाळा या न्यायालयाने दिला.

> "३७. [...] २३-१२-२००३ रोजी सभापतींनी सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्याचा घेतलेला निर्णय आणि भाग दोनमधील कामकाज पुन्हा सुरू करण्याचे निर्देश हे मुळात संसदेतील कामकाजाशी निगडित असून ते प्रक्रियात्मक स्वरूपाचे आहे. सभापतींच्या सूचनेनुसार कामकाज सुरू झाल्यानंतर कामकाज आणि कामकाजाच्या वैधतेची न्यायालयाकडून चौकशी करता येणार नाही.

रामदास आठवले (उपरोल्लिखित) या प्रकरणात ही निव्वळ कार्यपद्धतीची बाब असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे, याचा अर्थ प्रक्रियात्मक उल्लंघन न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन

नाही, असा अर्थ काढता येणार नाही. ज्या प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचा आरोप करण्यात आला आहे, त्यामुळे कामकाज अनियमित होईल आणि त्यामुळे कामकाजात व्यत्यय येणार नाही, असे निरीक्षण या न्यायालयाने नोंदवले. रामदास आठवले (उपरोल्लिखित) मधील निरीक्षणे वरील विश्लेषणाच्या संदर्भात वाचली पाहिजेत की प्रक्रियात्मक उल्लंघनांमुळे कामकाजात अडथळा निर्माण होईल आणि त्यांच्या उल्लंघनाचा संसदेच्या लोकशाही कामकाजावर परिणाम होईल.

बी. प्रतोद आणि विधिमंडळ पक्षनेता नेमण्याचा अधिकार

i. 'राजकीय पक्ष' आणि 'विधिमंडळ पक्ष' या भेद दाखवता येण्यासारख्या वेगळ्या संकल्पना आहेत.

१०२. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद १ (ब) मध्ये "विधिमंडळ पक्ष" ची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

> परिच्छेद २ किंवा परिच्छेद ४ मधील तरतुदींनुसार कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित सभागृहाच्या सदस्याच्या संदर्भात विधिमंडळ पक्ष म्हणजे त्याच तरतुदींनुसार त्या सभागृहातील सर्व सदस्यांचा समावेश असलेला गट"

परिच्छेद १ (क) मध्ये परिच्छेद २ (१) च्या उद्देशाने सदस्य ज्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे तो राजकीय पक्ष म्हणून "मूळ राजकीय पक्ष" अशी व्याख्या केली आहे. परिच्छेद २ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, 'कोणत्याही राजकीय पक्षा'शी संबंधित सदस्याने स्वेच्छेने अशा राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले असेल किंवा ते ज्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत त्या राजकीय पक्षाने दिलेल्या निर्देशाच्या विरुद्ध मतदान केल्यास किंवा त्याद्वारे अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्ती किंवा प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशाच्या विरोधात मतदान केल्यास त्याला सभागृहाचे सदस्य होण्यास अपात्र ठरविले जाईल. राजकीय पक्षाच्या निर्देशांविरुद्ध मतदान केलेल्या सदस्याला राजकीय पक्षाने असे मत माफ केल्यास किंवा राजकीय पक्षाची पूर्वपरवानगी घेतल्यास अपात्र ठरविण्यात येणार नाही.

> २. पक्षांतराच्या कारणास्तव अपात्रता.—(१) ३ [परिच्छेद ४ व ५] मधील तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित सभागृहाचा सदस्य सभागृहाचे सदस्य होण्यास अपात्र ठरेल-
>
> ए. जर त्याने स्वेच्छेने अशा राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले असेल; किंवा
>
> बी. जर तो ज्या राजकीय पक्षाशी संबंधित आहे त्या राजकीय पक्षाने किंवा त्याद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने जारी केलेल्या कोणत्याही निर्देशाच्या विरुद्ध अशा सभागृहात मतदान केल्यास किंवा मतदानापासून दूर राहिल्यास, कोणत्याही परिस्थितीत, अशा राजकीय पक्षाची, व्यक्तीची किंवा प्राधिकरणाची पूर्वपरवानगी न

घेता आणि अशा प्रकारचे मतदान किंवा बहिष्कार अशा मतदानाच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अशा राजकीय पक्षाने माफ केलेला नाही.

स्पष्टीकरण.—या उपपरिच्छेदाच्या हेतूनेः- (अ) सभागृहातील निवडून आलेला सदस्य त्या राजकीय पक्षाचा प्रतिनिधी मानला जाईल, ज्याद्वारे तो सदस्य म्हणून निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभा करण्यात आला होता; (यावर भर दिला आहे)

१०३. याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की प्रतोद आणि नेत्याची नियुक्ती राजकीय पक्षाने केली पाहिजे कारण परिच्छेद 2 (1) (बी) नुसार सभागृहात विशिष्ट पद्धतीने मतदान करण्याचे निर्देश राजकीय पक्षाकडून किंवा त्याद्वारे अधिकृत व्यक्तीकडून म्हणजेच राजकीय पक्षाकडून असणे आवश्यक आहे. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील फरक कृत्रिम असून त्या परस्परांशी निगडित संकल्पना आहेत, असे उत्तरवादींचे म्हणणे आहे. यासाठी दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ४ (२) व चिन्ह आदेशातील परिच्छेद ६ अ चा संदर्भ देण्यात आला. 'राजकीय पक्ष' या शब्दाची व्याख्या दहाव्या परिशिष्टात केलेली नाही. तथापि, परिच्छेद क्रमांक २ चे स्पष्टीकरण, राजकीय पक्षांचा उल्लेख करताना एक मानीव कल्पित बाब तयार करते. परिच्छेद २ च्या स्पष्टीकरणात अशी तरतूद करण्यात आली आहे की, सभागृहाचा निवडून आलेला सदस्य ज्या राजकीय पक्षाद्वारे निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभा केला गेला होता, त्या पक्षाचा मानला जाईल. परिच्छेद ४ आणखी एक मानीव कल्पित बाब निर्माण करतो. या तरतुदीनुसार जर

"मूळ राजकीय पक्ष" दुसर् या राजकीय पक्षात विलीन झाला आणि ते अशा इतर राजकीय पक्षाचे किंवा नवीन राजकीय पक्षाचे सदस्य झाले तर असा दुसरा राजकीय पक्ष किंवा नवीन राजकीय पक्ष परिच्छेद २ च्या उद्देशाने सदस्याचा राजकीय पक्ष समजला जाईल. उदाहरणार्थ, जर पक्ष अ पक्ष ब मध्ये विलीन होऊन पक्ष क तयार झाला किंवा पक्ष अ पक्ष ब मध्ये विलीन झाला तर पक्ष अ च्या निर्देशाविरुद्ध मतदान केल्याबद्दल पक्ष अ च्या सदस्या कुमारी झेड ला अपात्र ठरविले जाणार नाही. कारण दहाव्या अनुसूचीच्या उद्देशाने पक्ष ब किंवा पक्ष क हा त्यांचा मूळ राजकीय पक्ष समजला जाईल. परिच्छेद ४ (२) नुसार विधिमंडळ पक्षाच्या किमान दोन तृतीयांश सदस्यांनी विलीनीकरणास सहमती दर्शविली असेल तरच विलीनीकरण झाल्याचे मानले जाते:

> "४. [...]
>
> (२) या परिच्छेदाच्या उपपरिच्छेद (१) च्या हेतूसाठी एखाद्या सभागृहाच्या सदस्याच्या मूळ राजकीय पक्षाचे विलीनीकरण तेव्हाच झाले असे मानले जाईल जेव्हा संबंधित विधिमंडळ पक्षाच्या दोन तृतीयांश सदस्यांनी अशा विलीनीकरणास सहमती दर्शविली असेल.

संविधान (९१ वी दुरुस्ती) अधिनियम, २००३ द्वारे वगळण्यात आलेल्या परिच्छेद ३ मध्ये मूळ राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्षात फूट पडल्यास सदस्याला त्यांच्या प्रतिबंधात्मक वर्तनासाठी अपात्र ठरविले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती.

१०४. चिन्ह आदेशाच्या परिच्छेद ६ अ मध्ये चिन्ह आदेशाच्या उद्देशाने एखाद्या राजकीय पक्षाला मान्यताप्राप्त राज्य पक्ष म्हणून मान्यता देण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत. या तरतुदीनुसार राजकीय पक्षाने ठराविक टक्के मते मिळवली असावीत आणि राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी ठराविक संख्येने उमेदवार विधानसभेत निवडून आणलेले असावेत:

> "६ अ. राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळण्याच्या अटी - खालीलपैकी कोणत्याही अटींची पूर्तता केल्यास एखादा राजकीय पक्ष एखाद्या राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यता मिळण्यास पात्र असेल:
>
> (१) राज्याच्या विधानसभेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने उभे केलेल्या उमेदवारांना राज्यातील एकूण वैध मतांच्या सहा टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली नाहीत; आणि त्याव्यतिरिक्त, पक्षाने अशा सार्वत्रिक निवडणुकीत त्या राज्याच्या विधानसभेत कमीतकमी दोन सदस्य निवडून आणले आहेत; किंवा
>
> (२) त्या राज्यातील लोकप्रतिनिधी मंडळाच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने उभे केलेल्या उमेदवारांना राज्यातील एकूण वैध मतांच्या सहा टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली नाहीत; आणि, याव्यतिरिक्त, पक्षाने अशा

सार्वत्रिक निवडणुकीत त्या राज्यातून किमान एक सदस्य लोकप्रतिनिधीगृहात निवडून आणला आहे; किंवा

(३) राज्याच्या विधानसभेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने विधानसभेच्या एकूण जागांपैकी किमान तीन टक्के जागा जिंकल्या आहेत, (अर्ध्यापेक्षा जास्त भाग एक म्हणून गणला जातो), किंवा विधानसभेत किमान तीन जागा, जे अधिक असेल; किंवा

(४) राज्यातील लोकप्रतिनिधीसभेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने प्रत्येक २५ सदस्यांमागे किमान एक सदस्य किंवा त्या-त्या राज्याला देण्यात आलेला काही भाग निवडून आणला आहे; किंवा

(५) राज्यातील लोकप्रतिनिधीपदाच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत किंवा राज्याच्या विधानसभेच्या गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाने उभे केलेल्या उमेदवारांना राज्यातील एकूण वैध मतांच्या किमान आठ टक्क्यांपेक्षा कमी मते मिळाली नाहीत.

१०५. 'राजकीय पक्ष' आणि 'विधिमंडळ पक्ष' यांची सांगड घालता येणार नाही. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे अविभाज्यपणे एकमेकांत गुंतलेले आहेत, हा उत्तरवादींचा युक्तिवाद खालील कारणांमुळे चुकीचा आहे.

ए. पक्षांतरविरोधी कायद्यांमुळे पक्षांतर्गत असंतोष आणि आमदारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येऊ नये, याची जाणीव संसदेला तिच्या संविधानिय क्षमतेने होती. याच उद्देशाने विलीनीकरण, आणि विभाजन (जे नंतर वगळण्यात आले) या संरक्षणाची सुरुवात करण्यात आली. दहाव्या परिशिष्टात आमदारांच्या कृतींना वैधता देण्यात आली आहे, अन्यथा मोठ्या संख्येने आमदार (विलीनीकरणाच्या बाबतीत दोन तृतीयांश आणि विभाजनाच्या पूर्वीच्या तरतुदीच्या बाबतीत एक तृतीयांश) राजकीय पक्षाशी असहमत असतील तर ते अपात्र ठरतील. दहाव्या परिशिष्टात विधिमंडळ पक्षाच्या स्वतंत्र अस्तित्वाला मर्यादित मर्यादेपर्यंत मान्यता देण्यात आली आहे, अन्यथा पक्षांतर झाले असते; आणि

बी. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम २९ अ नुसार स्वत:ला राजकीय पक्ष म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींच्या संघटनेची भारतीय निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. राजकीय पक्ष म्हणून नोंदणी होण्यासाठी पक्षाने विधानसभेत उमेदवार निवडून आणण्याची गरज नाही. चिन्ह आदेशानुसार, एखाद्या राजकीय पक्षाला राजकीय पक्षाने विधानसभेत निवडून आणलेल्या एकूण उमेदवारांची संख्या आणि/ किंवा निवडणुकीत मिळालेल्या एकूण मतांच्या टक्केवारीच्या आधारे राज्य पक्ष किंवा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळते. त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह गोठविण्यासाठी राजकीय पक्षाची निवडणुकीच्या रिंगणात पुरेशी उपस्थिती आहे की नाही हे ओळखणे हा चिन्ह आदेशाअंतर्गत आवश्यकतेचा हेतू आहे. चिन्ह आदेशामध्ये दहाव्या

अनुसूचीप्रमाणे राजकीय पक्षाशी संबंधित आमदारांच्या संघटनेचा उल्लेख नाही. त्यात 'आमदार' आणि 'राजकीय पक्ष' अशी मान्यता आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष या संकल्पना एकमेकांत गुंफलेल्या आहेत, असा युक्तिवाद करण्यासाठी प्रतीक आदेशातील तरतुदींचा संदर्भ योग्य ठरत नाही कारण विधिमंडळ पक्षाची संकल्पना प्रतीक आदेशाने मान्य केलेली नाही.

ii. <u>दहाव्या अनुसूची, १९८६ चे नियम आणि १९५६ च्या कायद्यातील तरतुदींचे शब्दश: व हेतूपूर्ण विवेचन</u>

१०६. १९८६ च्या नियमावलीतील नियम २ (फ) नुसार विधिमंडळ पक्षाच्या संदर्भात 'नेता' म्हणजे त्याने नेता म्हणून निवडलेल्या पक्षाचा सदस्य आणि नेत्याच्या अनुपस्थितीत कार्य करण्यासाठी पक्षाने अधिकृत केलेल्या पक्षाच्या इतर कोणत्याही सदस्याचा समावेश आहे. नियम ३ (१) नुसार विधिमंडळ पक्षाच्या नेत्याने विधिमंडळ पक्ष स्थापन केल्यापासून तीस दिवसांच्या आत खालील गोष्टी सादर करणे आवश्यक आहे.

१. विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांची नावे व फॉर्म १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदस्यांच्या तपशीलांसह लेखी निवेदन आणि या नियमांच्या उद्देशाने सभापतींशी संवाद साधण्यासाठी प्राधिकृत केलेल्या सदस्यांची नावे व पदनाम;

२. राजकीय पक्षाच्या नियम-कायद्यांची प्रत; आणि

३. विधिमंडळ पक्षाचे स्वतंत्र नियम असतील तर त्याची प्रत.

नियम ३ (१) खाली नमूद केला आहे:

"३. विधिमंडळ पक्षाच्या नेत्याने सादर करावयाची माहिती:-

(१) प्रत्येक विधिमंडळ पक्षाचा नेता (केवळ एक सदस्य असलेला विधिमंडळ पक्ष वगळता) हे नियम लागू झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा अशा तारखेनंतर अशा विधिमंडळ पक्षाची स्थापना झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत किंवा कोणत्याही परिस्थितीत, अध्यक्ष पुरेशा कारणास्तव परवानगी देईल तितक्या पुढील कालावधीत, सभापतींना खालील गोष्टी सादर करेल. उदा. :—

ए. अशा विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांची नावे आणि फॉर्म-१ मधील अशा सदस्यांविषयीइतर तपशील असलेले निवेदन (लेखी) आणि अशा पक्षाच्या सदस्यांची नावे व पदनाम ज्यांना या नियमांच्या उद्देशाने सभापतींशी संवाद साधण्यासाठी अधिकृत करण्यात आले आहे;

बी. संबंधित राजकीय पक्षाच्या नियम व कायद्यांची प्रत; (मग ती अशी असो किंवा संविधान म्हणून किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखली जाते आणि

सी. विधिमंडळ पक्षाच्या नियम आणि कायद्यांची एक प्रत, जिथे अशा पक्षाचे काही स्वतंत्र नियम आणि कायदे असतात (मग ते तसे किंवा संविधान म्हणून किंवा इतर कोणत्याही नावाने ओळखले जातात) तसेच अशा नियम आणि कायद्यांची एक प्रत देखील सादर करतील.

[...]"

१०७. जर नियम ३ (१) अन्वये देण्यात आलेल्या माहितीत बदल झाला असेल तर नियम ३(४) नुसार विधिमंडळ पक्षनेत्याने अद्ययावत माहिती सादर करणे बंधनकारक आहे. नियम ३ (५) नुसार एखाद्या सदस्याने राजकीय पक्षाच्या पूर्वपरवानगीशिवाय राजकीय पक्षाच्या निर्देशांविरुद्ध विधानसभेत मतदान केले किंवा मतदानास टाळाटाळ केली किंवा गैरहजर राहिल्यास, विधिमंडळ पक्षाचा नेता अशा मतदानानंतर तीस दिवसांच्या आत असे मतदान किंवा बहिष्कार राजकीय पक्षाने माफ केला आहे की नाही याची माहिती सभापतींना देऊ शकतो. राजकीय पक्षाच्या निर्देशाविरुद्ध मतदान केले तरी सभापतींना कळवावे, असेही या नियमात नमूद करण्यात आले

आहे. १९८६ च्या नियमावलीत ‘पक्षादेश’ हा शब्द वापरला जात नाही किंवा त्याची व्याख्याही केली जात नाही.

१०८. १९५६ च्या कायद्यात ‘प्रतोद’ या शब्दाची व्याख्या करण्यात आली आहे. १९५६ च्या कायद्याच्या कलम २ मध्ये अशी तरतूद आहे की अनुसूची १ मध्ये विहित केलेली पदे भूषविण्यासाठी आमदार अपात्र ठरणार नाही.अनुसूची १ च्या खंड २३ मध्ये महाराष्ट्र राज्य विधिमंडळातील मुख्य प्रतोद किंवा प्रतोद पदांचा उल्लेख आहे. या कलमाच्या स्पष्टीकरणात प्रतोद या संज्ञेची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे:

> "स्पष्टीकरण:- १) महाराष्ट्र विधानसभेच्या संदर्भात "मुख्य प्रतोद" किंवा "प्रतोद" या शब्दाचा अर्थ असा होतो की, ज्या सभागृहाचा सदस्य सध्या तरी सरकार स्थापन करणार् या पक्षाने त्या सभागृहात मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित केला आहे आणि सभापतींनी तशी मान्यता दिली आहे; आणि त्यामध्ये सभागृहाच्या एका सदस्याचा समावेश आहे, जो सध्या तरी सभागृहाच्या एकूण संख्येच्या किमान दहा टक्के असलेल्या पक्षाने तसे घोषित केले आहे आणि सभापतींनी तसे मान्य केले आहे; आणि

(२) महाराष्ट्र विधान परिषदेच्या संदर्भात "मुख्य प्रतोद" किंवा "प्रतोद" या शब्दाचा अर्थ असा होतो की सभागृहाचा तो सदस्य जो सध्या सरकार स्थापन करणार् या पक्षाने सभागृहात मुख्य प्रतोद किंवा प्रतोद म्हणून घोषित केला आहे आणि सभापतींनी त्यास तशी मान्यता दिली आहे; आणि त्यामध्ये सभागृहाच्या एका सदस्याचा समावेश आहे, ज्याला सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या किमान दहा टक्के सदस्य असलेल्या पक्षाने तसे घोषित केले आहे आणि सभापतींनी तशी मान्यता दिली आहे.

१०९. दहावी अनुसूची, १९८६ चे नियम आणि १९५६ चा कायदा यातील तरतुदींचा शब्दश: अर्थ लावल्यास मतदान करण्याचे किंवा मतदानापासून दूर राहण्याचे निर्देश खालील कारणांसाठी विधिमंडळ पक्षाकडून नव्हे तर राजकीय पक्षाकडून येतात.

ए. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१) (ब) मध्ये अशी तरतूद आहे की मतदान करण्याचे किंवा मतदानापासून दूर राहण्याचे निर्देश राजकीय पक्षाने किंवा "त्याने अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्ती किंवा प्राधिकरणाने" जारी केले पाहिजेत आणि ‘त्याने’ हा शब्द राजकीय पक्षाचा संदर्भ देतो. या तरतुदीनुसार सदस्याला निर्देशाच्या विरोधात मतदान करायचे असेल तर राजकीय पक्षाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे आणि

राजकीय पक्षाने पंधरा दिवसांच्या आत अशी कारवाई माफ करावी. दहाव्या परिशिष्टातील तरतुदींमध्ये स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, निर्देश विधिमंडळ पक्षाकडून नव्हे तर राजकीय पक्षाकडून आले पाहिजेत. राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील फरक परिच्छेद १ मधील व्याख्येच्या कलमात करण्यात आला आहे. यात दोन मार्ग नाहीत. 'राजकीय पक्ष' हा शब्द 'विधिमंडळ पक्ष' म्हणून वाचला तर दहावी अनुसूची अकार्यक्षम ठरेल. परिच्छेद ४ अन्वये विलीनीकरणाच्या उद्देशाने राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यात स्पष्ट सीमांकन केले जाते, ज्यात  असे विलिनीकरण झाल्याचे मानण्यापूर्वी विधिमंडळ पक्षाच्या दोन तृतीयांश सदस्यांनी मूळ राजकीय पक्षाचे विलीनीकरण करण्यास सहमती दर्शविलेली असावी. 'राजकीय पक्ष' हा शब्द 'विधिमंडळ पक्ष' म्हणून वाचणे हे सरळ भाषेच्या विरुद्ध ठरेल.

बी. प्रतोद आपल्या सदस्यांना पक्षाच्या सूचना कळवतो, ही सर्वमान्य भूमिका आहे. प्रतोद हि संज्ञा ना दहाव्या अनुसूचीत वापरली  जाते  ना १९८६ च्या नियमात. १९५६ च्या कायद्यात 'लाभाचे पद' हा अर्थ अभिप्रेत नसलेले कार्यालय म्हणून या संज्ञेचा उल्लेख आढळतो. १९५६  च्या कायद्यातील अनुसूची 1 च्या कलम २३  च्या स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की मुख्य प्रतोद सरकार स्थापन करणाऱ्या पक्षाद्वारे घोषित केला जातो. स्पष्टीकरण कलमातील 'पक्ष' या संदर्भाचा अर्थ विधिमंडळ पक्ष नव्हे तर राजकीय पक्ष असा आहे कारण 'पक्ष' हा शब्द सामान्य भाषेत राजकीय पक्षाचे चित्र रेखाटण्यासाठी वापरला जातो; आणि

सी. उत्तरवादीनी असे निवेदन केले कि, विधिमंडळ पक्षातर्फे प्रतोद निवडला जातो कारण १९८६ च्या नियमांच्या नियम ३ (१) (अ) मध्ये अशी तरतूद आहे की नेता या नियमांच्या उद्देशाने सभापतींशी संवाद साधण्यासाठी अधिकृत केलेल्या सदस्यांची नावे आणि पदनाम सभापतींना कळवेल. हा युक्तिवाद चुकीचा आहे. नियम ३ (१) (अ) मधील 'सभापतींशी संवाद साधण्याचा अधिकार असलेला अन्य सदस्य' हे वाक्य नियम २ (एफ) अंतर्गत 'नेता' या व्याख्येसह वाचले पाहिजे, ज्यात नेत्याच्या अनुपस्थितीत कार्य करण्यास किंवा नियमांच्या उद्देशाने नेत्याची कार्ये पार पाडण्यास अधिकृत असलेल्या इतर सदस्यांचा समावेश आहे. या तरतुदी एकत्र वाचल्यावर हे स्पष्ट होते की नियम ३ (१) (अ) म्हणजे नेत्याच्या अनुपस्थितीत नेता म्हणून काम करण्याचा अधिकार असलेल्या सदस्यांची माहिती सादर करणे होय. प्रतोद विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांशी संवाद साधून राजकीय पक्षाचे निर्देश कळवतात. नियम ३(५) मध्ये म्हटले आहे की, राजकीय पक्षाने विधिमंडळ पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या प्रतिबंधात्मक कृतींना माफ केले आहे हे सभापतींना कळवावे जे स्पष्टपणे सिद्ध करते की १९८६ च्या नियमांच्या हेतूंसाठी केवळ नेताच अध्यक्षांशी संवाद साधतो. हे अधिक स्पष्ट आहे कारण नियम ३ (५) नुसार नेत्याने राजकीय पक्षाच्या निर्देशाविरूद्ध मतदान केले किंवा मतदान करण्यास टाळाटाळ केली अशा परिस्थितीत नेत्याने सभापतींना सूचित करणे आवश्यक आहे. १९८६ च्या नियमांनुसार...

प्रतोद हा अपात्रता याचिका दाखल करण्यासाठी नामनिर्देशित अधिकारी नाही. नियम ६ नुसार महाराष्ट्र विधानसभेतील कोणताही सदस्य अपात्रतेसाठी याचिका

दाखल करू शकतो. उत्तरवादी यांच्या युक्तिवादानुसार, विधिमंडळ पक्ष प्रतोद नेमतो हि बाब या परिच्छेदात चर्चा केलेल्या १९८६ च्या नियमावलीतील तरतुदींच्या आधारे, सिद्ध करण्यास हे उत्तरवादी अपयशी ठरतात.

११०. मायावती (उपरोल्लेखित) प्रकरणात अपीलकर्त्याने राज्यातील बसपच्या सर्व आमदारांना भाजपने मांडलेल्या अविश्वास ठरावाच्या विरोधात मतदान करण्याचे निर्देश दिले आहेत. बसपच्या १२ आमदारांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले. या बारा आमदारांविरोधात परिच्छेद २ (१) (अ) आणि २ (१) (ब) चे उल्लंघन केल्याबद्दल अपात्रतेसाठी याचिका दाखल केली होती. सभापतींनी अपात्रता याचिका फेटाळून लावली. अध्यक्षांचा एक निष्कर्ष असा होता की अपीलकर्त्याला राजकीय पक्षाच्या वतीने निर्देश जारी करण्याचा अधिकार आहे हे सिद्ध झाले नाही. सभापतींच्या आदेशाला या न्यायालयात आव्हान देण्यात आले. परिच्छेद २ (१) (ब) मधील 'राजकीय पक्ष' म्हणजे विधिमंडळ पक्ष असे 'सभागृहातील राजकीय पक्ष' म्हणून वाचावे, असा युक्तिवाद करण्यात आला. श्रीनिवासन, जे. यांनी आपल्या स्वतंत्र मतात हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि अपीलकर्त्याला निर्देश जारी करण्याचा अधिकार बसपने दिला आहे हे दर्शविणारे कोणतेही पुरावे नसल्याचे निरीक्षण नोंदवून सभापतींचा आदेश कायम ठेवला. या संदर्भात श्रीनिवासन, जे. यांनी 'राजकीय पक्षा'ला खालील कारणांमुळे 'विधिमंडळ पक्ष' म्हणून वाचता येणार नाही, असे मत मांडले.

ए. परिच्छेद २ (१) (ब) मधील 'राजकीय पक्ष' या वाक्याचा अर्थ विधिमंडळ पक्ष असा करता येत नाही, तर परिच्छेद २ (१) (अ) मधील हाच शब्द मूळ अर्थ

टिकवून ठेवतो;

बी. असा अर्थ परिच्छेद २ (१) चे स्पष्टीकरण (अ) देईल, कारण विधिमंडळ पक्ष एखाद्या व्यक्तीला निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे करू शकत नाही;

सी. विधानसभेचे सदस्यत्व अपात्र ठरविणे हा गंभीर परिणाम आहे. असा परिणाम केवळ राजकीय पक्षाच्या निर्देशांविरुद्ध मतदान केल्यानेच होऊ शकतो; आणि

१६४. दहाव्या अनुसूचीतून परिच्छेद ३ वगळण्याचा अपरिहार्य परिणाम असा होतो की, अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जाणाऱ्या सदस्यांना विभाजनाचा बचाव आता उपलब्ध होत नाही. एखाद्या राजकीय पक्षात किंवा विधिमंडळ पक्षात फूट पडली असेल, तर प्रत्येक गटाने दुसऱ्या गटातील सदस्यांना अपात्र ठरविण्यासाठी याचिका दाखल केल्यास कोणत्याही गटाचे सदस्य आपण राजकीय पक्ष असल्याचा युक्तिवाद करू शकत नाही. ज्या बचावाचा लाभ घ्यायचा आहे, तो सध्या च्या स्थितीत दहाव्या अनुसूचित असणे आवश्यक आहे.

१६५. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ४(१) मधील आवश्यकतांची पूर्तता पूर्ण झाल्यास अनेक गट किंवा गटांचे सदस्य सर्व सदस्य सदस्य म्हणून चालू राहू शकतात. जर एका गटाने परिच्छेद ४ (१) (अ) नुसार दुसर्या राजकीय पक्षात विलीन होण्याचा पर्याय निवडला असेल आणि दुसऱ्या गटाने विलीनीकरण न स्वीकारण्याचा निर्णय घेतला असेल तर एखाद्या राजकीय पक्षाचे दोन (किंवा अधिक) गट हे दोन्ही सभागृहात राहू शकतात तथापि, जर विभाजन झाले असेल आणि एका गटाच्या सदस्यांनी परिच्छेद 2 (1) मधील अटींची पूर्तता केल्याचे आढळले आणि वरील पाच पैकी एकही बचाव सिद्ध करण्यास असमर्थ असतील तर ते अपात्र ठरतील. अपात्रतेचा बचाव होतो की नाही हे ठरविण्यासाठी प्रत्येक गटातील सदस्यांची टक्केवारी अप्रासंगिक असते.

१६६. हा निश्चितच परिच्छेद ३ वगळण्याचा परिणाम आहे. अन्यथा निर्णय देणे म्हणजे दहाव्या अनुसूचीतील 'फुटी'च्या बचावाला मागच्या दाराने प्रवेश करण्याची परवानगी देणे होय. हे अनुज्ञेय नाही आणि त्यामुळे परिच्छेद ३ ची वगळणूक निरर्थक ठरेल. जे प्रत्यक्षपणे करता येत नाही ते अप्रत्यक्षपणे कण्याची परवानगी देता येऊ शकत नाही, हा जुना कायदा आहे.[61] आम्ही जी अर्थउकल स्पष्ट केली आहे तीच परिच्छेद ३ च्या वगळणूकीशी सुसंगत आहे.

61 दिल्ली प्रशासन वि. गुरदीप सिंग उबन (२०००) ७ एससीसी २९६, टॅक्सी ओनर्स युनायटेड ट्रान्सपोर्ट वि. स्टेट ट्रान्सपोर्ट अथॉरिटी (ओरिसा) (१९८३) ४ एससीसी ३४

b. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये सभापतींचा निर्णय

१६७. जेथे राजकीय किंवा विधिमंडळ पक्षाचे दोन किंवा अधिक गट निर्माण झाले आहेत, तेथे परिच्छेद २ (१) (अ) अन्वये अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देताना, अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जाणाऱ्या सदस्यांना उपलब्ध असलेल्या बचावाची तमा न बाळगता, 'खरा' राजकीय पक्ष कोणता हे निश्चित करण्यासाठी सभापतींना बोलावले जाऊ शकते. परिच्छेद ३ वगळल्याचा परिणाम असा होतो की, दोन्ही गटांना मूळ राजकीय पक्ष मानता येत नाही. परिच्छेद २(१)(अ) अन्वये पक्षातील कोणत्या (असल्यास) सदस्यांनी स्वेच्छेने राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडले आहे, हे ठरविण्यासाठी, सर्वप्रथम कोणत्या गटातून राजकीय पक्षाची स्थापना होते हे निश्चित करणे आवश्यक आहे. ही निश्चिती सकृतदर्शनी निश्चिती आहे आणि तिचा पक्षचिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये करण्यात येणाऱ्या कार्यवाहींसह इतर कोणत्याही कार्यवाहींवर परिणाम होणार नाही.

१६८. आपल्या निर्णयापर्यंत पोहोचताना, अध्यक्षांनी पक्षाची घटना तसेच पक्षाच्या नेतृत्वाची रचना निर्दिष्ट करणारे इतर कोणतेही नियम आणि विनियम विचारात घेतले पाहिजेत. प्रतिस्पर्धी गटांनी पक्षाच्या घटनेच्या दोन किंवा अधिक आवृत्त्या सादर केल्यास, विरोधी गट उदयास येण्यापूर्वी निवडणूक आयोगाकडे सादर केलेली आवृत्ती सभापतींनी विचारात घेतली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत, दोन्ही गटांच्या संमतीने निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या पक्षाच्या घटनेच्या आवृत्तीचा अध्यक्षांनी विचार केला पाहिजे. यामुळे जेथे दोन्ही गट आपापल्या स्वार्थासाठी घटनेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात, अशी परिस्थिती टळेल. तसेच, कोणता गट राजकीय

पक्ष होतो, याबाबतचा सभापतींचा निर्णय हा, विधानसभेत कोणत्या गटास बहुमत आहे, या आंधळ्या समजुतीवर आधारित नसला पाहिजे. हा काही आकड्यांचा खेळ नाही, तर त्याहून अधिक काही आहे. या विषयाच्या निश्चितीसाठी विधानसभेबाहेरील नेतृत्वाची रचना हा समर्पक असा विचार आहे.

१६९. परिच्छेद ३ च्या वगळणूकीचा परिणाम परिच्छेद २ (१) (ब) अंतर्गत करावयाच्या कार्यवाहींवरसुद्धा होतो. जेव्हा राजकीय पक्षाच्या दोन किंवा अधिक गटांनी नियुक्त केलेले दोन प्रतोद असतात, तेव्हा या न्यायनिर्णयाच्या आधीच्या भागात निर्णय दिल्याप्रमाणे, दोन प्रतोदांपैकी कोण राजकीय पक्षाचे प्रतिनिधित्व करतो, याचा निर्णय सभापती घेतात. अशा प्रकारे, परिच्छेद २ (१) (ब) अन्वये एखाद्या सदस्याला अपात्र ठरवले पाहिजे की नाही, याबाबतचा सभापतींचा निर्णयसुद्धा दोन (किंवा अधिक) प्रतोदांपैकी एकाला मान्यता देण्याच्या सभापतींच्या निर्णयावर अवलंबून असेल. त्यानुसार आम्ही या न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३२ (फ) मध्ये नमूद केलेल्या आणि आमच्या समोर संदर्भित केलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो.

### vii. **श्री. ठाकरे यांना बहुमत चाचणीला सामोरे जाण्याचे निर्देश देण्यात राज्यपालांनी स्वेच्छाधिकाराचा केलेला वापर.**

१७०. या न्यायनिर्णयाच्या प्रास्ताविकाच्या भागात या मुद्द्याच्या निर्णयाशी संबंधित वस्तुस्थिती विशद करण्यात आली आहे. सविस्तर सांगायचे झाले तर, शिवसेनेचे ३४ आमदारांनी दिनांक २१ जून, २०२२ रोजी बैठक घेऊन ठराव संमत केला. ठरावामध्ये, श्री. एकनाथ शिंदे हे 'शिविप'

चे गटनेते म्हणून "कायम राहतील" असे पुनः जाहीर करण्यात आले होते, तसेच सुनील प्रभू यांची मुख्य प्रतोदपदी झालेली नियुक्ती रद्द करण्यात आली आणि त्यांच्या जागी भरत गोगावले यांची नियुक्ती करण्यात आली होती. इंडियन नॅशनल काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती करून सरकार स्थापन केल्याबद्दल स्वाक्षरीकर्त्यांनी शिवसेनेबाबत नाराजी आणि असंतोषसुद्धा व्यक्त केला. दिनांक २८ जून, २०२२ रोजी राज्यपालांना तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस आणि अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आलेल्या सात आमदारांची पत्रे स्वतंत्ररीत्या प्राप्त झाली, ज्यात श्री. ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती. त्याच दिवशी राज्यपालांनी, डब्ल्यूपी (सी) ४७०/२०२२ अन्वये, श्री. ठाकरे यांना आक्षेपित पत्र पाठवून, दिनांक ३० जून, २०२२ रोजी सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले. या न्यायालयाने विश्वासदर्शक ठरावाला स्थगिती देण्यास नकार दिल्यानंतर, श्री. ठाकरे यांनी दिनांक २९ जून, २०२२ रोजी राजीनामा दिला. अशा प्रकारे, डब्ल्यूपी (सी) ४७०/२०२२ निष्फळ ठरले आहे. दिनांक २८ जून, २०२२ रोजीचे पत्र रद्द करण्याची या न्यायालयाला आता आवश्यकता नाही. मात्र, राज्यपाल पदावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीचे गांभीर्य तसेच अशा स्वेच्छाधिकाराचा वापर केल्याने होणाऱ्या परिणामांचे महत्त्व लक्षात घेता, राज्यपालांनी राज्यघटनेने दिलेल्या स्वेच्छाधिकाराचा कायदयानुसार वापर केला का, या प्रश्नावर या न्यायालयाने लक्ष देणे आवश्यक आहे.

१७१. राज्यपालांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पाठवलेले पत्र असे दर्शविते की, बहुमत चाचणी आवश्यक असल्याचा निष्कर्ष काढताना त्यांनी खालील परिस्थितींवर भिस्त ठेवली :

अ. श्री. ठाकरे यांच्यावर आता सभागृहाचा विश्वास राहिलेला नाही असे नमूद करणारे तत्कालीन विरोधी पक्षनेत्याकडून प्राप्त झालेले पत्र;

ब. श्री. ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश द्यावेत, अशी राज्यपालांना विनंती करणारी सात अपक्ष आमदारांकडून प्राप्त झालेली पत्रे ;

क. 'शिविप' च्या चौतीस सदस्यांची स्वाक्षरी असलेला दिनांक २१ जून, २०२२ रोजीचा ठराव, ज्यात असे नमूद केले आहे की, इंडियन नॅशनल काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत युती केल्याबद्दल ते शिवसेनेवर असमाधानी आहेत ;

ड. श्री. शिंदे यांचे उपसभापतींना उद्देशून लिहिलेले दिनांक २१ जून २०२२ रोजीचे पत्र, ज्यात असे नमूद केले आहे की, 'शिविप' च्या नेतेपदी श्री. अजय चौधरी यांची झालेली नियुक्ती बेकायदेशीर होती ; आणि

इ. 'शिविप' च्या अडतीस सदस्यांकडून प्राप्त झालेले दिनांक २५ जून, २०२२ रोजीचे पत्र, ज्यात असे नमूद करण्यात आले आहे की, राज्य सरकारने त्यांना दिलेली सुरक्षा बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली होती आणि त्यांच्या जीविताला धोका होता.

१७२. या सामग्रीच्या आधारे, राज्यपालांनी (दिनांक २८ जून, २०२२ रोजीच्या पत्रात) असा निष्कर्ष काढला की, ठाकरे यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे :

> "... महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याचा आपला मानस आहे आणि त्याची जाणीव आपल्याला करून देण्यात आली आहे आणि लोकशाही नसलेल्या मार्गाने तुम्ही आपल्या आमदार, कार्यकर्त्यांची मने जिंकण्याचा प्रयत्न करीत आहात, असे स्पष्ट संकेत शिवसेनेच्या विधिमंडळ पक्षाच्या वतीने शिवसेनेच्या बहुसंख्य आमदारांनी दिले आहेत. त्यामुळे तुम्ही आणि तुमच्या सरकारने सभागृहाचा विश्वास गमावला आहे आणि सरकार अल्पमतात आहे, असा मला विश्वास आहे."

त्यानंतर राज्यपालांनी श्री. उद्धव ठाकरे यांना दिनांक ३० जून, २०२२ रोजी सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे आवाहन केले.

१७३. राज्यपाल हा राज्य विधिमंडळाचा अविभाज्य भाग असतात. राज्याचे कार्यकारी अधिकार राज्यपालांना प्रदान करण्यात आलेले आहेत. अनुच्छेद १६३ नुसार राज्यपालांनी मंत्रिपरिषदेच्या सहाय्याने व सल्ल्यानुसार आपले कायदेविषयक आणि कार्यकारी अधिकार वापरणे आवश्यक आहे. अनुच्छेद १६३ (२) नुसार राज्यपालांना राज्यघटनेनुसार किंवा त्याअंतर्गत आवश्यक तेवढ्या स्वविवेकाचा वापर करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. अनुच्छेद

१७४(१) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्यपाल, त्यास योग्य वाटेल अशा वेळी व ठिकाणी बैठक भरवण्यासाठी सभागृहास वेळोवेळी अभिनिमंत्रित करतील. अनुच्छेद १७५ (१) नुसार राज्यपालांना सभागृहास संबोधून अभिभाषण करण्याचा अधिकार आहे. अनुच्छेद १७५ (२) नुसार राज्यपालांना प्रलंबित विधेयकासंदर्भात असो वा अन्य प्रकारचा संदेश सभागृहाला पाठविण्याची मुभा आहे.

अ. बहुमत चाचणीची मागणी करण्याचा राज्यपालांचा अधिकार

१७४. एस. आर. बोम्मई (उपरोल्लेखित) या प्रकरणात, कर्नाटकात एस. आर. बोम्मई यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाने ऑगस्ट १९८८ मध्ये यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. त्यानंतर काही काळात , जनता पक्ष आणि लोकदल (ब) विलीन होऊन जनता दल नावाचा नवा पक्ष स्थापन झाला. एप्रिल १९८९ मध्ये जनता दलाच्या सतरा आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहून सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेतला. दिनांक १९ एप्रिल, १९८९ रोजी राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे, मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत बहुमत गमावल्याचा अहवाल पाठवून राज्यघटनेच्या अनुच्छेद ३५६ (१) अन्वये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शिफारस केली. दिनांक २० एप्रिल, १९८९ रोजी मुख्यमंत्र्यांनी सभागृहात बहुमत सिद्ध करण्याची तयारी दर्शवली. मात्र, त्याच दिवशी राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे आणखी एक अहवाल पाठवून मुख्यमंत्र्यांनी सभागृहातील बहुमताचा विश्वास गमावल्याचा पुनरुच्चार करत अनुच्छेद ३५६ (१) अन्वये कारवाईची शिफारस केली. त्यानुसार, दिनांक २१ एप्रिल, १९८९ रोजी राष्ट्रपतींनी उद्घोषणा जारी करून राज्य सरकार बरखास्त केले आणि विधानसभा विसर्जित केली.

१७५. या न्यायालयाने असा निर्णय दिल की, मंत्रीमंडळाने सभागृहाचा विश्वास गमावला आहे की नाही हे राज्यपाल ठरवू शकत नाहीत आणि हे सभागृहाच्या पटलावर ठरवावे लागेल. या न्यायालयाने राज्यपालांच्या पाच सदस्यीय समितीच्या अहवालाचा संमतीदर्शक संदर्भ दिला, ज्यात अशी शिफारस करण्यात आली होती की, सरकारला आता बहुमताचा पाठिंबा नाही, अशी जर राज्यपालांची "कोणत्याही प्रक्रियेद्वारे किंवा मार्गाने" खात्री झाली असेल तर, त्यांनी मुख्यमंत्र्यांना विधानसभेच्या पटलावर बहुमत सिद्ध करण्यास सांगावे. बी. पी. जीवन रेड्डी, न्या. यांनी असा निर्णय दिला की, सरकारने विश्वास गमावणे ही एक वस्तुनिष्ठ वस्तुस्थिती आहे, ज्याची निश्चिती केवळ सभागृहाच्या पटलावरच करणे आवश्यक आहे :

> "३९१. [...] मंत्रीमंडळ स्थापन करणाऱ्या राजकीय पक्षाला विधिमंडळात बहुमत असणे आवश्यक आहे, असे बंधन राज्यघटनेने निर्माण केलेले नाही. अल्पमतातील सरकारे अज्ञात नाहीत. गरज आहे ती त्या सरकारला सभागृहाचा विश्वास संपादन करण्याची. ही बाब राज्यपालांनी लक्षात घेतलेली दिसत नाही. दुसरे आणि महत्त्वाचे म्हणजे, मंत्रीमंडळाने सभागृहाचा विश्वास गमावला आहे की नाही, हा राज्यपालांनी किंवा सभागृहाचा पटलाशिवाय इतरत्र कुठेही ठरवायचा विषय नाही. आपल्या राज्यघटनेतील लोकशाहीच्या तत्त्वाचा अर्थ असा आहे की, अशा कोणत्याही प्रश्नावर

> सभागृहात निर्णय व्हायला हवा. सभागृह ही अशी जागा आहे, जिथे लोकशाही कार्यरत आहे. राज्यपालांनी स्वत:हून किंवा स्वत: पडताळणी करून हा प्रश्न ठरवणे आवश्यक नाही. हा त्याच्या व्यक्तिनिष्ठ समाधानाचा विषय नाही. सभागृहाच्या पटलावर प्रस्थापित होऊ शकणारी ही एक वस्तुनिष्ठ वस्तुस्थिती आहे. [...]"

१७६. **शिवराजसिंह चौहान** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये मध्य प्रदेश राज्यात इंडियन नॅशनल काँग्रेसचं सरकार स्थापन झाले होते. विधानसभेच्या कार्यकाळात इंडियन नॅशनल काँग्रेसच्या बावीस आमदारांची राजीनाम्याची पत्रे भाजप आमदारांनी सभापतींकडे सुपूर्द केली. सभापतींनी बावीसपैकी सहा राजीनामे स्वीकारले. विधानसभेतील विरोधी पक्षातील पक्षाने राज्यपालांना पत्र लिहून या राजीनाम्यांची माहिती दिली. राज्यपालांनी विश्वासदर्शक ठराव घेण्याचे निर्देश दिले. राज्यपालांच्या या कृतीला या न्यायालयापुढे आव्हान देण्यात आले. या न्यायालयाने असा निर्णय दिला की, घटनात्मक योजनेमुळे राज्यपालांना 'चालू विधानसभेत' विश्वासदर्शक ठराव घेण्याचे निर्देश देण्याचा अधिकार आणि स्वविवेक प्राप्त झाला आहे आणि असा निर्णय न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन आहे. या न्यायालयाने असा निकाल दिला की, बहुमत चाचणी घेण्याचा निर्णय हा, स्वविवेकाच्या वापराशी सुसंगत आणि सुसंबद्ध असणाऱ्या वस्तुनिष्ठ सामग्री आणि कारणांवर आधारित असावा आणि त्यापेक्षा भिन्न नसावा.

लोकशाही पद्धतीने निवडून आलेली सरकारे अस्थिर करण्यासाठी किंवा विस्थापित करण्यासाठी राज्यपालांनी आपल्या स्वेच्छाधिकाराचा वापर करू नये, यावर न्यायालयाने भर दिला.

> "७१. घटनात्मक अधिकाऱ्यांना जे अधिकार सोपविण्यात आले आहेत ते न्यायालयीन पुनरावलोकनाच्या पलीकडे नाहीत. बहुमत चाचणी घेण्याचे निर्देश देण्याच्या राज्यपालांच्या स्वेच्छाधिकाराला जेथे न्यायालयात आव्हान दिले जाते, तेथे न्यायालयीन पुनरावलोकनापासून ते सुटत नाही. बहुमताच्या चाचणीची मागणी करताना राज्यपालांनी वस्तुनिष्ठ सामग्री आणि अधिकारांच्या वापराशी सुसंबद्ध आणि समर्पक कारणांच्या आधारे तसे केले की नाही हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. अशा अधिकाराच्या वापराचा हेतू विधानसभेला उत्तरदायी आणि सामूहिकरित्या जबाबदार असलेल्या लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या सरकारला अस्थिर करणे किंवा विस्थापित करणे हा नाही. राज्यपालांकडून विश्वासदर्शक ठराव घेण्याचे निर्देश देण्याच्या अधिकाराचा वापर हा, बाह्य विचारांवर आधारित

झालेल्या खात्रीवर आधारित नाही, या सर्वात महत्वाच्या

विचारानुसार  व्हायला हवा.”

१७७. जोपर्यंत "प्रतिकूल आणि भाग पाडणारी" परिस्थिती उद्भवत नाही, तोपर्यंत राज्यपालांनी अविश्वास प्रस्तावाच्या सर्वसाधारण कायदेविषयक प्रक्रियेद्वारे योग्य मार्गाने चालण्यापासून रोखू नये, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. **शिवराज सिंह चौहान** (उपरोल्लेखित) या प्रकरणात, सभापतींनी विद्यमान सरकारचे मंत्री असणाऱ्या केवळ सहा सदस्यांचे राजीनामे स्वीकारले आणि विधानसभेचे कामकाज तेरा दिवसांसाठी तहकूब केले. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन, न्यायालयाने असा निर्णय दिला की, राज्यपालांनी बहुमत चाचणी बोलावण्यामागे वस्तुनिष्ठ सामग्री आणि समर्पक कारणे होती.

१७८. अनुच्छेद १७४ अन्वये सभागृह बोलविण्याचा राज्यपालांचा अधिकार मंत्रीमंडळाच्या सहाय्याने व सल्ल्याने वापरला पाहिजे. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीच्या नियम ९५ नुसार ज्या सदस्याला मंत्रीमंडळात अविश्वास ठराव मांडण्याची इच्छा असेल, तो लेखी सूचना देऊन तसे करेल. जर हा प्रस्ताव सभापतींनी मान्य केला आणि विधानसभेचे अधिवेशन सुरू असेल तर, नोटिशीच्या तारखेपासून दोन दिवसांच्या आत प्रस्ताव मांडण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. मात्र, विधानसभेचे अधिवेशन सुरू नसताना नोटीस प्राप्त झाल्यास, अधिवेशन सुरू झाल्यापासून दोन दिवसांच्या आत प्रस्ताव मांडण्याची परवानगी देण्यात येईल.

१७९. अविश्वास प्रस्ताव टाळण्यासाठी विद्यमान सरकार राज्यपालांना विधानसभेचे अधिवेशन बोलविण्याचा सल्ला देऊ शकत नाही आणि अविश्वास प्रस्ताव मांडण्याची परवानगी दिल्याने प्रस्तावावर होणारे मतदान रोखण्याकरिता, सभापती सभागृहाचे कामकाज तहकूब करू शकतात. जर विधानसभा अध्यक्ष आणि सरकारने अविश्वास ठरावाला छेद देण्याचा प्रयत्न केला तर, राज्यपालांनी मंत्रीमंडळाच्या सहाय्याविना आणि सल्ल्याविना अनुच्छेद १७४ अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करणे समर्थनीय ठरेल.

१८०. राज्यघटना आणि त्यातून मिळणारी शासनव्यवस्था प्रातिनिधिक लोकशाहीवर आधारित आहे. याचा अर्थ असा की,सरकारे विविध स्तरांवर कशा प्रकारे कार्य करतात यात प्रत्येक नागरिकाची सक्रिय आणि सहभागात्मक भूमिका असते. कायदे करून आणि धोरणांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवून निवडून आलेले लोकप्रतिनिधी त्यांच्या वतीने काम करतात. लोकशाही साध्य करण्यासाठी हा आम्ही निवडलेला मार्ग आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निवडणुका आणि निवडून आलेले उमेदवार हे आपल्या प्रातिनिधिक लोकशाहीच्या आदर्शासाठी अपरिहार्य आहेत. त्यामुळे राज्यघटनेने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जनतेच्या वतीने काम करण्याचा अधिकार दिला आहे. परिणामी, घटनात्मक दर्जा अनिर्वाचित असा असूनही राज्यपालांना मर्यादित स्वेच्छाधिकार देण्यात आले आहेत.

१८१. मंत्रिमंडळाच्या सहाय्याविना व सल्ल्याविना काम करण्याचा राज्यपालांचा अधिकार हा असाधारण स्वरूपाचा आहे. अशा अधिकाराच्या वापराचे परिणाम संसदीय लोकशाहीवर होतात. त्यामुळे , जेथे वस्तुनिष्ठ सामग्रीच्या आधारे राज्यपालांच्या असाधारण अधिकाराच्या वापराची हमी देण्यासाठी समाधानकारक कारण आहे अशी त्यांची खात्री झाली असेल, तेथे तातडीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राज्यपालांनी अशा अधिकाराच्या वापराची व्याप्ती निश्चित केली पाहिजे. बहुमत चाचणी घेण्याची मागणी करण्याचा स्वेच्छाधिकार हा अनिर्बंध स्वेच्छाधिकार नसून, तो कायद्याने घालून दिलेल्या मर्यादेनुसार सावधगिरीने वापरला गेला पाहिजे.

b. बहुमत चाचणी घेण्याची मागणी करण्याच्या अधिकाराचा राज्यपालांनी केलेल्या वापर.

१८२. राज्यपालांनी दिनांक २८ जून, २०२२ रोजीच्या पत्रात वर नमूद केलेल्या पाच परिस्थितींचा आधार घेत खालील निष्कर्ष काढले: (१) शिवसेनेचे बहुसंख्य आमदार महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडू इच्छित होते; (२) श्री. ठाकरे लोकशाही नसलेल्या मार्गाने आमदारांची मने जिंकण्याचा प्रयत्न करत होते; आणि (iii) श्री. ठाकरे यांनी सभागृहाचा विश्वास गमावला होता आणि महाविकास आघाडी सरकार अल्पमतात होते.

१८३. याचिकाकर्त्यांनी अशी विनंती केली आहे की, दिनांक २१ जून, २०२२ रोजीच्या ठरावाच्या आधारे राज्यपालांनी जे निष्कर्ष काढले ते योग्य नाहीत, कारण : (१) शिवसेनेच्या चौतीस आमदारांनी महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याचा इरादा व्यक्त केला नव्हता ; आणि (२) ज्या आमदारांनी ठरावावर स्वाक्षरी केली त्यांनी 'शिविप' चा एक गट तयार केला होता.

१८४. जरी दिनांक २१ जून, २०२२ रोजीच्या ठरावात 'शिविप' चे काही आमदार महाविकास आघाडी सरकारच्या कामकाजावर असमाधानी असल्याचे नमूद करण्यात आले असले तरी, त्यातून सरकारकडून पाठिंबा काढून घेण्याचा त्यांचा हेतू नोंदविला जात नाही. दिनांक २८ जून, २०२२ रोजीच्या ठरावावर स्वाक्षरी करणाऱ्या चौतीस आमदारांपैकी काही जण सरकारमध्ये मंत्रीसुद्धा होते. या ठरावाच्या आधारे राज्यपालांनी असा निष्कर्ष काढला की "शिवसेनेच्या बहुसंख्य आमदारांनी स्पष्ट संकेत दिले आहेत... की, महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याचा त्यांचा मानस आहे.”

१८५. जेव्हा श्री. फडणवीस आणि सात अपक्ष आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहिले तेव्हा विधानसभेचे अधिवेशन सुरू नव्हते. मात्र, विरोधी पक्षांच्या सदस्यांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठरावाची नोटीस बजावण्याचा कोणताही प्रयत्न केला नव्हता.

१८६. राज्यपालांकडे अशी कोणतीही वस्तुनिष्ठ सामग्री नव्हती, ज्या आधारे ते विद्यमान सरकारच्या विश्वासावर शंका घेऊ शकतील. राज्यपालांनी ज्या ठरावावर भिस्त ठेवली, त्यात आमदारांना महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याची इच्छा असल्याचे कोणतेही संकेत नव्हते. राज्यपालांनी बहुमत चाचणी बोलावण्यासाठी काही आमदारांकडून नाराजी व्यक्त करणारा पत्रव्यवहार पुरेसा नाही. सरकारने सभागृहाचा विश्वास गमावल्याचे दिसत आहे का, हे ठरविण्यासाठी राज्यपालांनी त्यांच्यासमोरील पत्राबाबत (किंवा इतर कोणत्याही सामग्रीबाबत ) विचार करायला हवा होता. आम्ही 'मत' हा शब्द वापरत आहोत, ज्याचा अर्थ आपल्याकडे संबंधित सामग्री आहे की नाही या वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित खात्री असा आहे आणि त्यातून राज्यपालांचे व्यक्तिनिष्ठ समाधान अभिप्रेत नाही. एकदा कायद्यानुसार लोकशाही मार्गाने सरकार निवडून आले की, त्याला सभागृहाचा विश्वास प्राप्त होतो, असे गृहितक आहे. हे गृहितक खोडून काढण्यासाठी काही वस्तुनिष्ठ साहित्य असणे आवश्यक आहे.

१८७. आमदारांनी दिनांक २१ जून, २०२२ रोजीच्या ठरावामध्ये महाविकास आघाडी सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची इच्छा व्यक्त केली नव्हती. आमदारांनी सरकारमधून बाहेर पडण्याचा इरादा व्यक्त केला असे जरी गृहीत धरले तरीही, त्यांनी 'शिविप' चा केवळ एक गट स्थापन केला आणि जास्तीत जास्त, त्यांच्या राजकीय पक्षाने अवलंबलेल्या कार्यपद्धतीबद्दल ते असंतोष दर्शवित होते.

१८८. शिवसेनेतील पक्षीय मतभेदांमुळे महाराष्ट्रात राजकीय पेचप्रसंग उद्भवला. परंतु, पक्षांतर्गत वाद किंवा पक्षांमधील वाद मिटविण्याचे माध्यम म्हणून बहुमत चाचणीचा वापर करता येऊ शकत नाही. राजकीय पक्षातील मतभेद आणि असमाधान हे पक्षाच्या घटनेनुसार विहित केलेल्या उपायांद्वारे किंवा पक्षाने निवडलेल्या इतर कोणत्याही पद्धतींद्वारे मिटविले पाहिजेत. सरकारला पाठिंबा न देणारा पक्ष आणि पक्षातील व्यक्तींनी आपल्या पक्षनेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करणे यांत लक्षणीय फरक आहे.

१८९. राज्यपाल हे राज्य सरकारचे नामधारी प्रमुख असतात. ते एक घटनात्मक पदाधिकारी आहेत, ज्यांना राज्यघटने अन्वये त्यांचे अधिकार प्राप्त होतात. असे असल्यामुळे, राज्यपालांना आपल्याकडे असलेल्या अधिकाराच्या घटनात्मक मर्यादेची जाणीव असणे आवश्यक आहे. राज्यघटनेने किंवा त्याअंतर्गत केलेल्या कायद्याने त्याला न मिळालेल्या अधिकाराचा तो वापर करू शकत नाही. एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाच्या सदस्यांमधील वाद मिटवता येतील, अशी यंत्रणा राज्यघटनेत किंवा संसदेने बनवलेल्या कायद्यात नाही. ते राज्यपालांना राजकीय आखाड्यात उतरण्याचा आणि पक्षांतर्गत वादात किंवा पक्षामधील वादांत भूमिका (कितीही सूक्ष्म असली तरीही) बजावण्याचा अधिकार नक्कीच देत नाहीत. यावरून असे दिसून येते की, सभागृहाच्या पटलावर सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेण्याची इच्छा शिवसेनेच्या एका गटाने व्यक्त केली होती, हा राज्यपालांनी काढलेला निष्कर्ष अंमलात आणता येऊ शकत नाही.

१९०. हे खरे आहे की, शिवसेनेच्या काही आमदारांनी राज्यपालांना दिनांक २५ जून, २०२२ रोजी पाठवलेल्या पत्रात त्यांची सुरक्षा व्यवस्था पूर्ववत करण्यासाठी योग्य अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची विनंती करण्यात आली होती, त्यात त्या आमदारांना "यापुढे भ्रष्ट महाविकास आघाडी सरकारचा भाग व्हायची इच्छा नाही" असे नमूद करण्यात आले आहे. मात्र, याचा अर्थ त्यांनी सभागृहातील आपला पाठिंबा काढून घेतला, असा घेता येणार नाही. ज्या पत्रव्यवहारावर राज्यपालांनी भिस्त ठेवली आहे, त्यातील कोणत्याही पत्रातून, मुख्यमंत्री आणि मंत्रीमंडळाला दिलेला पाठिंबा काढून घेण्याचा शिवसेनेच्या असंतुष्ट आमदारांचा हेतू असल्याचे सूचित होत नाही. जास्तीत जास्त, पक्षाच्या काही धोरणात्मक निर्णयांशी आमदारांच्या एका गटाने असहमती दर्शविल्याची वस्तुस्थिती विविध पत्रांमधून व्यक्त करण्यात आली. आपल्या तक्रारी मांडण्यासाठी आणि त्यांचे निवारण करण्यासाठी त्यांना कोणती कृती करायची होती, हे ज्या वेळी बहुमत चाचणी घेण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्यावेळी अनिश्चित होते. ते सभागृहातील किंवा राजकीय पक्षातील आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करतील की कार्यकर्त्यांना संघटित करतील किंवा निषेध म्हणून विधानसभेचा राजीनामा देतील किंवा दुसऱ्या पक्षात विलीन होण्याचा पर्याय निवडतील, याची शाश्वती नव्हती. त्यामुळे राज्यपालांनी 'शिविप' च्या आमदारांच्या एका गटाने स्वाक्षरी केलेल्या ठरावाचा आधार घेत, श्री. ठाकरे यांनी सभागृहातील बहुमताचा पाठिंबा गमावल्याचा निष्कर्ष काढण्यात राज्यपालांनी चूक केली.

१९१. दुसरे असे की, 'शिविप' च्या सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देण्यात आलेली सुरक्षा बेकायदेशीरपणे काढून घेण्यात आली होती, असा दावा करणाऱ्या 'शिविप' च्या ३८ सदस्यांच्या दिनांक २५ जून, २०२२ रोजीच्या पत्रावर राज्यपालांनी भिस्त ठेवली. आमदारांनी असा दावा केला की, त्यांना "त्यांच्या मर्जीविरुद्ध" महाविकास आघाडी सरकारला पाठिंबा सुरू ठेवण्यासाठी जबरदस्ती करण्यासाठी सुरक्षा काढून घेण्यात आली होती. त्यामुळे त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देण्यात आलेली सुरक्षा पूर्ववत करण्याची मागणी त्यांनी केली. हे पत्र मिळाल्यानंतर, राज्यपालांनी आमदारांना, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आणि त्यांच्या मालमत्तेला पुरेसे संरक्षण देण्याचे निर्देश राज्य पोलिसांना दिले. परंतु, आमदारांना सुरक्षा न मिळाल्याने, सरकारवर सभागृहाचा विश्वास आहे का, या प्रश्नावर कोणताही परिणाम होत नाही. अशा प्रकरणांमध्ये राज्यपालांची योग्य प्रतिक्रिया म्हणजे त्यांना कायदेशीररित्या हक्काची असलेली सुरक्षा जर काढून टाकली गेली असेल तर, ती त्यांना पुरविली जात राहील याची खात्री करणे. राज्यपालांनी विचारात घेतलेले हे एक अप्रस्तुत कारण होते.

१९२. राज्यपालांनी ज्यावर भिस्त ठेवली, तो तिसरा पत्रव्यवहार म्हणजे अजय चौधरी यांची नियुक्ती बेकायदेशीर असल्याचे नमूद करण्यात आलेले श्री. एकनाथ शिंदे यांचे दिनांक २१ जून, २०२२ रोजीचे उपसभापतींना उद्देशून लिहिलेले पत्र. विधिमंडळाच्या कामकाजाच्या वैधतेबाबत राज्यपाल चौकशी करू शकत नाहीत किंवा मत व्यक्त करू शकत नाहीत. ते केवळ विधिमंडळाच्या कार्यक्षेत्राच्या कक्षेत किंवा विशिष्ट परिस्थितीत, न्यायालयांच्या कार्यक्षेत्रात आहे. (या न्यायनिर्णयाच्या याआधीच्या भागात चर्चा केली आहे). राज्यघटनेच्या अनुच्छेद १६३ अन्वये

राज्यपालांचा स्वेच्छाधिकार अशा परिस्थितींपुरता मर्यादित आहे, जेथे घटनात्मक तरतुदीत त्याबाबत स्पष्टपणे तरतूद आहे किंवा जेथे असा स्वेच्छाधिकार मंजूर करण्याशिवाय अन्यथा राज्यघटनेचा अन्वयार्थ लावता येत नाही.[62] त्यामुळे राज्यपालांनी दिनांक २१ जून, २०२२ रोजीच्या पत्रावर अवलंबून राहायला नको होते. तसेही, तत्कालीन मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी सभागृहाचा विश्वास गमावला होता, असे काहीही पत्रातील मजकुरावरून सूचित झाले नव्हते.

१९३. अखेरीस, श्री. उद्धव ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणाऱ्या श्री. फडणवीस आणि सात 'अपक्ष' आमदारांनी लिहिलेल्या पत्रांवर राज्यपालांनी भिस्त ठेवली. पहिली गोष्ट म्हणजे, श्री. फडणवीस आणि सात आमदार या दोहोंनाही अविश्वास ठराव मांडता आला असता. तसे करण्यासाठी त्यांना कोणताही प्रतिबंध नव्हता. दुसरं म्हणजे, काही आमदारांनी मुख्यमंत्र्यांना बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश देण्याची केलेली विनंती, जर तेवढीच विचारात घेतली तर, बहुमत चाचणी घेण्यास सांगण्यासाठी समर्पक आणि तर्कसंगत कारण ठरत नाही. बहुमत चाचणीची मागणी करण्याच्या निव्वळ विनंतीव्यतिरिक्त काहीतरी वस्तुनिष्ठ सामग्री असणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात, विद्यमान सरकारने सभागृहाचा विश्वास गमावला आहे आणि राज्यपालांनी बहुमत चाचणी घेण्यासाठी बोलवावे, असे सूचित करणारी कोणतीही वस्तुनिष्ठ सामग्री राज्यपालांसमोर नव्हती. त्यामुळे या प्रकरणात राज्यपालांनी केलेला स्वेच्छाधिकाराचा वापर कायद्याला धरून नव्हता.

62 नबाम रेबिया (उपरोल्लेखित)

१९४. **बोम्मई** (उपरोल्लेखित) आणि **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणांवर भिस्त ठेवत याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद असा आहे की, या न्यायालयाला यथापूर्व स्थिती पूर्ववत करण्याचा आणि श्री. ठाकरे यांना मुख्यमंत्री असलेले सरकार पुनःस्थापित करण्याचा आदेश देण्याचा अधिकार आहे. परंतु, श्री. उद्धव ठाकरे दिनांक ३० जून, २०२२ रोजी बहुमत चाचणीला सामोरे गेले नव्हते आणि त्याऐवजी त्यांनी त्यांचा राजीनामा सादर केला होता, या बाबीमुळे या युक्तिवादाचे समाधानकारक स्पष्टीकरण होत नाही. स्वेच्छेने सादर केलेला राजीनामा हे न्यायालय रद्द करू शकत नाही. जर श्री. ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याचे टाळले असते तर, या न्यायालयाने त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा स्थापन करण्याचा उपाय मंजूर करणे विचारात घेतले असते. या न्यायालयाने दिनांक २९ जून २०२२ च्या आदेशान्वये असा निर्णय दिला होता की, दिनांक ३० जून, २०२२ रोजी घेण्यात येणाऱ्या विश्वासदर्शक ठरावाचा निकाल या याचिकांच्या गटाच्या "अंतिम निकालाच्या अधीन असेल". विश्वासदर्शक ठराव झाला नसल्यामुळे तो या याचिकांच्या अंतिम निकालाच्या अधीन असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

१९५. विधानसभा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या समोरील अपात्रतेच्या याचिका प्रलंबित असल्याने बहुमत चाचणी पुढे ढकलणे आवश्यक होते, अशी याचिकाकर्त्यांची विनंती आहे. हा युक्तिवाद स्वीकारत येऊ शकत नाही. या निकालाच्या अगोदरच्या भागात चर्चा केल्याप्रमाणे, अपात्रता याचिका प्रलंबित राहिल्याने एखादया आमदाराला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्यास प्रतिबंध होत नाही. यामध्ये आमदाराच्या बहुमत चाचणीत सहभागी होण्याच्या अधिकाराचाही समावेश आहे. हे खरे आहे की, अपात्रता याचिकांचा निर्णय दिल्यामुळे

विधानसभेतील संख्याबळात बदल होईल आणि शेवटी बहुमत चाचणीच्या निकालावर परिणाम होईल. अपात्रता याचिकांच्या निर्णयानंतर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्याचा पर्याय आमदारांना खुला आहे. अपात्रता याचिकांचा निकाल लागल्यानंतर अविश्वास प्रस्ताव आणण्याचा पर्याय आमदारांसमोर खुला आहे. मात्र, अपात्रता याचिकांवर निर्णय होईपर्यंत हे न्यायालय सभागृहाच्या कामकाजाला स्थगिती देऊ शकत नाही. तसे करणे म्हणजे सभागृहाच्या कामकाजात हस्तक्षेप करण्यासारखे होईल. मुख्यमंत्र्यांना बहुमत चाचणीला सामोरे जाण्याचे निर्देश देण्याचा राज्यपालांचा अधिकार वस्तुनिष्ठ सामग्रीवर आधारित असणे आवश्यक होते.

viii. श्री. शिंदे यांना मुख्यमंत्री पदासाठी निमंत्रण देताना राज्यपालांनी केलेल्या स्वेच्छाधिकाराचा वापर.

१९६. श्री. शिंदे यांना सरकार स्थापनेचे निमंत्रण देताना राज्यपालांनी केलेल्या स्वेच्छाधिकाराच्या वापराला याचिकाकर्त्यांनी दोन कारणांवरून आव्हान दिले आहे : एक, श्री. शिंदे यांची नियुक्ती राज्यघटनेच्या अनुच्छेद १६४ (१ ख) अन्वये प्रतिबंधित आहे; आणि दुसरे म्हणजे, दोन प्रतिस्पर्धी गटांपैकी एका गटाला 'खरी' शिवसेना म्हणून मान्यता देऊन राज्यपालांनी आपल्या अधिकाराची व्याप्ती ओलांडली आहे. या निवेदनांवर यानंतर भाष्य केले आहे.

अ. श्री. शिंदे यांच्या नियुक्तीस राज्यघटनेच्या कलम १६४ (१ ख ) अन्वये प्रतिबंध नाही.

१९७. राज्यघटनेचे अनुच्छेद १६४ (१ ख) खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात आले आहे :

"१६४. मंत्र्यांसंबंधी अन्य तरतुदी. -

.. ..

(१ ख) कोणत्याही राजकीय पक्षांमध्ये असलेला, राज्य विधानसभेचा किंवा यथास्थिति, जेथे विधानपरिषद असेल अशा राज्याच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य, **दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये त्या सभागृहाचा सदस्य होण्यास अनर्ह असेल तर**, तो, त्याच्या अनर्हतेच्या दिनांकापासून, त्याच्या सदस्यत्वाचा कालावधी समाप्त होण्याचा दिनांक, किंवा, असा कालावधी समाप्त होण्यापूर्वी त्याने विधानसभेची, किंवा, ज्या राज्यात विधानपरिषद आहे अशा राज्याच्या कोणत्याही सभागृहाची निवडणूक लढविल्यास, तो निवडून आल्याचे घोषित झाल्याचा दिनांक, यांपैकी जो अगोदर येईल तोपर्यंतच्या कालावधीदरम्यान, खंड (१) अन्वये, **मंत्री म्हणून नियुक्त केला जाण्यासदेखील अनर्ह असेल.**"

(यावर भर देण्यात आला आहे.)

१९८. अनुच्छेद १६४ (१ ख) अन्वये, जर एखाद्या राज्याच्या आमदाराला किंवा विधान परिषदेच्या सदस्याला (जेथे ती अस्तित्वात आहे) दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये अपात्र ठरविण्यात आले असेल तर, त्याला मंत्री म्हणून नियुक्त करण्यास मनाई आहे. अपात्र ठरलेल्या विधिमंडळाच्या सदस्यावरच प्रतिबंध लागू होतो. जर दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये एखाद्या सदस्याला अपात्र ठरविण्याची याचिका सभापतींसमोर प्रलंबित असेल तर, त्या

सदस्याला मंत्रीपदावर नियुक्ती करण्यास अनुच्छेद १६४ (१ ख ) अन्वये प्रतिबंध नाही. अनुच्छेद १६४ (१ ख) च्या परिभाषेमधून हे स्पष्ट होते, ज्यात असे नमूद करण्यात आले आहे की, ज्या सदस्यास दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ अन्वये अपात्र ठरविण्यात आले आहे, तो मंत्री म्हणून नियुक्त करण्यास सुद्धा अपात्र ठरविला जाईल.

१९९. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, केवळ अपात्रता याचिका दाखल केल्यामुळे अपात्रतेतूनच उद्भवणारे काही किंवा सर्व परिणाम घडून येत नाहीत. अन्यथा मानणे म्हणजे, सभागृहाच्या एखादया सदस्याविरुद्ध अपात्रता याचिका दाखल करणे आणि त्या सदस्याला अपात्र ठरविणे यातील फरक धुसर करणे किंवा नष्ट टाकणे होय. एखादी गोष्ट खरी आहे असा दावा करणे याचा अर्थ ती प्रत्यक्षात खरी आहे असे नाही. एखादा दावा तथ्य म्हणून विचारात घेण्यापूर्वी तो कायद्याने प्रस्थापित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्रस्थापित होणे आवश्यक आहे. जेव्हा दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेची याचिका सभापतींकडे दाखल केली जाते, तेव्हा याचिका दाखल करणाऱ्या पक्षाचा दावा असतो की, याचिकेतील उत्तरवादीने दहाव्या अनुसूचीतील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. दहाव्या अनुसूचीनुसार न्यायाधिकरण म्हणून काम करणाऱ्या सभापतींसमोरील पुराव्यांच्या कसोटीवर हे विधान तपासले गेले पाहिजे. म्हणूनच अनुच्छेद १६४ (१ ख ) तेव्हाच लागू केले जाते, जेव्हा सभागृहाच्या प्रश्नास्पद सदस्याने दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ चे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याचा सभापती निकाल देतात. जर श्री. शिंदे अपात्र असल्याचे सभापतींना आढळले तर, ते यापुढे अनुच्छेद १६४ (१ ख ) मध्ये नमूद केलेल्या कालावधीत मुख्यमंत्री पद भूषविण्यास पात्र राहणार नाहीत.

२००. याचिकाकर्त्यांनी आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ **राजेंद्र सिंग राणा** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयाचा आधार घेतला आहे. या निर्णयाच्या अगोदरच्या भागात चर्चा केल्याप्रमाणे, सभागृहाच्या सदस्याला अपात्र ठरविणे हे, अपात्रतेचा बचाव सिद्ध केला आहे की नाही हे निश्चित करण्याकरिता, ज्या दिनांकास प्रतिबंधित कृत्य केले गेले होते, त्या दिनांकाशी संबंधित आहे.

२०१. श्री. शिंदे यांची नियुक्ती अनुच्छेद १६४ (१ ख ) अन्वये प्रतिबंधित आहे, ही विनंती करण्यासाठी याचिकाकर्त्यांनी **श्रीमंत बाळासाहेब पाटील** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील निर्णयावर सुद्धा भिस्त ठेवली आहे. या प्रकरणात, सन २०१८ मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेस आणि जनता दल (सेक्युलर) च्या आमदारांच्या आघाडीने कर्नाटक राज्य सरकार स्थापन केले होते. सन २०१९ च्या प्रारंभी, सरकार स्थापन करणाऱ्या विविध पक्षांच्या आमदारांविरोधात दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रता याचिकांची मालिका दाखल करण्यात आली होती. त्यापैकी काहींनी त्यांच्याविरुद्ध अपात्रता याचिका दाखल होण्यापूर्वीच किंवा त्यानंतर थोड्याच कालावधीत सभापतींकडे आपले राजीनामे सादर केले. या प्रकरणाला एक बरावाईट इतिहास होता. अखेरीस, सभापतींनी इतर गोष्टींबरोबर, या आमदारांना अपात्र ठरविण्याचा आदेश पारित केला.

२०२. सभापतींच्या आदेशाने व्यथित होऊन, अपात्र आमदारांनी राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२ अन्वये या न्यायालयात धाव घेतली. राजीनामे देणाऱ्या आमदारांनी असा युक्तिवाद केला की, विधानसभा अध्यक्षांना त्यांच्या अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता, कारण त्यांनी आधीच राजीनामा दिला होता आणि त्यामुळे ते सभागृहाचे सदस्य नव्हते, ज्यांना अपात्र ठरविले जाऊ शकते. **राजेंद्र सिंग राणा** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील निर्णयावर भिस्त ठेवून, या न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि असा निर्णय दिला की, अपात्रता याचिकांवर निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना आहे, कारण अपात्रता ही, ज्या दिनांकास पक्ष सोडण्याची कृती केल्याचा आरोप करण्यात आला आहे, त्या दिनांकाशी संबंधित आहे :

> "९३. अशा प्रकारे, अपात्रतेचा संबंध हा, ज्या दिनांकास पक्ष सोडण्याची कृती झाली, त्या दिनांकाशी संबंधित आहे, यात शंका नाही. राजीनामा सोपविल्यामुळे यासंदर्भात सभापतींच्या अधिकारक्षेत्रावर कोणताही परिणाम होत नाही. या ठिकाणी, आम्ही डी. संजीवय्या वि. निवडणूक न्यायाधिकरण [डी. संजीवय्या वि. निवडणूक न्यायाधिकरण, एआयआर १९६७ एससी १२११] या प्रकरणाचा संदर्भ देऊ शकतो, ज्यात या न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की : (एआयआर पृ. १२१३-१४, परिच्छेद ५)

"५. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, अधिनियमाच्या भाग तीन, ज्यामध्ये निवडून आलेल्या उमेदवाराच्या निवडीला आव्हान देण्याची यंत्रणा निश्चित करण्यात आली आहे, त्याचा संदर्भ न घेता, अधिनियमाच्या कलम १५० ची स्वतंत्ररीत्या अर्थउकल करणे अनुज्ञेय नाही. निवडणूक आयोगाने जर निवडणूक याचिका न्यायाधिकरणाकडे पाठविली आहे आणि जर प्रकरण प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे, तर ती याचिका कायद्यानुसार निकाली काढणे आवश्यक आहे. प्रकरणाच्या अखेरीस, निवडून आलेल्या उमेदवाराने निवडणुकीत कोणताही भ्रष्टाचार केला आहे की नाही, याबाबत न्यायाधिकरणाला निर्णय देणे आवश्यक असते आणि दुसरे म्हणजे, दुसरा उत्तरवादी रीतसर निवडून आल्याचे घोषित करावे की नाही हे ठरवावे लागते. निवडून आलेल्या उमेदवाराच्या राजीनाम्याचे कारण काहीही असले तरी, विधिमंडळातील आपल्या जागेचा राजीनामा देऊन, त्याच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या निवडणूक याचिकेतून त्याची सुटका होऊ शकत नाही."

त्यामुळे जेथे राजीनाम्याच्या तारखेपूर्वी पक्ष सोडण्यात आला असेल, तर राजीनामा दिल्यामुळे अपात्रतेचा कलंक दूर होणार नाही, तेथे असे वरील तत्त्व अवलंबले जाऊ शकते."

(यावर भर देण्यात आला आहे.)

२०३. अपात्रता ही, ज्या दिनांकास पक्ष सोडण्याची कृती घडते, त्या दिनांकाशी संबंधित आहे, याचा अर्थ दहाव्या अनुसूचीनुसार निषिद्ध वर्तणूक असलेली कृत्ये केल्यानंतरच्या कृत्यांचा किंवा घटनांचा परिणाम निर्दोष ठरविण्यात होत नाही, हे तत्त्व **श्रीमंत बाळासाहेब पाटील** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील निर्णयात लागू करण्यात आले आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, नंतरच्या कृती किंवा घटनांचा असे वर्तन सुधारण्यावर किंवा कर्त्याला नंतरच्या परिणामांपासून मुक्त करण्यावर परिणाम होत नाही. **राजेंद्र सिंग राणा** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील निर्णयाशी हे सुसंगत आहे. त्यामुळे श्री. शिंदे यांची नियुक्ती राज्यघटनेच्या अनुच्छेद १६४ (१ ख ) नुसार प्रतिबंधित नाही.

ब. राज्यपालांनी आपल्या अधिकाराची व्याप्ती ओलांडली नाही.

२०४. श्री. शिंदे यांना सत्तास्थापनेचे निमंत्रण देऊन राज्यपालांनी आपल्या अधिकाराची व्याप्ती ओलांडली आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे, कारण

अ. शिवसेनेचे अध्यक्ष, श्री. उद्धव ठाकरे हे भाजपसोबत युती करून सरकार स्थापन करण्याच्या बाजूने नव्हते. मात्र, श्री. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट अशा आघाडीच्या बाजूने होता. श्री. शिंदे यांना सत्तास्थापनेचे निमंत्रण देऊन राज्यपालांनी त्यांच्या नेतृत्वाखालील गटाला 'खरी' शिवसेना म्हणून वस्तुतः मान्यता दिली आहे ; आणि

ब. एका गटाच्या दुसऱ्या गटावरील वैधतेस मान्यता देण्याचा राज्यपालांना अधिकार नाही. या दोन गटांपैकी कोणता गट शिवसेना आहे, हे ठरविण्यासाठी निवडणूक आयोग हे योग्य प्राधिकरण आहे.

२०५. भाजपने महाराष्ट्र विधानसभेत एकशे सहा उमेदवार निवडून आणले, जे सर्व राजकीय पक्षांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. त्यांनी सभागृहात प्रमुख विरोधी पक्षाची स्थापना केली. दिनांक ३० जून, २०२२ रोजीच्या पत्राद्वारे तत्कालीन विरोधी पक्षनेते श्री. फडणवीस यांनी राज्यपालांना पत्र लिहून असा दावा केला की, श्री. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यासाठी भाजपचे एकशे सहा आमदार श्री. शिंदे यांना पाठिंबा देत आहेत. आठ अपक्ष उमेदवारांनीही श्री. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारला पाठिंबा दिला. त्याच दिवशी, श्री. शिंदे यांनी राज्यपालांना पत्र लिहून सरकार स्थापनेसाठी बोलावण्याची मागणी केली. राज्यपालांसमोरील सामग्रीच्या, म्हणजेच प्राप्त पत्रव्यवहाराच्या आधारे, राज्यपालांनी शिंदे यांना पदाची शपथ घेण्याचे निमंत्रण दिले आणि त्यांना सात दिवसांच्या कालावधीत सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे निर्देश दिले. दिनांक २९ जून, २०२२ रोजी श्री. उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पद रिक्त झाले होते. ज्या पक्षाने विधानसभेत सर्वाधिक उमेदवार निवडून आणले, त्या पक्षाच्या नेत्याने पक्षाच्या वतीने श्री. शिंदे यांना पाठिंबा दिला. त्यामुळे, श्री. शिंदे यांना सत्तास्थापनेचे निमंत्रण देण्याचा राज्यपालांचा दिनांक ३० जून, २०२२ रोजीचा निर्णय रास्त होता.

**F. निष्कर्ष**

२०६. वरील चर्चा लक्षात घेता, आमचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :

(१) **नबाम रेबिया** (उपरोल्लेखित) या प्रकरणामधील निर्णयाची अचूकता सात न्यायाधीशांच्या मोठ्या खंडपीठाकडे पाठविण्यात येत आहे ;

(२) हे न्यायालय सामान्यतः, दहाव्या अनुसूचीअंतर्गत अपात्रतेच्या याचिकांवर प्रथम निर्णय घेऊ शकत नाही. या प्रकरणात अशी कोणतीही असामान्य परिस्थिती नाही, ज्यामुळे अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेण्यासाठी या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करणे समर्थनीय ठरेल. सभापतींनी अपात्रतेच्या याचिकांवर वाजवी कालावधीत निर्णय घेतला पाहिजे ;

(३) आमदारांच्या अपात्रतेसाठी कोणत्याही याचिका प्रलंबित असल्या तरीही, त्यांना सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा अधिकार आहे. मधल्या काळातील सभागृहाच्या कामकाजाची वैधता ही अपात्रतेच्या याचिकांच्या निकालाच्या "अधीन" नाही ;

(४) विधिमंडळ पक्ष नव्हे, तर राजकीय पक्ष प्रतोद आणि सभागृहातील पक्षनेत्याची नियुक्ती करतो. तसेच, विशिष्ट पद्धतीने मतदान करण्याचे किंवा मतदानापासून दूर राहण्याचे निर्देश विधिमंडळ पक्षाकडून नव्हे, तर राजकीय पक्षाकडून दिले जातात. महाराष्ट्र विधानसभेच्या उपसचिवांनी दिनांक ३ जुलै, २०२२ रोजी कळविलेला सभापतींचा निर्णय कायदयाच्या विरोधात आहे. यासंदर्भात चौकशी करून आणि या न्यायनिर्णयात चर्चा करण्यात आलेल्या

तत्त्वांशी सुसंगती राखून, पक्षाच्या घटनेतील तरतुदींच्या अनुषंगाने शिवसेना राजकीय पक्षाने रीतसर प्राधिकृत केलेल्या प्रतोद आणि नेत्याला सभापती मान्यता देतील ;

(५) सभापती आणि निवडणूक आयोगाला अनुक्रमे, दहाव्या अनुसूचीअंतर्गत आणि पक्षचिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये त्यांच्यासमोरील याचिकांवर एकत्रितपणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे ;

(६) पक्षचिन्ह आदेशाच्या परिच्छेद १५ अन्वये याचिकांवर निर्णय घेताना, निवडणूक आयोग आपल्यासमोरील प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीस सर्वाधिक अनुकूल अशी चाचणी लागू करू शकतो ;

(७) दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ३ वगळल्याचा परिणाम असा होतो की, अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जाणाऱ्या सदस्यांना यापुढे "फुटी" चा बचाव उपलब्ध राहत नाही. दहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ (१), ज्यामध्ये दोन किंवा अधिक गट त्या राजकीय पक्षाचा दावा करतात, अन्वये अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देण्यासाठी राजकीय पक्ष कोणता आहे, हे विधानसभा अध्यक्ष प्रथमदर्शनी ठरवतील ;

(८) श्री. ठाकरे यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे, या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी राज्यपालांसमोर वस्तुनिष्ठ सामग्रीवर आधारित कारणे नसल्यामुळे, त्यांनी श्री. ठाकरे यांना सभागृहात बहुमत सिद्ध करण्याचे आवाहन करणे समर्थनीय नव्हते. परंतु, श्री. ठाकरे बहुमत

चाचणीला सामोरे गेले नाहीत आणि त्यांनी राजीनामा सोपविला, त्यामुळे यथापूर्व स्थिती पूर्ववत करता येऊ शकत नाही ; आणि

(९) राज्यपालांनी, शिंदे यांना सत्तास्थापनेचे निमंत्रण देणे योग्य होते.

२०७. वर नोंदवलेल्या निष्कर्षांनुसार आणि निर्देशांनुसार रिट याचिकांचा हा गट निकाली काढण्यात येत आहे.

२०८. प्रलंबित अर्ज असल्यास, ते निकाली काढण्यात आले आहेत.

....................................... सरन्यायाधीश.

[डॉ. धनंजय य. चंद्रचूड]

....................................... न्या.

[एम. आर. शहा]

....................................... न्या.

[कृष्ण मुरारी]

.................................... न्या.

[हिमा कोहली]

.................................... न्या.

[पामिदिघंटम श्री नरसिंह]

नवी दिल्ली,

११ मे, २०२३.

**x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x**